# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०१६

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**बुधवार, दिनांक १६ मार्च, २०१६ / फाल्गुन २६, १९३७ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **मुख्यमंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **गृहनिर्माण, खनिकर्म, कामगार मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - १२५**

---

### पुणे महानगरपालिकेकडून कालव्यामध्ये सोडण्यात येणाऱ्या सांडपाण्यास दुर्गंधी येत असल्याबाबत

**(१) * १५११३ श्री.अनिल भोसले, श्री.किरण पावसकर, श्री.संदिप बाजोरिया :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयातील मुंढवा जॅकवेलमधील पाणी जुना मुळा-मुठा कालव्यातून सुरु करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कालव्यातून सुरु करण्यात आलेल्या पाण्याला दुर्गंधी येत असून कालव्यातील पाणी विहिरी, कुपनलिकात उतरत असून फुरसुंगी, शेवाळेवाडी इ. परिसरातील पाणी दुषित झाले असून तेथे रोगराई पसरली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय निदर्शनास आले,

(४) तदनुसार, तेथील नागरिकांना शुध्द पाण्याचा पुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) पुणे महानगरपालिकेकडून कालव्यामधे सोडण्यात येणा-या सांडपाण्यास दुर्गंधी येते हे अंशतः खरे आहे. तथापि या फुरसुंगी आणि शेवाळेवाडी भागातील पाण्याचे नमुने तपासले असता पाणी दूषित आढळून आले नाहीत, तसेच या भागात जलजन्य आजाराचे रुग्ण आढळून आले नाहीत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) पुणे महानगरपालिकेच्या हद्दीस लागून असलेल्या फुरसुंगी, शेवाळेवाडी इ. गावांना मुंढवा जॅकवेल कार्यान्वित होण्यापुर्वीपासूनच टँकर द्‌वारे/पाईपलाईनद्‌वारे शुध्द पिण्याचे पाणी पुरविण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विविध कामांमध्ये झालेल्या गैरव्यवहाराबाबत**

**(२) * १५३४४ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.किरण पावसकर, श्रीमती विद्‌या चव्हाण, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले, श्री.ख्वाजा बेग, श्री.प्रकाश गजभिये, श्री.विक्रम काळे, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये नालेसफाई, रस्त्यावरील सिग्नल जंक्शन दुरुस्ती, डेब्रिज विल्हेवाट, भूलयंत्रे खरेदी, रस्ते दुरुस्ती, विद्‌यार्थ्यांसाठी टॅब खरेदी इत्यादीच्या कंत्राटांमध्ये अनेक प्रकारच्या अनियमितता झाल्या असून त्यात कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार झाला असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय निदर्शनास आले व तदनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये नालेसफाईच्या कंत्राटामध्ये अनियमितता झाल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे.

रस्त्यावरील सिग्नल, जंक्शन दुरुस्ती, डेब्रिज विल्हेवाटबाबतच्या कामामध्ये अनियमितता झाल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या.

भूलयंत्रे खरेदीत कंत्राटदाराने महानगरपालिकेची फसवणूक केली असल्याचे आढळून आले आहे.

तथापि, टॅब खरेदीमध्ये गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले नाही.

(२) याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबतची माहिती खालीलप्रमाणे आहे:-

<u>नालेसफाई</u>:-

नालेसफाई प्रकरणी झालेल्या अनियमिततांबाबत उप आयुक्त (घ.क.व्य.) यांच्या अध्यक्षतेखालील समितीने मोठ्या नाल्यांच्या ३२ कंत्राटांपैकी ९ कंत्राटांची चाचणी तत्वावर चौकशी करुन त्याचा अहवाल आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना सादर केला.

महानगरपालिका आयुक्तांनी सदर अहवालानुसार नालेसफाईच्या ३२ कंत्राटांची पुढील सविस्तर चौकशी करण्याचे आदेश अतिरिक्त आयुक्त (प.उ.) यांना दिले होते. त्यानुसार अतिरिक्त आयुक्त (प.उ.) यांनी सादर केलेल्या अंतरिम अहवालावर आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी अन्य आदेशांसह १४ कर्मचारी/अधिकारी यांना निलंबित करण्याचे आदेश दिले. सदर १४ कर्मचारी/अधिकारी यांच्यापैकी १३ कर्मचारी/ अधिकारी यांना महानगरपालिकेच्या सेवेतून निलंबित करण्यात आले असून एक कर्मचारी सेवानिवृत्त झाल्याने त्याला निलंबनाची कार्यवाही करता आली नाही. तसेच, संबधित सर्व १४ कर्मचाऱ्यांवर आरोपपत्र बजावण्यात येऊन त्यांच्याविरुद्ध खात्यांतर्गत सर्वकष चौकशी अधिकारी म्हणून उपायुक्त (अभियांत्रिकी) यांची नेमणूक करण्यात आली असून सदर चौकशीची कार्यवाही महानगरपालिकेमार्फत सुरू आहे.

तसेच, ३ नालेसफाई कंत्राटदार, व्ही.टी.एस.कंत्राटदार, ३ वजनकाटा ठेकेदार यांच्याविरुद्ध आझाद मैदान पोलीस ठाणे येथे दिनांक १९.०९.२०१५ रोजी महानगरपालिकेमार्फत गुन्हा नोंदविण्यात आला आहे. दिनांक ०७.११.२०१५ रोजी सदर प्रकरण पोलीसांनी आर्थिक गुन्हे विभागाकडे वर्ग केले आहे.

तद्नंतर महापालिकेमार्फत मोठ्या नाल्यांच्या ३२ कंत्राटांसंबंधित सर्व २४ नालेसफाई कंत्राटदार, २ व्हीटीएस कंत्राटदार, ८ वजनकाटा ठेकेदार यांच्याविरुद्ध आर्थिक गुन्हे विभागात महानगरपालिकेमार्फत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तसेच, नालेसफाई कंत्राटदारांना काळ्या यादीत टाकण्याच्या दृष्टीने मोठ्या नाल्यांच्या ३२ कंत्राटांमधील सर्व २४ नालेसफाई कंत्राटदारांवर दिनांक १९.०१.२०१६ रोजी कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आल्या असून त्या अनुषंगाने पुढील कार्यवाही सुरु आहे.

त्याचप्रमाणे या प्रकरणातील संबंधित कर्मचारी/अधिकारी यांचा सहभाग निश्चित करुन त्यांच्यावर खात्यांतर्गत चौकशीची कारवाई महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.

<u>रस्त्यावरील सिग्नल, जंक्शन दुरुस्ती, रस्ते दुरूस्ती व डेब्रिज विल्हेवाट</u>:-

रस्त्यावरील सिग्नल, जंक्शन दुरुस्ती, रस्ते दुरुस्ती व डेब्रिजची विल्हेवाट इत्यादी कामे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या रस्ते विभागाच्या मानंकनाप्रमाणे व महानगरपालिकेने नियुक्त केलेल्या त्रयस्थ संस्था गुणवत्ता नियंत्रक यांच्या देखरेखीमध्ये करण्यात आलेली आहेत.

तथापि, सदर कामांमध्ये अनियमितता झाल्याबातच्या प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने महापालिकेमार्फत गठीत करण्यात आलेल्या चौकशी समितीमार्फत चौकशी चालू आहे.

<u>भूलयंत्रे खरेदी</u> :-

जुलै, २०१५ च्या दरम्यान भूलयंत्रे (अनेस्थेशिया) मशीन खरेदीत कंत्राटदाराने महानगरपालिकेस फसविल्याचे निदर्शनास आले.

सदर प्रकरणी महानगरपालिकेमार्फत करण्यात आलेल्या चौकशीत, कंत्राटदार व युनिव्हर्सल ओरगॅनिक्स यांना महापालिकने कायम स्वरुपी काळ्या यादीत टाकले आहे. तसेच त्यांनी भरलेल्या कंत्राट अनामत रकमा जप्त केल्या आहेत. तसेच महापालिकेमार्फत त्यांचे व्हेडर रजिस्ट्रेशनही बंद केले आहे.

सदर कंत्राटदारांविरुद्ध महानगरपालिकेमार्फत आग्रीपाडा पोलीस ठाण्यात दिनांक २७.१०.२०१५ रोजी एफ.आय.आर.नोंदणीकरिता तक्रारअर्ज दाखल केला होता. सदर तक्रार अर्जाच्या अनुषंगाने कंत्राटदाराविरुद्ध दिनांक २१.०१.२०१६ रोजी प्रथम खबरी अहवालाची नोंद केली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने शासनाकडे पशुसंवर्धन व दुग्धविकास विभागाचे सचिव यांचेविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्याची परवानगी मागितल्याबाबत

**(३) * १५७५२ श्री.संदिप बाजोरिया, श्री.अनिल भोसले, श्री.विक्रम काळे, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.सुनिल तटकरे, श्री.ख्वाजा बेग, श्री.रामराव वडकुते :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पशुसंवर्धन व दुग्धविकास विभागाचे सचिव श्री.महेश पाठक यांनी सन २००५-२००६ मध्ये मुंबईचे जिल्हाधिकारी असताना घेतलेल्या एका निर्णयाबद्दल त्यांचेविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्याची परवानगी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने शासनाकडे मागितल्याची बाब दिनांक ३० सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने शासनाकडे श्री.महेश पाठक यांचेविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्याची परवानगी कधी व किती वेळा व कोणाकडे मागितली व ती त्यांना मिळाली आहे काय,

(३) असल्यास, लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने श्री.महेश पाठक यांच्याविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्याची परवानगी मागण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, याबाबतचा तपास पूर्ण झाला आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) माझगांव येथील भूकर क्र.१/१२६ आणि २/१२६ मधील मिळकतीस तत्कालीन जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांनी पुनर्विकासाची मंजूरी देताना अनर्जित रकमेची परिगणना योग्यप्रकारे न केल्याने शासनाच्या महसूलाची हानी झाली असल्याचे निदर्शनास आल्याने तत्कालीन जिल्हाधिकारी, मुंबई शहर व इतर ३ यांचेविरुद्ध लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम, १९८८ नुसार गुन्हा दाखल करण्याबाबत महासंचालक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांनी दिनांक १४.९.२०१५ च्या पत्रान्वये शासनास प्रस्ताव सादर केला आहे.

(४) व (५) या प्रकरणी पुनर्विकासास परवानगी देताना वसुल केलेल्या अनर्जित उत्पन्नासंदर्भात महसूल विभागाचे अभिप्राय घेऊन पुढील कार्यवाही शासन स्तरावर विचाराधीन आहे.

-----------------

## पोलीस कल्याण निधी कायद्यात बदल करण्याबाबत तसेच पोलीस कर्मचाऱ्यांना प्रवास वाहतुक सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(४) * १४९७५ ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पोलीस कल्याण निधी अधिनियमांतर्गत पोलीस अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या कल्याण संदर्भातील निधीचे वार्षिक अंदाजपत्रक पुरेसे नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अल्प असणाऱ्या अंदाजपत्रकात वाढ करण्यात यावी, अशी मागणी राज्यातील पोलीस अधिकारी/कर्मचारी यांचेकडून शासनाकडे अनेक वर्षापासून करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनेक पोलीस ठाण्यामध्ये पोलीस अधिकारी/कर्मचाऱ्यांना कर्तव्य बजावण्याच्या कामासाठी वाहनच उपलब्ध नसल्याचे, तसेच असलेले वाहन अनेकदा नादुरुस्त असल्याने पोलीस कर्मचाऱ्यांना वेळप्रसंगी दोन चाकी वाहनावर (Two Wheeler) प्रवास करण्याची वेळ येत असल्याच्या तक्रारीही पोलीस कर्मचाऱ्यांकडून शासनाकडे वारंवार करण्यात येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त दोन्ही प्रकरणी शासनाकडे वारंवार तक्रारी करुनही कोणतीही कार्यवाही केली नसल्याचे दिनांक १० जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत पोलीस कल्याण निधी कायद्यात बदल करण्याबाबत तसेच पोलीस कर्मचाऱ्यांना वाहने उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) सन २०१२-२०१३ या वित्तीय वर्षात निर्लेखित झालेल्या १६६६ वाहनांच्या बदली नवीन वाहने खरेदी करण्यास मंजूरी देण्यात आलेली असून त्या अनुषंगाने सन २०१४-२०१५ या वित्तीय वर्षात एकूण ७९६ जीप वाहने खरेदी करुन सदर वाहने विविध घटकांना वाटप करण्यात आलेली आहेत.

सन २०१३-२०१४ या वित्तीय वर्षात निर्लेखित झालेल्या ३५७ वाहनांच्या बदली नवीन वाहने खरेदी करण्यास मंजुरी देण्यात आलेली असून त्या अनुषंगाने सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षात १३० वाहने खरेदी करुन विविध घटकांना वाटप करण्यात आलेली आहेत. अशाप्रकारे राज्यातील विविध घटकांकडे सद्य:स्थितीत एकंदरीत ४४२३ जीप वाहने उपलब्ध आहेत.

पोलीस कल्याण निधी कायद्यात बदल करण्याबाबतची कोणतीही बाब प्रस्तावित नाही.

-----------------

**राज्यातील गिरणी कामगारांच्या प्रलंबित समस्यांबाबत**

**(५) * १५४४१ श्री.जर्नादन चांदूरकर, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.नरेंद्र पाटील, श्री.सुनिल तटकरे, श्री.धनंजय मुंडे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.महादेव जानकर, श्री.विक्रम काळे, श्री.अनिल भोसले, श्री.ख्वाजा बेग, श्री.आनंद ठाकूर, श्रीमती विद्या चव्हाण, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.रामराव वडकुते, श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील गिरणी कामगारांच्या पुढील घरांची लॉटरी काढणे, ताब्यात असलेल्या जमिनीवर बांधकाम सुरु करण्याचा आदेश म्हाडाला देणे, बॉम्बे डाईंगच्या जमिनीवरील आरक्षण उठविणे इत्यादी प्रलंबित समस्यांबाबत दिनांक १० जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास ललित कला भवन, डिलाईल रोड, पोलीस स्टेशन जवळ गिरणी कामगारांनी जाहीर मेळावा भरवला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतील खाजगी गिरण्यांच्या जमिनीच्या विकासासाठी फंजिबल एफएसआय नुकताच मंजूर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या फंजिबल एफएसआय मुळे गिरणी कामगारांना किती चौ.फुटाचे घरे मिळणार आहेत,

(४) असल्यास, मुंबईतील कोणकोणत्या खाजगी गिरण्यांच्या जमिनीवरील चाळीतील गिरणी कामगारांना याचा फायदा मिळणार आहे,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून गिरणी कामगारांच्या समस्या सोडविणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) हे खरे आहे.

(२) नगरविकास विभागाकडून प्राप्त माहितीनुसार मुंबईतील खाजगी गिरण्यांच्या जमिनीच्या विकासासाठी फंजिबल एफएसआय मंजूर केलेला आहे अशी बाब नाही. तथापि बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावली, १९९१ च्या विनियम ५८(७) अन्वये गिरण्यांच्या जागेवरील निवासी इमारत/चाळी यांच्या पुनर्विकासाबाबत तरतूद आहे. विनियम ३५(४) च्या तरतुदीनुसार निवासी विकासासाठी ३५% फंजीबल चटई क्षेत्र रेडी रेकनर दराच्या ६०% प्रमाणे अधिमूल्याचा भरणा करुन अनुज्ञेय आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) सुधारित विकास नियंत्रण नियमावलीतील कलम ५८(१) (ब) नुसार मुंबईतील कापड गिरण्यांची मोकळी जागा व शिल्लक चटईक्षेत्र यांचे वाटप साधारणत: १/३ म्हाडास, बृहन्मुंबई पालिकेस व मालकास देण्याची तरतुद आहे. म्हाडास उपलब्ध जमिनीवर अंदाजे २/३ गाळे गिरणी कामगारांसाठी सदनिका म्हणून व १/३ गाळे संक्रमण सदनिका म्हणून बांधण्यात येत आहे. त्यानुसार १८ गिरण्यांच्या जमिनीवर गिरणी कामगारांसाठी बांधण्यात आलेल्या ६९४८ सदनिकांपैकी २३ सदनिका संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील हुतात्म्यांच्या वारसांसाठी राखीव ठेवून उर्वरित ६९२५ सदनिकांसाठी दिनांक २८.०६.२०१२ रोजी सोडत काढण्यात आली असून आजअखेर ५८५७ पात्र गिरणी कामगारांना प्रत्यक्ष ताबा देण्यात आलेला आहे. गिरणी कामगार प्रकल्प टप्पा २ अंतर्गत ६ गिरण्यांच्या जमिनीवर प्रगतीपथावर असणाऱ्या योजनेमधील २६३४ गिरणी कामगार सदनिकांची सोडत एप्रिल २०१६ मध्ये काढण्याचे प्रस्तावित आहे. तथापि सदरहू योजना साधारणत: मार्च २०१७ पर्यंत पूर्ण होण्याचे अपेक्षित असल्याने सोडतीत विजयी गिरणी कामगारांना त्यांच्या पात्रतेनंतर सदनिकांचा प्रत्यक्ष ताबा महानगरपालिकेचे भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर देण्याचे प्रस्तावित आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**भोगवटा प्रमाणपत्र नसलेल्या इमारतींनाही मानीव अभिहस्तांतरण प्रकिया सुलभ करण्यासंदर्भात समिती नेमण्यात आल्याबाबत**

**(६) * १४८४६ श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, श्री.विक्रम काळे, श्री.अनिल भोसले, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.राजेंद्र जैन, श्री.प्रकाश गजभिये, श्री.गुरुमुख जगवानी, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई, ठाणे, पुणे, नागपूर यांसारख्या शहरांमध्ये जमिनीच्या मालकीवरुन सोसायटी आणि विकासकांमध्ये वाद असल्याने अनेक इमारतींचा पुनर्विकास रखडलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भोगवटा प्रमाणपत्र (ओसी) नसलेल्या इमारतींनाही आता मानीव अभिहस्तांतरण (डीम्ड कन्व्हेयन्स) प्रक्रिया सुलभ करण्याबाबत मा. मुख्यमंत्री यांनी माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान चार सचिवांची समिती नेमली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या समितीमध्ये कोणकोणत्या विभागाचे सचिव आहेत,

(४) असल्यास, या सचिव समितीने आपला अहवाल शासनाकडे सादर केला आहे काय,

(५) असल्यास, या अहवालाचे स्वरुप काय आहे,

(६) तसेच, अहवालाची अंमलबजावणी केव्हापासून करण्यात येणार आहे ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) अंशत: खरे आहे.

(२), (३), (४), (५) व (६) हे खरे आहे. मानीव अभिहस्तांतरणासंदर्भात मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०५ जानेवारी, २०१६ रोजी बैठक घेण्यात आली. यामध्ये सध्या सहकार आयुक्त यांनी त्यांच्या दिनांक २३.०७.२०१५ च्या आदेशान्व्ये स्थापित समितीचा अहवाल सादर करावा व त्यानंतर प्रधान सचिव, गृहनिर्माण यांच्या समन्वयाखाली प्रधान सचिव (नगर विकास-१), प्रधान सचिव (महसूल) व प्रधान सचिव (मदत व पुनर्वसन) यांच्या समितीने या शिफारशींचा अभ्यास करुन शासनास याबाबत योग्य शिफारशी कराव्यात असे मा.मुख्यमंत्री महोदयांनी आदेशित केले आहे. सहकार आयुक्तांच्या समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर यथोचित निर्णय घेण्यात येईल.

-----------------

## नागपूर येथील दिक्षाभूमी/ताजबाग/गणेश टेकडी गणेशमंदीर या तीर्थस्थळांना पर्यटन स्थळांचा "अ" दर्जा देण्याबाबत

**(७) * १६२६१ श्री.प्रकाश गजभिये, श्री.रामराव वडकुते, श्री.राजेंद्र जैन, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, श्री.संदिप बाजोरिया, श्री.जयवंतराव जाधव : तारांकित प्रश्न क्रमांक १२२९२ ला दिनांक ९ डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील दिक्षाभूमी/ताजबाग/गणेश टेकडी या तीर्थस्थळांचा "अ" दर्जा तीर्थस्थळांमध्ये शासनाने समावेश केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तीर्थस्थळांना "अ" दर्जा देण्याबाबतचे निकष काय आहेत,

(३) असल्यास, दिक्षाभूमीवर जगातून लाखो भाविक, विचारवंत व साहित्यीक व राजकीय नेते भेट देतात परंतु दिक्षाभूमी व अन्य स्थळांना पर्यटनाचा "अ" दर्जा का दिलेला नाही याची कारणे काय आहेत,

(४) वरील तीर्थस्थळांना "अ" दर्जा न दिल्यामुळे शासनाचा करोडो रुपये निधी त्यांस मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, दिक्षाभूमी व अन्य तिर्थस्थळांना "अ"दर्जा केव्हापर्यंत देण्यात येणार आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नाही. तिर्थक्षेत्राचा दर्जा दिलेला नाही. मात्र दिक्षाभूमी या स्थळाला अ वर्ग पर्यटन स्थळाचा दर्जा दिलेला आहे.

(२) तीर्थक्षेत्रांचे 'अ', 'ब' व 'क' असे वर्गीकरण करणे व त्यांचा विकास करणे या बाबी शहरी भागासाठी नगरविकास विभाग व ग्रामीण भागासाठी ग्रामविकास विभागाशी संबंधित आहेत, नगरविकास विभागाचा शासन निर्णय क्र. २००१२/५६८/प्र.क्र.८९/२००२/नवि-१८, दिनांक २४/८/२००४ अन्वये राज्यातील नागरी क्षेत्रातील तीर्थक्षेत्रांचा दर्जा देण्याचे निकष निश्चित करण्यात आलेले आहेत. तर ग्रामीण भागातील तीर्थक्षेत्रांना दर्जा देण्याबाबतचे निकष शासन निर्णय, ग्रामविकास क्र.तिर्थवि-२०११/प्र.क्र.६५१/योजना-७, दिनांक १६/११/२०१२ अन्वये निश्चित केलेले आहेत.

(३) दिक्षाभूमी या स्थळाला पर्यटनाचा 'अ' वर्ग दर्जा देण्यात आला आहे.

(४) तिर्थस्थळांना तिर्थस्थळाचा दर्जा देणे व सदर ठिकाणास पर्यटनस्थळाचा दर्जा देणे या दोन स्वतंत्र बाबी आहेत. पर्यटन स्थळ विकासाबाबत प्रादेशिक पर्यटन विकास योजनेअंतर्गत जिल्हाधिकाऱ्यांकडून प्रस्ताव प्राप्त झाल्यास आवश्यकतेनुसार व निधीच्या उपलब्धतेनुसार निधी मंजूर केला जातो.
(५) व (६) ताजबाग व गणेश टेकडी या स्थळांना पर्यटनाचा 'अ' वर्ग दर्जा देण्याची बाब शासन निर्णय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग क्र.टीडीएस-२०१५/१२/प्र.क्र.१०६५/पर्यटन, दिनांक २२/२/२०१६ च्या शासन निर्णयानुसार तपासून त्याबाबतचे प्रस्ताव/अभिप्राय शासनास सादर करण्याबाबत जिल्हाधिकारी, नागपूर यांचा सूचना देण्यात आल्या आहेत.

-----------------

## मुंबई पोलीस दलातील १६३ पोलिसांच्या मृत्यूबाबत

**(८) * १४७६९ आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.आनंद ठाकूर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.सुनिल तटकरे, श्री.प्रकाश गजभिये, श्री.महादेव जानकर, श्री.विजय उर्फ भाई गिरकर, श्री.विक्रम काळे, श्री.अनिल भोसले, श्री.रामराव वडकुते :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील १६३ पोलीसांचा दिनांक १ जानेवारी २०१५ ते ३१ डिसेंबर २०१५ या कालावधीत सेवेत असताना मृत्यू झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामध्ये सर्वाधिक मृत्यू हे हृदय विकाराच्या धक्क्याने झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पोलीसांना १४ ते १६ तास ड्युटी केल्याने अतिताणाने प्रकृतीवर परिणाम होवून हे मृत्यू झालेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या संदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय,

(५) तसेच, सदर मृत्यू झालेल्या पोलिसांच्या कुटूंबांना किती आर्थिक नुकसान भरपाई देण्यात आली आहे,

(६) पोलिसांच्या मृत्यूचे वाढत असलेले प्रमाण कमी करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) दिनांक १ जानेवारी २०१५ ते ३१ डिसेंबर २०१५ या कालावधीत मुंबईतील १६३ पोलीसांचा मृत्यू झाला आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) पोलीस कल्याण निधीमार्फत निधन पावलेल्या पोलीस अधिकारी/ कर्मचारी यांच्या वारसदारांना रुपये २०,०००/- तसेच अपघाती निधन याबाबत विमा कंपनीकडून प्राप्त झालेल्या विम्याचा लाभ देण्यात येतो.

(६) पोलीसांचे आरोग्य चांगले रहावे याकरिता महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजना, कर्तव्यामध्ये बदल, प्रोत्साहन भत्ता, आहार भत्ता, साप्ताहिक मोबदला, बी.एम.आय. चाचणीचा प्रोत्साहन भत्ता, व्यायामशाळा सुविधा, जीमखाना, विश्राम गृहे, वाचनालय, अभ्यासिका तसेच पोलीस कल्याण निधीमार्फत तपासणी शिबीर, कार्यशाळा असे विविध कार्यक्रमाचे आयोजन केले जातात.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## अकोला महानगरपालिकेतील विविध रिक्त पदांबाबत

**(९) * १५१३६ श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला महानगरपालिकेमध्ये अ, ब, क, ड या वर्गातील एकूण २३९७ पदे मंजूर असून त्यापैकी १६५८ पदे भरण्यात आली असून सुमारे ७०० रिक्त पदे असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रिक्त पदांमध्ये उपायुक्त-२, सहायक आयुक्त-४, करनिर्धारण अधिकारी-१, कार्यकारी अभियंता-१. नगररचना उपसंचालक-१, सहायक संचालक नगररचना-१, नगर रचनाकार-२, व आरोग्य अधिकारी-१ इत्यादी पदे रिक्त असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त पदे रिक्त राहण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(५) असल्यास, तदनुसार सदर पदे तात्काळ भरण्याबाबत शासन स्तरावर काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) महापालिकेच्या आस्थापनेवरील वर्ग-१ ते वर्ग-४ च्या एकूण १६४९ पदांपैकी ९०८ पदे कार्यरत असून, ७४१ पदे रिक्त आहेत, ही वस्तुस्थिती आहे.

(२) याबाबतची वस्तुस्थिती खालील प्रमाणे आहे :-

| अ.क्र. | पदनाम | मंजूर पदे | कार्यरत पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|
| १ | कार्यकारी अभियंता | २ | २ | ० |
| २ | उपसंचालक नगररचना | १ | - | १ |
| ३ | सहा.संचालक नगररचना | १ | - | १ |
| ४ | उपायुक्त | २ | - | २ |
| ५ | मुल्य निर्धारण कर संकलन अधिकारी | १ | - | १ |
| ६ | आरोग्य अधिकारी (एम.ओ.एच.) | १ | - | १ |
| ७ | नगररचनाकार | २ | - | २ |
| ८ | सहायक आयुक्त | २ | - | २ |
| | एकूण | १२ | ०२ | १० |

(३), (४) व (५) सदरची पदे रिक्त राहण्याच्या मागील मुख्य कारण हे अकोला महानगरपालिकेचा आकृतीबंध व सेवाप्रवेश नियम अद्याप निश्चित नाहीत, हे आहे.

याबाबत महापालिकास्तरावर कार्यवाही सुरु असून, शासनाकडून सेवाप्रवेश नियम व आकृतिबंधास मान्यता मिळाल्यानंतर सदरहू रिक्त पदे भरण्याबाबत महापालिकास्तरावर उचीत कार्यवाही करण्यात येईल, असे आयुक्त, अकोला महानगरपालिका यांच्या अहवालात नमूद करण्यात आले आहे.

तथापि, वर्ग-१ व वर्ग-२ मधील पदे प्रतिनियुक्तीने भरण्याबाबत महापालिकेने केलेल्या विनंतीनुसार सदरची पदे प्रतिनियुक्तीने भरण्यासाठी अधिकारी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनस्तरावरील रिक्त पदांशी संबंधित मूळ विभागांना वेळोवेळी विनंती करण्यात आलेली असून, याबाबत पुन्हा संबंधीत विभागांना निदेश देण्यात येतील.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुलुंड (पूर्व), (मुंबई) येथील न्यु.पी.एम.जी.पी. म्हाडा वसाहतीच्या पुनर्विकास प्रकल्पाबाबत

**(१०) * १६१८६ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुलुंड (पूर्व), (मुंबई) येथील न्यु.पी.एम.जी.पी. म्हाडा वसाहतीचा पुनर्विकास मे.रिचा रिअल्टर्स, म्हाडा व संस्था यांनी सन २००० मध्ये त्रिसदस्य करारान्वये ३६ महिन्यात एकूण १३९९ सभासदांना नवीन घराचा ताबा देण्याच्या हमीवर झाला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विकासकाने माहे सप्टेंबर, २०१५ पर्यंत फक्त ७९३ सदनिका तयार करुन पोलीस बळाचा वापर करुन हुकूमशाहीने घरांची लॉटरी पध्दतीने सोडतही काढलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उर्वरित ६०६ रहिवाश्यांच्या घरांबाबत कोणतीही कार्यवाही न करता विक्रीकरिता असलेल्या घरांचे बांधकाम सुरु केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या विकासकाने बांधलेल्या संक्रमण शिबिरात नागरी सुविधांचा अभाव असून ट्रान्झीट-सी या इमारतीवर असलेल्या २० हजार लीटर पाण्याची क्षमता असलेली टाकी फुटून रहिवाश्यांच्या जीवाला धोका निर्माण झाला होता, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, रहिवाश्यांच्या जीवाशी खेळणाऱ्या विकासकाविरोधात शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) प्रथम त्रिपक्षीय करारनामा दिनांक ३०.०९.२०१० रोजी करण्यात आला. तद्नंतर मुंबई मंडळातर्फे ना हरकत प्रमाणपत्र दिनांक २४.१२.२०१३ रोजी देण्यात आले व पुरवणी त्रिपक्षीय करारनामा दिनांक २६.१२.२०१४ रोजी करण्यात आला.

(२) माहे सप्टेंबर, २०१५ पर्यंत तयार झालेल्या ७८९ पुनर्वसन सदनिकांना महानगरपालिकेने भोगवटा प्रमाणपत्र दिले आहे. या गाळ्यांकरिता संस्थेच्या सभासदांच्या सहमतीने लॉटरी काढण्यात आलेली आहे. लॉटरी दरम्यान पोलीस बळाचा वापर करण्यात आलेला नाही.

(३) उर्वरीत रहिवाश्यांच्या पुनर्वसनार्थ बांधण्यात यावयाच्या इमारतींच्या नकाशांना महापालिकेची मंजूरी प्राप्त करण्यास्तव विकासकाने महापालिकेस सादर केलेले आहेत. तसेच विक्रीच्या तीन इमारतींपैकी एका इमारतीचे काम सुरु असून सध्या पोडीयम स्तरापर्यंतचे (वाहनतळ) काम झाल्याचे दिसून येते.

(४) विकासकाने बांधलेल्या संक्रमण शिबिरातील “सी” इमारतीवरील H.D.P.A. पाण्याची टाकी फुटली होती व ती आता बदलण्यात आली आहे. तसेच विकासकाने संक्रमण शिबिराच्या इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडीट केलेले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील आयटीआयमध्ये शिकणा-या विद्यार्थ्यांच्या विद्यावेतनात वाढ करण्याच्या मागणीबाबत**

**(११) * १५८८९ श्री.विक्रम काळे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.दत्तात्रय सावंत, डॉ.सुधीर तांबे, श्री.सतिश चव्हाण, श्री.आनंदराव पाटील, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आयटीआयमध्ये शिकणा-या विद्यार्थ्यांना गत अनेक वर्षांपासून केवळ चाळीस रुपये विद्यावेतन देण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सध्याच्या महागाईच्या काळात सदर विद्यावेतन अतिअल्प असल्याने विद्यार्थ्यांकडून विद्यावेतनात वाढ करण्याची मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये शिकणा-या विद्यार्थ्यांचे विद्यावेतनात वाढ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) होय.

(३) औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचे विद्यावेतनात वाढ करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**चंदनवाडी येथील लहान मुलांच्या दफनभूमीच्या जागेवर रिलायन्स जिओ कंपनी टॉवर उभारत असल्याबाबत**

**(१२) * १५६१३ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.शरद रणपिसे, श्री.महादेव जानकर, श्री.संदिप बाजोरिया, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील उद्याने मैदानासह मोकळ्या जागांवर रिलायन्स फोर-जीचे टॉवर उभारण्यास रिलायन्स जिओ कंपनीला परवानगी दिलेली असताना या कंपनीने चंदनवाडी येथील लहान मुलांच्या दफनभूमीच्या जागेवर टॉवर उभारत असल्याची बाब दिनांक १५ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय निदर्शनास आले व त्यानुसार उभारण्यात येत असलेल्या सदरील टॉवरचे काम त्वरीत थांबविण्याबाबत तसेच या प्रकरणातील दोषींवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) मुंबईतील उद्याने मैदानासह मोकळया जागांवर रिलायन्स फोर-जीचे टॉवर उभारण्यास रिलायन्स जिओ कंपनीला परवानगी दिलेली असताना या कंपनीने चंदनवाडी येथील लहान मुलांच्या दफनभूमीच्या जागेवर टॉवर उभारत असल्याची बाब दिनांक १४ जानेवारी, २०१६ रोजी निदर्शनास आली.

(२) सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे.

(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात आलेल्या स्थळ निरीक्षण चौकशीत सदर टॉवर उभारण्याचे काम स्मशानभूमीच्या विश्वस्तांनी अनधिकृतपणे सुरु केल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे महानगरपालिकेमार्फत संबंधितांना मुंबई महापालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३५४(अ) नुसार दि. १४.०१.२०१६ रोजी सदर काम थांबविण्याची नोटीस देण्यात आली.

तसेच, त्यांच्याविरुध्द बृहन्मुंबई महापालिकेमार्फत महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम कलम ५२ सह ४३ अन्वये तक्रार दाखल करण्यात आली आहे.

सदर अनधिकृत बांधकाम दि. १९.०१.२०१६ रोजी पोलीस बंदोबस्तात महापालिकेमार्फत निष्कासित करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नवी मुंबई, वाशी येथील इनॉर्बीट मॉल मधील दुकानदारांनी गुमास्ता कायद्याचे उल्लंघन केल्याबाबत

**(१३) * १४७०९ श्री.नरेंद्र पाटील, श्री.सुनिल तटकरे, श्री.धनंजय मुंडे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई, वाशी येथील इनॉर्बीट या आलिशान मॉल मधील दुकानदार नियमबाहय पध्दतीने व्यवसाय करीत असल्याने गुमास्ता विभागाच्या अधिकाऱ्यांनी शेकडो दुकानांची अचानक तपासणी केली असता सर्वच दुकानदार दोषी असल्याचे माहे जानेवारी, २०१६ च्या दुसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासकीय नियमांचे उल्लंघन केल्यामुळे सदर व्यावसायिकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

नवी मुंबई, वाशी येथील इनॉर्बीट मॉलमध्ये स्थित असणाऱ्या नऊ आस्थापनांना क्षेत्रीय दुकाने निरीक्षकांनी दिनांक १२.०१.२०१६ रोजी सामुहिक भेटी देऊन महाराष्ट्र दुकाने व आस्थापना अधिनियम, १९४८ व किमान वेतन अधिनियम, १९४८ अंतर्गत शेरे पारित केले आहेत.

सदरहू निरीक्षणात उक्त नऊ आस्थापनांच्या व्यवस्थापकांनी महाराष्ट्र दुकाने व आस्थापना अधिनियम, १९४८ व किमान वेतन अधिनियम, १९४८ च्या तरतुदींचा भंग केल्याचे निदर्शनास आले.

(२) सदर नऊ आस्थापनांवर दिनांक २२.०१.२०१६ रोजी कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आल्या असून दिनांक ०३/०३/२०१६ रोजी वाशी न्यायालयात सहा आस्थापनांविरुद्ध खटले दाखल केले आहेत. दोन आस्थापनांनी त्रुटींची पूर्तता केली आहे व उर्वरीत एका आस्थापनेविरुद्ध पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात मुंबई, पुणे, नाशिक व मालेगांवसारख्या महत्वाच्या तसेच संवेदनशील शहरात सी.सी.टी.व्ही. यंत्रणा उभारण्याबाबत

**(१४) * १४६०२ डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक ११२२२ ला दिनांक १६ डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाने शासकीय कार्यालये, महामंडळे या ठिकाणी सी.सी.टी.व्ही. कॅमेरे लावण्यासंदर्भात दिनांक ४ मार्च, २०१३ रोजीच्या पत्रान्वये मार्गदर्शक तत्वे विहीत केली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सुरक्षिततेसाठी सार्वजनिक ठिकाणी सी.सी.टी.व्ही. बसविण्याबाबत मार्गदर्शक तत्वे विहीत करण्याबाबतच्या शासनाच्या विचाराधीन असलेल्या बाबींवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, राज्यात उद्योग-व्यापाराचे दृष्टीने महत्वाची असलेले मुंबई-पुणे-नाशिक इ. शहरे तसेच मालेगांव (जि.नाशिक) सारख्या संवेदनशील शहरात सुरक्षेच्या कारणास्तव सार्वजनिक ठिकाणी सी.सी.टी.व्ही. कॅमेरे लावण्याची आवश्यकता शासनाचे निदर्शनास आली आहे काय,

(४) नसल्यास, सदरहु बाबतचा विचार केव्हापर्यंत पुर्ण होणे अपेक्षित आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

(२) सार्वजनिक ठिकाणी सीसीटीव्ही बसविण्यासाठी मार्गदर्शक तत्वे विहीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(३) व (४) पुणे शहर सीसीटीव्ही प्रकल्प २७/१०/२०१५ पासुन पुर्णपणे कार्यान्वित झाला आहे. मुंबई शहरात सीसीटीव्ही बसविण्याबाबत कार्यवाही सुरू आहे. नाशिक शहरात सिंहस्थ कुंभमेळ्याच्या सुरक्षेसाठी तात्पुरत्या स्वरुपात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यास आले होते. सदर कॅमेरे काढुन टाकण्यात आले आहे. नाशिक शहरात कायमस्वरुपी सीसीटीव्ही बसविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे. मालेगांव शहरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे प्रस्तावीत नाही.

-----------------

## मूल (जि.चंद्रपूर) नगरपरिषद क्षेत्रातील जागेच्या गुंठेवारीला बेकायदेशीर परवानगी दिल्याबाबत

**(१५) * १५३६५ श्रीमती शोभाताई फडणवीस : तारांकित प्रश्न क्रमांक १३८७६ ला दिनांक १६ डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मूल (जि.चंद्रपूर) नगरपरिषद क्षेत्रात आदिवासीची जागा, पट्टयात मिळालेल्या जागा, शासकिय जागा अवैद्यरित्या सन २००५ ते २०१२ या कालावधीत गुंठेवारीला बेकायदेशीर परवानगी दिल्या गेल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गुंठेवारी प्रकरणाची चौकशी करण्याबाबत लोकप्रतिनिधी या नात्याने जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांना दिनांक १ जुलै, २०१५ रोजी वा त्यासुमारास लेखी पत्र देवूनही कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) सन २००५ ते २०१२ या कालावधीत नियमांचे पालन न करून परवानगी दिल्या गेल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) या प्रकरणी कोणतीही कार्यवाही झाली नाही, हे खरे नाही.

(३) यासंदर्भात लोकप्रतिनिधींनी दिलेल्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांना अहवाल देण्याबाबत दिनांक ३/६/२०१५ च्या शासन पत्रान्वये कळविण्यात आले होते. यानुसार चौकशी करण्यात आली असून संबंधीत दोषी अधिकारी व कर्मचारी यांचेवर शिस्तभंगाची कार्यवाही जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांचेमार्फत प्रस्तावित करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबई महानगरपालिकेच्या प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांमधील सर्वसामान्य प्रशिक्षित पदवीधरांना उच्च वेतनश्रेणी देण्याचा निर्णयाबाबत**

**(१६) * १५९०१ श्री.रामनाथ मोते, श्री.नागो गाणार, डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महानगरपालिकेच्या प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांमध्ये सध्या कार्यरत असलेल्या प्रशिक्षीत पदवीधर क्रीडा शिक्षकांची संख्या किती आहे,
(२) प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांमधील सर्वसामान्य प्रशिक्षित पदवीधारांना उच्च वेतनश्रेणी देण्याचा निर्णय महानगरपालिका प्रशासनाने घेतला असून त्याची अंमलबजावणी सुरु केली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, इतर शिक्षकांप्रमाणेच बी.पी.एड धारक प्रशिक्षित पदवीधर क्रीडा शिक्षकांना उच्च वेतनश्रेणी देण्याबाबतचा निर्णय शिक्षण समितीच्या बैठकीत कोकण विभाग शिक्षक मतदारसंघाचे लोकप्रतिनिधी यांच्या समक्ष झाला होता, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, क्रीडा शिक्षकांना उच्च वेतनश्रेणी माहे डिसेंबर, २०१५ पासून देण्याबाबत घोषणा शिक्षणाधिकारी श्रीमती शांभवी जोगी यांनी केली होती, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, अद्यापही याबाबतची कार्यवाही न करण्याची व लोकप्रतिनिधीची दिशाभूल व फसवणूक करण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) सद्य:स्थितीत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांमध्ये २८६ प्रशिक्षित पदवीधर क्रिडा शिक्षक कार्यरत आहेत.

(२) होय, हे खरे आहे.

महापालिकेच्या इयत्ता ५ वी ते ७ वी च्या वर्गाकरिता शिक्षक वर्गाच्या आवश्यक एकूण अनुज्ञेय पदांपैकी २५% पदांना पदवीधर शिक्षकांसाठीची वेतनश्रेणी शासनाच्या धोरणाप्रमाणे अनुज्ञेय केली आहे.

(३) हे खरे नाही.

(४) हे खरे नाही.

(५) क्रीडा शिक्षकांना उच्च वेतनश्रेणी देण्याबाबतची प्रशासकीय कार्यवाही महापालिकेमार्फत सुरू असल्याने लोकप्रतिनिधींची दिशाभूल व फसवणूक करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील मैदाने व उद्याने खाजगी संस्था व कंपन्यांना देण्याचा महानगरपालिकेने ठराव घेतल्याबाबत

**(१७) * १५२५७ श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.कपिल पाटील, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.संजय दत्त, श्री.अमरिशभाई पटेल, श्री.हरिसिंग राठोड, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.प्रकाश गजभिये, श्री.रामराव वडकुते, श्री.राजेंद्र जैन, श्री.ख्वाजा बेग, श्री.संदिप बाजोरिया, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.आनंद ठाकूर, अॅड.राहुल नार्वेकर, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या ताब्यातील मोकळ्या जागा, मैदाने आणि उद्याने खाजगी कंपन्यांना देण्याचा ठराव महानगरपालिकेने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ही मैदाने व उद्याने प्राधान्याने लगतच्या शाळांना देण्याच्या मागणीबाबत शासनाचे काय धोरण आहे,

(३) मुंबईतील मैदाने, उद्याने खासगी संस्थांना दत्तक देण्याच्या महानगरपालिकेच्या धोरणाला मा.मुख्यमंत्री यांनी स्थगिती देऊन २३५ मैदाने ताब्यात घेण्याचे आदेश महापालिकेला दिले असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, आदेश दिल्यानंतर आयुक्तांनी किती भूखंड परत घेतलेले आहेत व किती भूखंड ताब्यात घेणे बाकी आहे,

(५) असल्यास, मुंबईतील महानगरपालिकेचे सर्व मैदाने महापालिकेने ताब्यात घेऊन त्यांची देखभाल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) असल्यास, सदरहू कामात दिरंगाई करणाऱ्या अधिकाऱ्यांवर, कर्मचाऱ्यांवर तसेच अजुनही भूखंड ताब्यात ठेवलेल्या संस्थांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) बृहन्मुंबई महानगरपालिकेने उद्याने, मनोरंजन मैदाने व खेळाची मैदाने यासाठी राखीव असलेले भूखंड दत्तक तत्वावर देण्याबाबतचे धोरण ठरविले आहे.

सदर धोरणानुसार भूखंड दत्तक तत्वावर घेण्यासाठी शैक्षणिक संस्था अर्ज करु शकतात.

(३) मुंबई शहरातील दत्तक तत्वावर दिलेल्या भूखंडांपैकी ज्या भूखंडांची मुदत संपली आहे असे भूखंड परत घेण्याचे तसेच महानगरपालिकेने मंजुर केलेल्या धोरणाचे पुनर्विलोकन करण्याचे आदेश बृहन्मुंबई महानगरपालिकेस दिले आहेत.

(४) बृहन्मुंबई महानगरपालिकेने एकूण ६० भूखंड ताब्यात घेतले असून १५६ भूखंड टप्प्याटप्प्याने ताब्यात घेण्यात येणार आहेत.

(५) सद्य:स्थितीत महापालिकेच्या ताब्यात असलेले भूखंड महापालिकेमार्फत परिरक्षित करण्यात येत आहेत.

तसेच सर्व भूखंड परिरक्षित करण्याकरिता ठेकेदाराची नेमणूक करण्याकरिता महापालिकेमार्फत निविदा प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे.

(६) व (७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मंगरुळपीर (जि.वाशिम) येथील सावित्रीबाई शैक्षणिक संस्थेची बनावट कागदपत्रे आणि खोटे शिक्के बनवून फसवणूक करणा-यांवर कारवाई करण्याबाबत**

**(१८) * १५२६८ श्री.नागो गाणार, श्री.अनिल सोले, श्री.रामनाथ मोते : तारांकित प्रश्न क्रमांक ११०७८ ला दिनांक १६ डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंगरूळपीर (जि.वाशिम) येथील सावित्रीबाई शैक्षणिक संस्थेची बनावट कागदपत्रे आणि खोटे शिक्के बनवून वाशिम जिल्हा परिषदेचे माजी शिक्षणाधिकारी (माध्य.) श्री.संजय तेलगोटे व अमरावती विभागाचे माजी शिक्षण उपसंचालक श्री.राम पवार यांनी इतरांशी संगनमत करुन लाखो रुपयांची अफरातफर करुन शासनाची फसवणूक केल्याबद्दल पोलीस विभागाने १४ जणांवर गुन्हे दाखल केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणात कोणकोणते पदाधिकारी, अधिकारी सामिल आहेत,

(३) तसेच या प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय किंवा तसे आदेश देण्यात आले आहे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी पोलीस स्टेशन, मंगरुळपीर येथे अप. क्र. २४६/१५ भा.दं.वि. कलम ४२०, ४६६, ४६७, ४७१, ४७३, ४८१, १८१, ४७४, ४०९, ३४ अन्वये १४ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर प्रकरणात सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ, मंगरुळनाथ ह्या संस्थेचे माजी सचिव, तत्कालिन गटशिक्षणाधिकारी, वाशिम, तत्कालिन माध्यमिक शिक्षणाधिकारी, वाशिम, तत्कालिन शिक्षण उपसंचालक, अमरावती विभाग, अमरावती, तत्कालिन शिक्षणाधिकारी, वाशिम, यांचा समावेश आहे.

(३) होय, गुन्हयाची चौकशी करण्यात आली असून गुन्हा पोलीस तपासावर प्रलंबित आहे.

-----------------

## श्री.स्वामी विवेकानंद एसआरए सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.च्या पुनर्वसन प्रकल्पासाठी नवीन विकासक नेमणेबाबत

**(१९) * १४९३३ श्री.जयवंतराव जाधव : तारांकित प्रश्न क्रमांक १११५३ ला दिनांक १६ डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्री स्वामी विवेकानंद एसआरए सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या विवेकानंद नगर, वाकोला ब्रिज, मुंबई या संस्थेने झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पासाठी नेमलेल्या मे.जेमिनी बिल्डर्स या विकासकाने केलेल्या फसवणुकीमुळे त्याच्यावर कारवाई करून नवीन विकासकाची नेमणूक करण्याची लोकप्रतिनिधींनी माहे जुलै, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मैं.जेमिनी बिल्डर्स यांनी ७० टक्के संमतीने निवड केल्याबाबत ठराव सादर न केल्यामुळे तसेच प्रत्यक्ष सर्वेमध्ये ७० टक्के संमती नसल्यामुळे त्यांचे परिशिष्ट-२ रद्द करणेबाबत अप्पर जिल्हाधिकारी यांनी आदेश पारित केलेला असतांनाही एस आर ए च्या अधिकाऱ्यांनी बेकायदेशीररित्या इरादापत्र व आयओए परवाने दिल्यामुळे सदर प्रकरणाची चौकशी करण्याची लोकप्रतिनिधींनी माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय निदर्शनास आले व तद्नुसार संबंधितावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,

(५) तसेच, सदर झोपडपट्टीवासीयांच्या पुनर्वसनासाठी विकासक बदलून प्रकल्प पूर्ण करण्याकरिता शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) मा.विरोधी पक्षनेता, विधान परिषद यांचे दिनांक ३१.०७.२०१५ रोजीच्या पत्रासोबत मा.सदस्यांचे या संदर्भातील निवेदन झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे प्राप्त झाले आहे.

(२) मा.विरोधी पक्षनेता, विधान परिषद यांचे ऑक्टोबर, २०१५ मधील पत्र शासनास प्राप्त झाले आहे.

(३) व (४) कोले कल्याण, सांताक्रुझ येथील न.भू.क्र. ८८, ८९, ९० या मिळकतीवरील झोपडीधारकांनी सन २००३ मध्ये स्वामी विवेकानंद सह.गृह. संस्था स्थापन करुन बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावली, १९९१ विनियम ३३(१०) अन्वये झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्याबाबत विकासक मे. जेमिनी डेव्हलपर्स यांचे बरोबर दिनांक ३.८.२००३ रोजी विकास करारनामा केलेला आहे. त्यानुसार विकासकाने दिनांक १९.५.२००४ रोजी योजनेचा प्रस्ताव झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास सादर केला होता. या योजनेबाबत अपर जिल्हाधिकारी, (अति/निष्का) पश्चिम उपनगरे यांनी दिनांक १६.३.२००४ अन्वये प्रमाणित केलेल्या परिशिष्ट-२ नुसार १४६ पात्र झोपडीधारकांपैकी १०५ झोपडीधारकांनी संयुक्त लेखी संमती दिल्यानुसार प्राधिकरणाने या योजनेस दिनांक १६.१.२००६ रोजी आशय पत्र दिलेले आहे.

अपर जिल्हाधिकारी, (अति/निष्का) पश्चिम उपनगरे यांनी दिनांक २६.१०.२००६ अन्वये सदर योजनेचे परिशिष्ट-२ रद्द करावे असे कळविण्यापूर्वीच झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने योजनेला आशयपत्र दिल्याचे दिसून येते.

(५) व (६) विवेकानंद सहकारी गृहनिर्माण संस्थेने सदरहू योजनेचे विकासक बदलण्यासंदर्भात केलेल्या तक्रारीनुसार दिनांक ३.४.२०१५ रोजी गुप्त मतदान घेण्यात आले. त्यामध्ये विकासक बदलण्याच्या बाजूने ५३ टक्के मतदान झाले. यास्तव मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांनी दिनांक २०.८.२०१५ रोजीच्या आदेशान्वये विकासक बदलण्याची विनंती अमान्य केली आहे. या प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांच्या आदेशाविरुध्द मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार गठीत उच्चस्तरिय समितीकडे संबंधितांनी अपील क्र.९/२०१५ दाखल केलेले आहे. या अपिलावरील निर्णयानुसार पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.

-----------------

**पुणे महापालिकेच्या ताब्यात असलेल्या सदनिका**
**वापराविना पडून असल्याबाबत**

**(२०) * १५६९९ ॲड.जयदेव गायकवाड, श्री.हेमंत टकले, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.रामराव वडकुते :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुण्यात विविध योजनेच्या माध्यमातून महापालिकेच्या ताब्यात असलेल्या ९ हजार सदनिका वापराविना पडून असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ च्या शेवटच्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय निदर्शनास आले व तद्नुसार सदर इमारतींचा वापर करुन महापालिकेच्या उत्पन्नात वाढ व्हावी म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) पुणे महानगरपालिकेकडे एकुण २५४० सदनिका उपलब्ध असून, सदर सदनिका रस्तारुंदी व इतर महानगरपालिकेअंतर्गत प्रकल्पबाधितांना पुनर्वसन करण्यासाठी उपलब्ध आहेत.

(२) व (३) सदर सदनिकांचा उद्देश प्रकल्पबाधितांच्या पुनर्वसनासाठी आहे. याकरिता पुणे महानगरपालिकेच्या विविध प्रकल्पांनी बाधित/विस्थापित व्यक्तींच्या मागणीनुसार सदनिकांचे वाटप करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**परभणी जिल्हयातील सोनपेठ व वाघाळा येथील पोलीस अत्याचार प्रकरणाबाबत**

**(२१) * १५०३७ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्हयातील सोनपेठ व वाघाळा प्रकरणी पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी निष्पाप व्यक्तींना आत्महत्या करण्यास भाग पाडणे, दंगल घडविण्यास कारणीभूत असणे, अटकेपूर्वी मानवी हक्क आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वाचा भंग करणे व इतर प्रकार केल्यावरून त्यांची उच्च स्तरावरून पुर्नचौकशी करण्यात यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी सन २०१५ मध्ये वा त्यादरम्यान मा.गृहराज्य मंत्री (ग्रामीण) यांच्याकडे लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वरील सर्व मुद्दयांप्रमाणे उच्च स्तरावरून पुर्नचौकशी करून दोषी पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) प्रश्नात नमूद निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**सचिन माळी आणि शितल साठे यांच्यावरील देशद्रोहाचे आरोप मागे घेण्याबाबत**

**(२२) * १५१२७ श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सचिन माळी आणि शितल साठे यांच्यावरील नक्षलवादाचे व देशद्रोहाचे आरोप मागे घेण्याबाबत राज्यातील विचारवंत, साहित्यिक व सामाजिक नेत्यांनी मा.मुख्यमंत्र्यांकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागणीचे स्वरुप व त्यावर शासनाचे काय धोरण आहे,

(३) हिंसा व सशस्त्र चळवळीत सक्रिय नसलेल्या कार्यकर्त्यावरील खटले मागे घेऊन त्यांचे अभिव्यक्ती व लोकशाही स्वातंत्र्य सुरक्षित करण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) यासंदर्भात मा.श्री.कपिल हरिश्चंद्र पाटील, विधान परिषद सदस्य यांनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे मागणी केल्याचे पत्र प्राप्त झाले आहे.

(२) व (३) सचिन माळी व शितल साठे यांच्यावरील सर्व आरोप आणि गुन्हे मागे घेण्याबाबत सदर पत्रान्वये विनंती केली आहे.

दहशतवाद विरोधी पथक पो.स्टे. गु.र.नं. १९/२०११ कलम ३८७, ४१९, ४६५, ४६७, ४६८, ४७१ सह १२० (ब) भा.दं.वि.स.सह कलम १०, १३, १७, १८, १८(A), १८(B), २०, २१ ३८ ३९ व ४० (२) बेकादेशीर कारवाया (प्रतिबंध) कायदा १९६७ अन्वये दाखल गुन्ह्यात एकूण ११ आरोपीविरुद्ध सचिन माळी व शितल साठे यांच्यासह गुन्हा दाखल केलेला आहे. सदर आरोपी हे भारत सरकारने बंदी घातलेल्या सीपीआय (माओ) या संघटनेचे क्रियाशील सदस्य आहेत.

अटक आरोपीविरुद्ध दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून न्यायालयात सुनावणी सुरू असून सदरचा गुन्हा न्यायप्रविष्ट आहे. मा.सदस्यांनी दिलेल्या निवेदनावर कायदा आणि प्रचलित धोरण याच्या अधिन राहून तपासण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

-----------------

## मानवी हक्क न्यायालयाची स्थापना करण्याची केलेली सूचना अंमलात न आल्याबाबत

**(२३) * १४९६१ डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने मानवी हक्क संरक्षण कायद्यानुसार सन २००१ मध्ये अधिसूचना जारी करुन प्रत्येक जिल्हयात मानवी हक्क न्यायालयाची स्थापना करण्याची केलेली सूचना कागदावरच असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मानवी हक्कासंदर्भात दावे तात्काळ निकाली निघावेत यासाठी जिल्हावार मानवी हक्क न्यायालये स्थापन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) सदर अधिसूचना दिनांक ३०/०५/२००१ रोजी निर्गमित करण्यात आलेली आहे.

(२) मानवी हक्क संरक्षण अधिनियम १९९३ अन्वये दाखल प्रकरणे निकाली काढण्याकरिता राज्यातील प्रत्येक जिल्ह्यांतील “सत्र न्यायालय” हे “मानवी हक्क न्यायालय” म्हणून सदर अधिसूचनेन्वये विर्निदिष्ट करण्यात आलेले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मोहोपाडा येथील रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड कंपनीतील**
**कंत्राटी कामगारांच्या संपाबाबत**

**(२४) * १५७६६ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले, श्री.ख्वाजा बेग, श्री.प्रकाश गजभिये, श्री.किरण पावसकर, श्री.सुनिल तटकरे, श्री.विक्रम काळे : तारांकित प्रश्न क्रमांक १२२४३ ला दिनांक १६ डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (जि. रायगड) येथील औद्योगिक परिसरातील मोहोपाडा येथील रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड कंपनीतील कंत्राटी कामगारांचा संप अनेक महिन्यापासून सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर संप मिटवणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) कंत्राटी कामगारांचा संप अनेक महिन्यापासून सुरु आहे असे म्हणणे उचित होणार नाही. दि. ०९ मे, २०१५ रोजी १७८४ कंत्राटी कामगारांनी संप सुरु केला होता. माहे जुलै-ऑगस्ट, २०१५ दरम्यान मुख्य मालकाच्या आस्थापनेने अर्थात मे. रिलायन्स इंडस्ट्रिज लि. यांच्या पेट्रोलियम व पॉलिएस्टर डिव्हीजन या दोन आस्थापनांना त्यांच्याकडील एकूण १४८ ठेकेदारांपैकी ४६ कंत्राटदारांच्या सेवा कराराप्रमाणे न दिल्यामुळे संपुष्टात आणल्या. त्यामुळे त्यांच्याकडील संपावर आणल्या. त्यामुळे त्यांच्याकडील संपावर असलेल्या १५६१ कंत्राटी कामगारांना कायदेशीर देणी देऊन (रु. २२.०१ कोटी) त्यांच्या सेवा कंत्राटदाराने संपुष्टात आणल्या. उर्वरित संपातील २२३ कामगार हे टप्प्याटप्प्याने त्यांच्या संबंधित ठेकेदारांकडे पूर्ववत कामावर रुजू झाले आहेत.

तसेच ४६ पैकी १७ ठेकेदारांनी मा.औद्योगिक न्यायालय, ठाणे येथे सदर संप बेकायदेशीर असल्याचे जाहीर करण्याबाबत अर्ज केला. सदर अर्ज प्रलंबित आहे.

तसेच दि. १५/०९/२०१५ रोजीच्या संयुक्त बैठकीत कामगार उप आयुक्त, रायगड कार्यालयातील बैठकीत कामगार संघटना प्रतिनिधींनी सांगितले की, संपातील कंत्राटी कामगारांना काढून टाकल्याने व मुद्दा कालबाह्य झाल्याने प्रकरण बंद करावे व तसे प्रकरण बंद करण्यात आले.

ज्या १५६१ कंत्राटी कामगारांच्या सेवा संपुष्टात आणून त्यांना कायदेशीर देणी ४६ ठेकेदारांनी दिली होती. त्या कंत्राटी कामगारांनी तसेच इतर ९७ कंत्राटी कामगारांनी कामगार उप आयुक्त, रायगड येथे औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ च्या कलम २-के नुसार त्यांना पूर्ववत कामावर घेण्याबाबत समेट कारवाई करण्यासाठी अर्ज दिला आहे. अर्जामध्ये त्यांनी सदरची मागणी मुख्य मालक अर्जामध्ये त्यांनी सदरची मागणी मुख्य मालक मे. रिलायन्स इंडस्ट्रिज लि. (पेट्रोलियम व पॉलिएस्टर डिव्हीजन) व संबंधित ठेकेदार यांना पक्षकार करुन केली आहे.

(२) होय. चौकशी केली आहे.

(३) संपामध्ये तडजोड घडवून आणण्याच्या दृष्टीने कामगार विभागाच्या सर्व स्तरांवर बैठकांचे आयोजन करण्यात आले होते. तसेच मा.कामगार मंत्री महोदय यांचेकडे देखील बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. संघटनेने कमी केलेली कंत्राटी कामगारांना रिलायन्स इंडस्ट्रीज यांनी पूर्ववत कामावर घ्यावे ही मागणी समेट कार्यवाहीमध्ये सादर केली असून त्यावर समेट कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत झालेल्या कोट्यवधी रुपयांच्या गैरव्यवहाराच्या तपासाबाबत**

**(२५) * १६१७५ श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार निदर्शनास आल्यानंतर जवळपास १३१ प्रकरणांमध्ये विविध पोलीस ठाण्यामध्ये गुन्हे दाखल झाले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापैकी १२४ गुन्ह्यांचा तपास पूर्ण झाला असून इतर ७ गुन्ह्यांचा तपास चालू आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, १२४ प्रकरणांचा तपास योग्य पध्दतीने पूर्ण न झाल्याचे SIT ने तपासाअंती सांगितले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणामध्ये काही फाईली मुद्दाम गहाळ केल्याचे जिल्हा पोलीस अधीक्षकांच्या निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, या सर्व प्रकरणांमध्ये SIT ने व शासनाने तपासाअंती काही कार्यवाही केली आहे काय,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) होय.

(३), (४) व (५) SIT पथकातील अधिकारी यांनी १२४ गुन्ह्यांच्या कागदपत्रांची पडताळणी केली असता १०५ गुन्ह्यात दोषारोप दाखल केले आहे. उर्वरीत ३ गुन्ह्यांत अ वर्गात अंतिम अहवाल, १ गुन्ह्यांत ब वर्गात अंतिम अहवाल व १५ गुन्ह्यात क वर्गात अंतिम अहवाल पाठविला असुन सदर गुन्ह्यांत वेगवेगळ्या प्रकारच्या तपासाच्या त्रुटी निदर्शनास आलेल्या आहेत. सदर त्रुटीची पुर्तता करण्यात येत आहे.

प्रकरणी ४ गुन्ह्यांच्या मुळ फाईली संबंधित गुन्ह्याचे तपास अंमलदार यांनी मा.न्यायालयात दाखल केले नसल्याचे निदर्शनास आल्याने तपास प्रमुखांनी तसा अहवाल सादर केलेला आहे. सदर गुन्ह्याचे कागदपत्र तत्कालीन तपास अंमलदार यांचे कडून प्राप्त करण्यात येत आहेत. प्राप्त कागदपत्रानुसार गुन्ह्याचा पुढील तपास सुरू आहे.

४ गुन्ह्याचे संबंधित तपासीक अंमलदार यांनी निष्काळजीपणा केल्याचे निदर्शनास आल्याने त्यांचेविरुद्ध सखोल चौकशी करुन खात्यांतर्गत कारवाई करण्यात येत आहे.

(६) विलंब नाही, विशेष तपास पथका द्वारे तपासाची पुढील कार्यवाही चालु आहे.

-----------------

## बृहन्मुंबई व ठाणे जिल्हयासाठी असलेल्या सुरक्षा रक्षक मंडळाच्या कार्यालयातील प्रसाधनगृहांची दुरुस्ती खर्चात झालेला गैरव्यवहार

**(२६) * १४६७५ श्री.विजय उर्फ भाई गिरकर, श्री.हरिसिंग राठोड, श्री.संजय दत्त, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई व ठाणे जिल्हयासाठी असलेल्या सुरक्षा रक्षक मंडळाच्या कार्यालयातील प्रसाधनगृहांची दुरुस्ती खर्चात लाखो रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे दिनांक ११ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी रितसर निविदा प्रक्रियेचा अवलंब करण्यात आला नसून तसेच मंजूर केलेल्या कोटेशनपेक्षा जादा बील अदा करण्यात आल्याचा प्रकार निदर्शनास आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रसाधनगृहाच्या दुरुस्तीची चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय निदर्शनास आले व त्यानुसार कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) अशा आशयाच्या बातम्या दैनिक "पुढारी" "संध्याकाळ", "आपल महानगर" या स्थानिक वृत्तपत्रांच्या अनुक्रमे दिनांक १२/०१/२०१६, १३/०१/२०१६ व दिनांक १४/०१/२०१६ रोजीच्या आवृत्यांमध्ये प्रसिध्द झाल्याचे शासनाच्या निदर्शनास आणून देण्यात आले आहे, हे खरे आहे.

(२), (३) व (४) सुरक्षा रक्षक मंडळ, बृहन्मुंबई व ठाणे या मंडळाचे मध्यवर्ती कार्यालय सानपाडा रेल्वे स्टेशन कॉम्प्लेक्स येथे स्थानांतरीत झाल्यानंतर येथील कार्यालयासाठीच्या कार्यालयीन जागेतील प्रसाधनगृहांची दुरुस्ती करणे आवश्यक होते. त्यामुळे मंडळाने तेथील सहा प्रसाधनगृहांच्या दुरुस्तीसाठी निविदा प्रक्रिया राबवून प्राप्त झालेल्या तीन निविदांपैकी सर्वात कमी दराची निविदा देणाऱ्या कंत्राटदाराशी चर्चा करून, त्यांनी दिलेल्या दरामध्ये पाच टक्के रक्कम कपात करुन दुरुस्तीचे काम त्यांना दिले होते. तथापि, संबंधित कंत्राटदारास प्रत्यक्षात देयक अदा करताना, मुळे निविदा दरात कपात केलेली पाच टक्के रक्कम अनावधानाने अदा करण्यात आली होती. सदर बाब मागाहून निदर्शनास आल्यानंतर प्रदान करण्यात आलेल्या जादा रकमेची वसुली मंडळामार्फत संबंधित कंत्राटदारांकडून करण्यात आलेली आहे. असे असले तरीही या प्रकरणाची कामगार आयुक्त, मुंबई यांचेमार्फत चौकशी करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात सचिव पातळीवरील अधिका-यांना दौरे करुन माहिती मिळविण्यासाठी दिलेल्या आदेशाबाबत

**(२७) * १५९४१ श्री.रामराव वडकुते, श्री.प्रकाश गजभिये, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, श्री.नरेंद्र पाटील, श्री.राजेंद्र जैन, श्री.धनंजय मुंडे, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.आनंद ठाकूर, श्री.विक्रम काळे, ॲड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शासन पातळीवर घेतलेल्या निर्णयाची प्रत्यक्षात किती आणि कशारितीने अंमलबजावणी होते याची थेट भेट देऊन पाहणी करण्यासाठी यापुढे राज्यभर सचिव दर्जाच्या अधिका-यांनी दौरे करावे असे आदेश शासनाने माहे जानेवारी, २०१६ च्या पहिल्या सप्ताहात दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आतापर्यंत किती जिल्हयाचे दौरे केले व त्यात काय आढळून आले व तद्नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) दिनांक २/२/२०१६ च्या शासन परिपत्रकानुसार जिल्हयांचे पालक सचिव म्हणून दौरा करीत असतांना पालक सचिवांनी जिल्हयातील विविध कल्याणकारी योजनांच्या अंमलबजावणी संदर्भात योजनांच्या भौतिक व आर्थिक प्रगतीबाबत विस्तृत आढावा घेण्याबाबत पालक सचिवांना निर्देश देण्यात आले आहेत, त्यानुसार पालक सचिवांची दौऱ्यांवर जाणे सुरु केले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद शहरातील पुलांच्या नुतनीकरणाबाबत

**(२८) * १४८८१ श्री.सतिश चव्हाण, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे : तारांकित प्रश्न क्रमांक १३३६४ ला दिनांक २३ डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शहरातील मकई गेट, महेमुद दरवाजा, बारापुल्ला गेट येथील ऐतिहासीक वारसा असलेले तिन्ही पुलांच्या नुतनीकरणासाठी रु.२५ कोटी खर्च अपेक्षित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने अनुक्रमे सन २०१४-१५ मध्ये रु.१२.४८ कोटी व सन २०१५-१६ मध्ये ५.४९ कोटी रुपये औरंगाबाद महापालिकेस दिले परंतु त्यांनी यावर कोणतीच कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर तिन्ही पुलांसाठी महापालिकेला दिलेला निधी परत घेऊन व रु.२५ कोटी उपलब्ध करुन सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत हे काम करण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे काय,

(४) असल्यास, कधी व त्याचे स्वरुप काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) हे खरे नाही. रस्ता अनुदानाअंतर्गत औरंगाबाद महानगरपालिकेस सन २०१४-१५ व सन २०१५-२०१६ मध्ये अनुक्रमे रु.१.८५ कोटी आणि रु.५.०० कोटी इतके अनुदान वितरीत केले होते. सदर रस्ता अनुदानांतर्गत पुलांचे बांधकाम अनुज्ञेय होते. तथापि सदरहु तीनही ऐतिहासिक वारसा असलेल्या पुलाचे बांधकाम सार्वजनिक बांधकाम विभागाने करणेबाबत महानगरपालिकेने दिनांक ३१/०५/२०१२ रोजी सार्वजनिक बांधकाम विभागास ना-हरकत प्रमाणपत्र दिले आहे. त्यानुसार सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सदर पुलांचे बांधकाम करुन घेण्याची बाब विचाराधीन आहे.

(४) व (५) सदर पुलांच्या बांधकामाबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाने तिनही पुलांचे ढोबळ अंदाजपत्रक तयार केले असून निधी उपलब्धतेच्या अधिन राहून काम करण्याचे प्रस्तावित आहे.

-----------------

## जपान येथील मित्सुबीशी कंपनीच्या कचऱ्यापासून वीजनिर्मिती प्रकल्पाबाबत

**(२९) * १५५८१ श्रीमती दिप्ती चवधरी, डॉ.सुधीर तांबे, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जपान येथील मित्सुबीशी कंपनीने कचऱ्यापासून वीजनिर्मिती प्रकल्पाबाबत मा.मुख्यमंत्री यांची भेट घेऊन चर्चा केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकल्पाबाबत शासनाची भूमिका काय आहे,

(३) असल्यास, पुणे शहरात उक्त प्रकल्प राबविण्यात येणार आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नागपूर येथे कामगार कल्याण मंडळातर्फे बांधण्यात आलेल्या नाटयगृहातील स्वच्छतागृहाच्या दुरुस्तीबाबत**

**(३०) * १५१८२ श्री.अनिल सोले, श्री.मितेश भांगडिया, श्री.नागो गाणार :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथे कामगार कल्याण मंडळातर्फे नाटयगृह बांधण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याठिकाणी हजारो कामगार कुटुंबीय विविध कामांकरिता उदा. नाटयगृह, वाचनालय, शिक्षण, व्यायाम, पोहणे इत्यादी करिता येतात, हे खरे आहे काय ,

(३) असल्यास, तेथे पुरेसे स्वच्छता गृह आहेत काय, त्याच्या सफाईकडे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, स्वच्छता गृह दुरुस्ती करिता प्रस्ताव आहे काय,

(५) असल्यास, किती दिवसात करण्यात येईल ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) कामगार कल्याण भवन, राजे रघुजी नगर, नागपूर येथे पुरेसे स्वच्छता गृह आहेत. स्वच्छता गृहाच्या सफाईकडे दुर्लक्ष होत नसून सदर स्वच्छता गृहाची स्वच्छता व निगा नियमीतपणे स्वच्छता सेवकांकडून करण्यात येत असते सर्व प्रसाधनगृहे सुस्थितीत ठेवण्याबाबत स्थानिक कार्यालयांस सूचना देण्यात आल्या आहेत.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईत रस्ते अपघातांचे प्रमाण वाढत असल्याबाबत

**(३१) * १५६११ श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत सध्या २५ लाखांपेक्षा अधिक वाहने धावत असून त्यामध्ये दिवसाला ४०० ते ५०० नवीन वाहनांची भर पडत असून वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकामुळे मुंबईत सध्या रस्ते अपघात ही मोठी समस्या बनली असून माहे जानेवारी ते जुलै, २०१५ या कालावधीत १२ हजार ९९५ रस्ते अपघात होऊन त्यामध्ये २९१ लोकांना आपले प्राण गमवावे लागले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार अपघात कमी करण्याच्या दृष्टीने तसेच वाहन संख्येवर नियंत्रण आणण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) मुंबईत सध्या साधारण २६ लाख वाहने धावत असून मुंबईच्या बाहेरुन १.५ लक्ष वाहने ये-जा करीत असतात.

जानेवारी, २०१५ ते जुलै, २०१५ या कालावधीत एकूण १२,९९५ रस्ते अपघात होऊन त्यामध्ये २९२ लोकांना प्राण गमवावे लागले आहेत.

(२) व (३) अपघात घडल्यानंतर कसुरदार वाहन चालाकांविरुध्द संबंधित पोलीस ठाण्यात भारतीय दंड विधान संहिता व मोटार वाहन कायद्यान्वये वेगवेगळ्या कलमाखाली गुन्हे दाखल करण्यात येतात व त्यांचा तपास केला जातो. सर्वसाधारणपणे रस्ते अपघात हे भरधाव वेगात वाहन चालविणे, सिग्नल तोडणे, दारु पिऊन वाहन चालविणे, निष्काळजीपणे वाहन चालविणे व वाहतूकीच्या नियमांचे पालन न करणे यामुळे घडतात. तसेच, काही अपघात पादचाऱ्यांच्या चुकीमुळे (पदपथावरुन न चालणे, भुयारी मार्गाचा वापर न करणे, नेमून दिलेल्या ठिकाणावरुन रस्ता न ओलांडणे इ.) होतात. वाहतूक पोलीस मुख्यालयामध्ये क्रॅश ॲनालायझर कक्ष स्थापन करण्यात आला असून प्रत्येक अपघाताची कारणमीमांसा करण्यात येत आहे.

सन २०१३, २०१४ व २०१५ मध्ये वाहतूकीच्या नियमांचा भंग करणाऱ्या अनुक्रमे २०,४८,६०४, २१,००,३४२ व १८,५५,११० कसुरदार वाहन चालकांविरुध्द कारवाई करण्यात आलेली असून त्यांच्याकडून रुपये २३,०९,८२,८६०, रुपये २२,५९,६८,२६० आणि रुपये २१,२१,९५,९५० एवढे तडजोड शुल्क वसुल करण्यात आलेले आहे.

अपघात कमी करण्याकरीता वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्याविरुध्द मोटार वाहन कायद्यानुसार कारवाई करण्यात येते. प्रसारमाध्यमांद्वारे वाहतूक नियम पाळण्याकरीता आवाहन केले जाते. तसेच, सूचना देण्यात येत असतात. ठिकठिकाणी फलक लावण्यात आलेले असून, स्पीड ब्रेकर, झेब्रा क्रॉसिंग तयार करण्यात आलेले आहेत. तसेच, आवश्यक असेल तर पादचारी मार्ग, भुयारी मार्ग, उन्नत मार्ग यांचे प्रस्ताव महानगरपालिकेकडे पाठविण्यात येत असतात. दरवर्षी शाळा, महाविद्यालये व सामाजिक संस्था यांच्या सहभागाने रस्ता सुरक्षा सप्ताह आयोजित करण्यात येत असतो.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कल्याण-डोंबिवली महानगरपालिका हद्दीमधील बांधकाम परवानगीच्या चौकशीच्या अनुषंगाने नियुक्त करण्यात आलेल्या समितीबाबत**

**(३२) * १५२८५ ॲड.अनिल परब : तारांकित प्रश्न क्रमांक ६७५६ ला दिनांक १५ जुलै, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका हद्दीमधील बांधकाम परवानगीच्या चौकशीच्या अनुषंगाने नियुक्त करण्यात आलेल्या श्री.नांगनुरे समितीची नियुक्ती करताना तसेच श्री.अ.रा.पाथरकर, सेवानिवृत्त अधिकारी, नगररचना, चौकशी अधिकाऱ्यांची नेमणूक करताना मंत्रीमंडळाची मंजूर घेण्यात आली होती काय,

(२) असल्यास, उक्त श्री.नांगनरे समिती तसेच श्री.अ.रा.पाथरकर, सेवानिवृत्त अधिकारी, नगररचना अधिकाऱ्यांची नेमणूक कोणाच्या परवानगीने करण्यात आली होती,

(३) श्री.नांगनुरे समितीच्या चौकशी अहवालात दोषारोपीत केलेल्या कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेतील कर्मचारी यांची चौकशी करण्यात आली परंतु, याच अहवालात दोषी अधिकाऱ्यांची अद्यापी चौकशी करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अधिकाऱ्यांची चौकशी न करण्यामागणी कारणे काय आहेत,
(५) सदर समितीने सादर केलेल्या चौकशी अहवालात दोषी आढळून आलेल्यांना दोषमुक्त करण्यात येणार आहे काय,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील बांधकाम परवानग्यामधील अनियमितता बाबत आलेल्या बातम्यांच्या अनुषंगाने तत्कालीन प्रधान सचिव (नवि-१) यांच्या निदेशानुसार कल्याण -डोंबिवली महानगरपालिकेच्या मागील दोन वर्षाच्या बांधकाम परवानगी प्रकरणांची तपासणी करुन प्रत्येक परवानगी अस्तित्वात असलेल्या नियमानुसार दिलेली आहे किंवा कसे याची तपासणी करुन अहवाल सादर करण्याबाबत शासन पत्र दिनांक ०२.०३.२०१० अन्वये कोकण विभागाचे तत्कालीन उप संचालक, नगररचना श्री.नांनगुरे यांना निदेश दिले होते.

यासंदर्भात उपसंचालक, नगररचना, कोकण विभाग यांनी दिलेल्या अहवालामधील कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांबाबत चौकशी करण्यासाठी महानगरपालिकेने शासन निर्णय दिनांक ३०.०६.२००८ अन्वये विभागीय चौकशीसाठी निश्चित केलेल्या सेवानिवृत्त चौकशी अधिकाऱ्यांच्या यादीमधील श्री.अ.रा. पाथरकर, सेवानिवृत संचालक, नगररचना यांची महानगरपालिकेच्या स्तरावर नियुक्ती केली होती.

(३), (४), (५) व (६) या संदर्भात उपसंचालक, नगर रचना कोकण विभाग यांनी सादर केलेल्या अहवालात नमूद कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेमध्ये प्रतिनियुक्तीवर कार्यरत असलेल्या नगररचना संचालनालयाच्या आस्थापनेवरील तत्कालीन अधिकाऱ्यांविरुध्द विभागीय चौकशीची कार्यवाही सुरु आहे.

सदर अधिकाऱ्यांविरुध्द म.ना.से. (शिस्त व अपील) नियम, १९७९ चे नियम ८ खाली व नियम १२ मधील तरतूदीनुसार एकत्रित चौकशीसाठी दिनांक २०.०८.२०१५ च्या आदेशान्वये दोषारोप पत्र बजावण्यात आले आहे. विभागीय चौकशी पूर्ण झाल्यानंतर चौकशी अधिकाऱ्यांचा अहवाल व निष्कर्ष विचारात घेऊन, संबंधित अधिकाऱ्यांवरुध्द कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

**आर्णी नगरपरिषद (जि.यवतमाळ) प्रभाग क्र.२ मधील नागरिकांची घरे त्यांच्या नावे करण्याबाबत**

**(३३) * १५७३२ श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.रामराव वडकुते :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आर्णी नगरपरिषद (जि.यवतमाळ) प्रभाग क्र.२ मधील हद्दीत ५० ते ६० कुटुंबे मागील ३० वर्षापासून राहत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू कुटुंबे नगरपालिकेचे तसेच शासनाचे सर्व प्रकारचे कर (टॅक्स) भरत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत आर्णी नगरपरिषद तसेच शासनाकडून त्यांना सर्व प्रकारची नागरी सुविधा दिल्या जात आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर ठिकाणी राहत असलेली घरे त्यांच्या नावे करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) आर्णी नगरपरिषद (जि.यवतमाळ) प्रभाग क्र.२ मधील हद्दीत २५ ते ३० कुटूंबे वास्तव्य करीत आहेत.

(२) सदर कुटुंबाना नगरपरिषदेने पाणी उपलब्ध करून दिल्यामुळे त्यांच्याकडून पाणीपट्टी वसुली नगरपरिषदेमार्फत करण्यात येते.

(३) सदर क्षेत्रात विद्युत पुरवठा, रस्ते, पक्के नाली बांधकाम या सुविधा देण्यात आल्या आहेत.

(४) व (५) प्रभाग क्र.२ मधील ही कुटुंबे सार्वजनिक खुल्या जागेत वास्तव्य करीत आहेत. सदर कुटुंबाकडे खरेदी खताचे (मालकी हक्काचे) दस्ताऐवज उपलब्ध नसल्यामुळे त्यांच्या नावावर घरे करण्यात आली नसल्याचे मुख्यधिकारी यांनी नमूद केले आहे.

----------------

## पनवेल (जि.रायगड) येथे बनावट कागदपत्रांद्वारे जमिनीची खरेदी विक्री होत असल्याबाबत

**(३४) * १५९८२ श्री.सुनिल तटकरे, श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (जि.रायगड) येथे सब रजिस्टार कार्यालयातील अधिकारी, तहसिलदार, मंडळ अधिकरी, तलाठी तसेच बांधकाम व्यावसायिक यांच्या संगनमताने इमारती बांधकामाचे खोटे नकाशे आर्किटेक कडून बनवून इमारत न बांधताच लोकांकडून करोडो रुपये घेऊन पसार होत असल्याची तक्रार माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान पनवेल पोलीस स्थानकात करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय निदर्शनास आले आहे,

(४) तदनुसार संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२), (३) व (४) नवी मुंबई पोलीस आयुक्तालयात, पनवेल येथील सब रजिस्टार कार्यालयातील अधिकारी, तहसिलदार मंडळ अधिकारी, तलाठी तसेच बांधकाम व्यावसायिक यांच्या संगनमताने इमारती बांधकामाचे खोटे नकाशे आर्किटेक कडून बनवून इमारत न बांधताच लोकांकडून करोडो रुपये घेऊन पसार होत असल्याची तक्रार माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान पनवेल पोलीस स्थानकात कोणतीही तक्रार अगर गुन्हे दाखल नाहीत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे इन्द्रपै (सासवणे) (ता.अलिबाग, जि.रायगड) येथील शासकीय जागेतील कांदळवनाची तोड करून बेकायदेशीर पुलाचे बांधकाम सुरु केल्याबाबत

**(३५) * १४९०५ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे इन्द्रपै (सासवणे) (ता.अलिबाग, जि.रायगड) येथील गट नं.९७ लगत असलेल्या शासकीय जागेतील कांदळवनाची तोड करून बेकायदेशीर पुलाचे बांधकाम सुरु केल्याबाबत श्री.राकेश कुमार कुलदीप सिंग वधावन व त्यांचे व्यवस्थापक विजय पद्माकर म्हात्रे यांच्याविरुद्ध तहसिलदार, अलिबाग यांनी दिनांक ४ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास एफआयआर दाखल करून मांडवा सागरी पोलीस ठाण्यात गुन्ह्याची नोंद केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गुन्हा नोंदविल्यानंतर पोलिसांकडून उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार बेकायदेशीर सुरु असलेल्या पुलाचे बांधकाम थांबविण्यात आले आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे खरे आहे.

आरोपी श्री.राकेशकुमार कुलदीपसिंग वधावन यांच्याविरुध्द नायब तहसिलदार, अलिबाग यांनी फिर्याद दिल्यानुसार मांडवा सागरी पोलीस ठाणे येथे कॉ.गु.र.नं. २८/२०१५, महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ५२, ५३, ५४ व ५५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर गुन्ह्यातील आरोपीस सीआरपीसी कलम ४१ (१) अ प्रमाणे नोटीस बजावण्यात आलेली असून गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

(३) होय.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गोंदिया जिल्ह्यातून अपहरण केलेल्या तरुणीवर पुण्यात सामुहिक बलात्कार झाल्याच्या घटनेबाबत

**(३६) * १५९१७ श्री.राजेंद्र जैन, श्री.रामराव वडकुते, श्री.प्रकाश गजभिये, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.संदिप बाजोरिया :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्ह्यातून अपहरण केलेल्या तरुणीवर पुण्यात सामुहिक बलात्कार करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर प्रकरणातील आरोपीवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) फिर्यादी महिलेने दिलेल्या रिपोर्टवरुन पोलीस स्टेशन गोंदिया (श) येथे अप.क्र.२३६/२०१५ कलम ३६३, ३७६(ड) ५०६ (ब), भादंवि सहकलम ३(१) (१२) अ.जा.ज.अ.प्र.का.नुसार गुन्हा नोंद. तपासामध्ये सदर घटना घडली नसल्याचे दिसून आले आहे.

(२) होय.

(३) चौकशीमध्ये पिडीत मुलगी घरी कुणालाही न सांगता तिच्या मित्र याचेसह स्वमर्जीने दिनांक १८.१२.२०१५ रोजी गोंदिया येथून निघून पुणे येथे गेली व धनकवडी परिसरातील गणपती मंदिरात लग्न केले आहे. आईला (फिर्यादी महिला) संशय येवू नये म्हणून आईच्या मोबाईलवर चुकीचा मेसेज पाठविला आहे व तीला कोणीही पळवून नेले नाही असे तीने स्वत:चे हस्ताक्षरात महिला पंचासमक्ष लिहून दिले आहे. पिडीत मुलीच्या आई-वडीलांनीही मुलगी तिच्या मित्रासोबत पुणे येथे राहण्यास त्यांची हरकत नसल्याचे लिहून दिले आहे.

सदरहू प्रकरणात अपहरण करुन सामुहिक बलात्कार केल्याचे आरोप केलेले आरोपी व त्याचे दोन साथीदार मुले हे घटनेच्यावेळी गोंदिया येथेचे हजर असल्याचे साक्षपुराव्यावरुन व सी.सी.टि.व्ही. फुटेजवरुन तपासात निष्पन्न झाले आहे. पिडीत मुलगी हिने पुणे पोलीसांसमोर दिनांक १९.१२.२०१५ चे ७.०० वा. ते १२.०० वा. पर्यंत आरोपी व त्याचे दोन साथीदार यांनी जबरदस्तीने आळीपाळीने

बलात्कार केल्याचे सांगितले आहे. परंतु यादरम्यान पिडीत मुलगी तिच्या मित्रासोबत पुणे रेल्वेस्थानकावरुन दोघेही सोबत जात असल्याचे रेल्वेस्थानकावरील सी.सी.टि.व्ही. फुटेज मध्ये दिसून येत आहे. तसेच त्यांचे मोबाईल सीम क्रमांकाचे सी.डी.आर. व टॉवर लोकेशनवरुन सिध्द होत आहे. फिर्यादीने घटनेचे खोटे कथन करुन आरोपीविरुध्द खोटी तक्रार दिल्याचे निष्पन्न होत आहे. त्यामुळे आरोपींना अटक करण्यासाठी कोणताही पुरेसा पुरावा उपलब्ध नसल्याने आरोपींना अटक करण्यात आली नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सुरक्षेकरिता पोलीस अंगरक्षक सोबत ठेवणाऱ्या ५२ जणांनी मुंबई पोलीस दलाचे रुपये पाच कोटी थकविल्याबाबत

**(३७) * १४६४६ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सुरक्षेकरिता पोलीस अंगरक्षक सोबत ठेवणाऱ्या ५२ जणांनी मुंबई पोलीस दलाचे रुपये पाच कोटी थकवल्याची बाब दिनांक ११ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त पाच कोटी रुपयांची थकबाकी वसूल करण्यासाठी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

माहे डिसेंबर, २०१५ पर्यंत संरक्षण शुल्क थकीत असलेल्या एकूण ६२ व्यक्ती असून त्यांच्याकडे एकूण रु.५,६४,८६,०६२/- इतकी रक्कम थकीत आहे.

(२) जिल्हाधिकारी, मुंबई शहर व मुंबई उपनगर यांना संरक्षण शुल्कापोटी थकीत असलेली सदरची वसुली करण्याबाबत वेळोवेळी कळविण्यात आलेले असून त्याबाबत पाठपुरावा चालू आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**कंधार (जि.नांदेड) शहरातील पाणीटंचाईबाबत**

**(३८) * १५१२६ श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कंधार (जि.नांदेड) या शहरात सुजल निर्मल योजने अंतर्गत लिंबोटी धरणातून पाणी आणण्याचे कामास मंजूरी मिळूनही नागरिकांस पिण्याचे पाण्यासाठी भटकंती करावी लागत असून गत महिना भरापासून शहराला पाणी पुरवठा बंद असल्याचे माहे जानेवारी-२०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

कारण महाराष्ट्र सुजल निर्मल अभियान योजनेअंतर्गत कंधार शहर ते लिंबोटी धरण पर्यंतची पाईप लाईन तात्पुरत्या स्वरुपात कार्यान्वित करण्यात आली असून सदर पाईप लाईन द्वारे कंधार शहरास पाणी पुरवठा केला जात आहे.

-----------------

**राज्यातील बालगुन्हेगारीला आळा घालण्याबाबत**

**(३९) * १४८०५ श्री.माणिकराव ठाकरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हा न्यायालयांतर्गत बाल न्यायालयात माहे नोव्हेंबर २०१५ पर्यंत १०६४ खटले सुरु असून त्यामधील संशयित बालगुन्हेगारांची संख्या सुमारे दीड हजार असल्याचे दिनांक २७ जानेवारी २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बालगुन्हेगारीला आळा घालण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नाशिक शहर पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात जानेवारी, २०१३ ते डिसेंबर, २०१५ पर्यंत एकूण ४१४ बालगुन्हेगारांना वेगवेगळ्या गुन्ह्याच्या हेडखाली ताब्यात घेण्यात आले आहे.

(२) बाल गुन्हेगारी कमी करण्यासाठी शासनाकडून मुस्कान व ऑपरेशन स्माईल अशा वेगवेगळ्या स्कीम राबविण्यात येत आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**दहिवली, नेरळ (ता.कर्जत, जि.रायगड) येथे विकसित होणाऱ्या गृह प्रकल्पात भूसुरुगांचे स्फोटाने तडे जात असल्याबाबत**

**(४०) * १६०२१ श्री.महादेव जानकर, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दहिवली, नेरळ (ता.कर्जत, जि.रायगड) येथे विकसित होत असलेल्या लब्दी गार्डन या गृह प्रकल्पात भूसुरुगांचे स्फोट व ब्लस्टिंग मुळे तेथील घरांना तडे जात आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भूसुरूंग स्फोटामुळे दहिवली गावातील शेतकरी जखमी झाले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर गृह प्रकल्प बांधताना सुरुंग स्फोट करण्यासाठी संबंधित बिल्डरने जिल्हाधिकारी किंवा तत्सम अधिकारी यांची परवानगी घेतली नसून तेथील ग्रामस्थांनी याबाबत जिल्हाधिकारी, रायगड व तहसिलदार, कर्जत तसेच नेरळ पोलीस स्टेशन यांच्याकडे वारंवार तक्रार करूनही कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार भुसूरूंगाचे स्फोट घडविणाऱ्या लब्दी गार्डनच्या विकासकाविरूध्द व सर्व संबंधीत दोषींविरूध्द कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.
(२) भूसुरुंग स्फोटामुळे दहिवली गावातील एकजण किरकोळ जखमी झाले आहेत.
(३), (४) व (५) अध्यक्ष, मानवाधिकार नागरीक प्रकल्प रायगड यांचा अर्ज तहसीलदार कर्जत यांना प्राप्त झाला आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक यांच्याकडे चौकशीकरिता सदर अर्ज देण्यात आला. याबाबत चौकशी करण्यात आली असून

भुसुरुंगाचे स्फोट घडविणाऱ्या लब्दी गार्डनच्या विकासकाविरुध्द व सर्व संबंधित दोषीविरुध्द नेरळ पोलीस ठाणे येथे कॉ.गु.र.न.०९/२०१६ भादंविसं कलम २८६, ३३७, ४२७ सह भारताचा बारी पदार्थ अधिनियम १८८४ चे कलम ५(३), (ब), ६ अन्वये दिनांक १२.०१.२०१६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर गुन्ह्यातील ३ आरोपींना अटक करण्यात आलेली असून त्यांना मा.न्यायालयाने जामिनावर मुक्त केले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अमळनेर शहरातील सफाई कर्मचा-यांचे आरोग्य धोक्यात आल्याबाबत

**(४१) * १५०८२ श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमळनेर (जि.जळगाव) या शहराची लोकसंख्या सुमारे १ ते १.५ लाख असून रोज ५० टन कचरा साठतो हा कचरा साफ करण्यासाठी ३८५ सफाई कर्मचारी आहेत परंतु, साफसफाईसाठी या कर्मचाऱ्यांना हातमोजे,गमबुट, मास्क इत्यादी साहित्य नसल्यामुळे सर्व सफाई हातानीच करावी लागते त्यामुळे या सफाई कर्मचा-यांचे आरोग्य धोक्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, तद्नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अमळनेर जि.जळगाव या शहरातून निर्मित होणारा कचरा हाताळण्यासाठी नगरपरिषदेच्या कर्मचाऱ्यांना हातमोजे, गमबूट, मास्क इ.साहित्य पुरविले जात नाही, ही बाब खरी आहे.

तथापि, अशा कर्मचाऱ्यांचे आरोग्य धोक्यात आल्याची एकही तक्रार नगरपरिषदेस प्राप्त झाली नसल्याचे जिल्हाधिकारी, जळगाव यांनी कळविले आहे.

(२), (३) व (४) नाही.

तथापि, अमळनेर शहरात निर्मित होणारा कचरा हाताळण्यासाठी आवश्यक असणारे साहित्य प्रचलित धोरणानुसार उपलब्ध करुन देण्याच्या सूचना जिल्हाधिकारी, जळगाव यांना देण्यात आल्या आहेत.

-----------------

**औरंगाबाद शहरातील समांतर जलवाहिनी योजनेबाबत**

**(४२) * १५५८२ श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्ह्यात समांतर योजनेतून २४ तास पाणीपुरवठा केला जाणार असल्याने ही समांतर योजना नागरिकांसाठी असुन या योजनेचा नागरिकांवर कोणताही बोजा नसावा तसेच या योजनेची अंमलबजावणी झाली पाहिजे अशी भुमिका महानगरपालिका आयुक्तांनी मांडली असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, औरंगाबाद शहराला १५० एमएलडीच्या प्रमाणात पाणीपुरवठा करण्यासाठी जायकवाडी ते शहरापर्यंत नवीन मुख्य पाईपलाईन टाकण्याचे काम करण्यास येत असून हे काम करारानुसार सुरु नसल्याचे सांगत संबंधित महानगरपालिकेच्या वतीने समांतर कंपनीला कारणे दाखवा नोटीस देण्यात आली असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२)समांतर जलवाहीनी प्रकल्पाच्या मंजुर माईलस्टोननुसार कामांची गती राखण्यात येत नसल्याने महानगरपालिकेने सवलत धारकास डिसेंबर २०१५ मध्ये सवलत करारनाम्यातील कलम ३४.१ (अ) नुसार समाप्तीच्या उद्देशाची सूचना (नोटीस ऑफ इन्टेंशन टु टर्मिनेट) दिली आहे.

(३) व (४) औरंगाबाद महानगरपालिकेमार्फत देण्यात आलेल्या नोटीसीच्या अनुषंगाने औरंगाबाद महानगरपालिकेने निर्णय घेणे अपेक्षित आहे.

----------------

**अंबरनाथ (प.) (जि.ठाणे) भागात कोहजगांव परिसरात**
**सरकारी धान्याचा ट्रक पकडण्यात आल्याबाबत**

**(४३) * १५४३२ श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.हरिसिंग राठोड, डॉ.सुधीर तांबे, श्री.जर्नादन चांदूरकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथ (प.) (जि.ठाणे) भागात कोहजगांव परिसरात सरकारी धान्याचा ट्रक पकडण्यात आला असून पोलिसांनी ट्रकसह ३२३ तांदळाची पोती जप्त केली असून तिघांना अटक केली असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, शासनाने चौकशी करुन दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय

(२) ठाणे पोलीस आयुक्तालयातील अंबरनाथ (प.) पो.स्टे. हद्दीतील अंबरनाथ (प.) भागात कोहजगाव परिसरात सरकारी धान्याचा ट्रक ताब्यात घेऊन सदर ट्रकची शिधावाटप अधिकारी यांनी तपासणी केली असता त्यामध्ये ३२३ गोण्यांमधील एकूण वजन १५,७०० किलो किंमत सुमारे ३,४५,४००/- रूपये तसेच १२५ रिकाम्या बारदान गोण्या आढळून आल्याने शिधावाटप अधिकारी यांना सदर तांदूळ रेशनिंगचाच असल्याचा संशय आल्याने तो माल ट्रकसह जप्त केला व ट्रकच्या चालक / मालक व त्याचे सहकारी यांचे विरोधात अंबरनाथ पो.स्टे. येथे गु.र.क्र. १/२०१६ जीवनावश्यक वस्तू कायदा १९५५ चे कलम ३,७,८ व ९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्हयात ३ आरोपींना अटक करण्यात आली असून गुन्हा तपासाधीन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पोलीस कर्मचाऱ्यांना अतिअल्प मोबदला देण्यात येत असल्याबाबत**

**(४४) * १५८१३ श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.विक्रम काळे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंद ठाकूर, श्री.ख्वाजा बेग, श्री.अनिल भोसले, श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात नवीन वर्षाचे स्वागत करीत असताना पोलीसांना १५ ते १६ तास डयुटी करावी लागली तसेच अन्य बंदोबस्ताच्या वेळी १५ ते १६ तास डयुटी करावी लागत असते मात्र सदर पोलिसांना एवढी डयुटी बजावून अतिअल्प मोबदला शासनाकडून देण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पोलिसांना कर्तव्य काळानुसार मोबदला दिला जात नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पोलिसांना कर्तव्य काळानुसार मोबदला देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) राज्यातील पोलीस शिपाई ते पोलीस उपनिरीक्षक पदापर्यंतचे अधिकारी/कर्मचारी चोवीस तासाच्या कालावधीत सतत १० तासांच्या वर बंदोबस्त ड्युटी किंवा इतर कामासाठी कर्तव्यार्थ राहिल्यास त्यांना शासन निर्णय दिनांक २५-८-२०११ नुसार पोलीस शिपाई ते हवालदार यांना रु.७००/- प्रतिमाह तसेच सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक/पोलीस उपनिरीक्षक यांना रु. ८४०/- प्रतिमाह त्यांच्या वेतनाबरोबरच अतिकालीन भत्ता (आहार भत्ता) म्हणून दिला जातो.

(३) पोलीस कर्मचाऱ्यांना सध्या देय असलेल्या अतिकालीक भत्त्यामध्ये दुप्पटीने वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**हडपसर (जि.पुणे) येथील वाहतुक कोंडी सोडविण्याबाबत**

**(४५) * १५४४३ श्री.रामहरी रुपनवर, श्री.शरद रणपिसे, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.संजय दत्त, श्रीमती दिप्ती चवधरी :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हडपसर (जि.पुणे) येथील पोलीस स्टेशनसमोरच पोलीस ठाण्यात येणारे नागरिक तसेच गुन्ह्याच्या तपासातील व अपघातातील वाहने येथे रस्त्यावरच अनेक महिन्यांपासून पार्किंग केल्याने वाहतूक कोंडी होत असल्याने अपघाताचे प्रमाण वाढत असल्याचे माहे, जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील वाहतुक कोंडी सोडविण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

सन २०१५ पासून सदर ठिकाणी वाहतूक कोंडीमुळे एकही अपघात झालेला नाही.

(२) पोलीस स्टेशनच्या बाजूचा रस्ता व समोरील बाजूस दिनांक २९.६.२०१५ पासून नो-पार्किंग करण्यात आलेली आहे. पोलीस स्टेशनच्या जवळ असलेल्या गाडीतळ चौकात दोन पोलीस अंमलदार नेमण्यात येतात. पोलीस स्टेशनजवळील वाहतूक संथ होताच त्याच्याकडून सुरळीत केली जाते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**ठाणे जिल्हयातील पर्यटन स्थळांची डागडुजी करण्याबाबत**

**(४६) * १५८७१ ॲड.राहुल नार्वेकर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.रामराव वडकुते, श्री.ख्वाजा बेग, श्री.आनंद ठाकूर, श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हयातील पर्यटन स्थळांची डागडुजी व नवा साज देण्याबाबत मा.पालकमंत्री (जि.ठाणे) यांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांची बैठक घेण्याबाबत जिल्हाधिकारी यांना सूचना दिल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने आराखडा तयार केला आहे काय,

(३) असल्यास, आराखडयानुसार किती कालावधीत ठाणे जिल्ह्यातील पर्यटन स्थळांची डागडुजी व नवा साज देण्याचे काम पूर्ण करण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वर्धा शहराला लागून असलेल्या ग्रामपंचायती मधील अभिन्यासातील भूखंडाला नगर भूमापन विभागाची परवानगी देण्याबाबत

**(४७) * १५१७७ श्री.मितेश भांगडिया, श्री.अनिल सोले, श्री.नागो गाणार :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वर्धा (जि.वर्धा) शहराला लागून असलेल्या ११ ग्रामपंचायती मधील अभिन्यासांना नगर रचना विभागाने परवानगी देण्याचे नाकारले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त ग्रामपंचायतीच्या अखत्यारीत असलेल्या या सर्व अभिन्यासांना उप विभागीय अधिकाऱ्यांनी आपल्या कार्यकाळात परवानगी दिलेली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अभिन्यासातील भूखंडांना नगर रचना विभागाने परवानगी नाकारल्यामुळे अनेक भूखंड धारकांना भूखंडावर बांधकाम करता येत नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या अभिन्यासातील भूखंडाच्या नकाशांना नगर रचना विभागाद्वारे परवानगी देण्यात येणार आहे काय,
(५) नसल्यास, पर्यायी उपाययोजना कोणती ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) वर्धा शहराला लागून असलेल्या ११ ग्रामपंचायती मधील जमिनींसाठी जिल्हाधिकारी, वर्धा यांनी दिनांक १७.०५.१९९५ रोजी मंजुरी दिलेला परिसर नकाशा अंमलात आहे. या परिसर नकाशानुसार तसेच लागू विकास नियंत्रण नियमावलीनुसार असलेले अभिन्यास व अशा अभिन्यासातील भूखंडांवर बांधकाम परवानगी, यासाठी मंजूरीची शिफारस

नगररचनाकार, वर्धा यांचेकडून करण्यात येते. तथापि, काही प्रकरणांमध्ये मंजूर परिसर नकाशा व विकास नियंत्रण नियमावली प्रमाणे आवश्यक ती पुर्तता होत नसल्याने त्यातील भूखंडांच्या बांधकाम परवानगी प्रस्तावास नगररचनाकार कार्यालयांकडून शिफारस करण्यात येत नाही.

(४) व (५) अशा भुखंडावरती मंजूर परिसर नकाशा व विकास नियंत्रण नियमावली यांचेशी सुसंगत असा सुधारीत अभिन्यास सादर केल्यास नियमानुसार परवानगी शिफारस करता येईल.

-----------------

**शासनाने जाहीर केलेल्या स्मार्ट सिटी व मेट्रोसिटी या प्रकल्पांमुळे राज्याच्या शेतीक्षेत्राची हानी होणार असल्याबाबत**

**(४८) * १५२८६ श्री.अमरिशभाई पटेल, श्री.संजय दत्त, श्री.हरिसिंग राठोड, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने जाहीर केलेल्या स्मार्ट सिटी व मेट्रोसिटी या प्रकल्पांमुळे राज्याच्या शेतीक्षेत्राची प्रचंड हानी होणार असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बाधित प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांसाठी नव्या योजना तयार करुन त्यांना पर्यायी रोजगार उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

शासनाने जाहिर केलेला स्मार्ट सिटी हा प्रकल्प प्रामुख्याने नागरी भागातील सुविधांचा दर्जा वाढविण्यासाठी असल्यामुळे, राज्याच्या शेतीक्षेत्राची प्रचंड हानी होण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### दारव्हा (जि.यवतमाळ) तालुक्यातील युवकाच्या हत्येच्या तपासाबाबत

**(४९) * १४६२७ श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दारव्हा (जि.यवतमाळ) तालुक्यातील आशुतोष राठोड या युवकाची निर्घुण हत्या करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी तपास कार्यात पोलीस कर्मचारी हलगर्जीपणा करीत असल्याने या प्रकरणाची सीआयडीमार्फत चौकशी करण्यात येणार आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) सदर प्रकरणी पोलीस स्टेशन, दारव्हा येथे गु.र.क्र.६/१६, भा.दं.वि.कलम ३०२, २०१ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून २ आरोपींना अटक करण्यात आली आहे. गुन्हा पोलीस तपासांवर प्रलंबित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### सांगली शहरातील भोंदुबाबाने एका महिलेचा विनयभंग केल्याबाबत

**(५०) * १५४०८ श्री.आनंदराव पाटील, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली शहरातील एका महिलेला प्रापंचिक अडचणीचे ज्योतिष शास्त्राद्वारे निवारण करण्यासाठी तिच्याकडून साडेचार हजार रुपये घेऊन नंतर तिचा विनयभंग करणा-या भोंदुबाबास शहर पोलिसांनी अटक केली असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, सदर भोंदुबाबाची शासनाने चौकशी करुन फौजदारी गुन्हे नोंदविण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) फिर्यादी महिलेने दिनांक ९.१.२०१६ रोजी आरोपीविरुद्ध फिर्याद दिल्यावरुन सांगली शहर पोलीस ठाणे भाग ५ गु.र.नं.०६/२०१६, भादवि कलम ४२०, ३५४(अ)(१) प्रमाणे गुन्हा नोंद केला. आरोपीस तात्काळ अटक केली आहे. गुन्हाचा तपास सुरू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**बदलापूर नगरपालिकेच्या दलित वस्ती विकास कामाला**
**जिल्हाधिकारी ठाणे यांनी स्थगिती दिल्याबाबत**

**(५१) * १५७९७ श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.रामराव वडकुते, श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बदलापूर नगरपालिकेने हाती घेतलेल्या दलित वस्ती विकास कामाला जिल्हाधिकारी, ठाणे यांनी माहे जून, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान स्थगिती दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, ही स्थगिती उठवून दलित वस्तीच्या विकास कामांना त्वरीत सुरुवात करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) या योजनेखालील चालू कामांना स्थगिती देण्यात आलेली नाही.

सन २०१५-१६ या आर्थिक वर्षासाठी नागरी दलित वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत करावयाच्या कामांबाबत बदलापूर नगरपरिषदेने दिनांक १७.०६.२०१५ रोजी ठराव केला होता.

या ठरावाबाबत जिल्हाधिकारी, ठाणे यांच्याकडे तक्रार प्राप्त झाली होती. सदर तक्रारींवर जिल्हाधिकारी, ठाणे यांनी सुनावणी घेतली व त्यांच्या दि. ०२.०१.२०१६ च्या आदेशान्वये महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ३०८(१) अनुसार सदर ठराव तहकूब केला.

(२) व (३) बदलापूर नगरपरिषदेने त्यांच्या उक्त ठरावात कामे घेताना दि. ०५.०३.२००२ च्या शासन निर्णयातील निकषांचे पालन केले नसल्याने जिल्हाधिकारी, ठाणे यांनी सदर ठराव दि. ०२.०१.२०१६ च्या आदेशान्वये तहकूब केला व उपरोक्त शासन निर्णयातील निकषांचे पालन करून कामांचा प्रस्ताव सादर करण्याचे आदेश नगरपरिषदेस दिले.

त्यास अनुसरून नगरपरिषदेने दि. ०२.०२.२०१६ च्या विशेष सर्वसाधारण सभेत नागरी दलित वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत सादर करावयाच्या कामांना मंजुरी दिली आहे.

-----------------

**कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेतील बारा बी.ओ.टी प्रकल्पांच्या चौकशी समितीचा अहवाल प्रलंबित असल्याबाबत**

**(५२) * १६४७२ श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेतील बी.ओ.टी. प्रकल्पासंदर्भात शासनाकडे प्राप्त झालेल्या तक्रारीनुसार प्रधान सचिव, नगरविकास यांनी विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली १२ बी.ओ.टी. प्रकल्पांच्या चौकशीसाठी समितीची स्थापना करून या समितीचा अहवाल एक महिन्यात शासनास सादर करण्याचे दिनांक ८ जुलै, २०१३ च्या विपप्र/कडोंम/१६१३/प्र.क्र.१०४/१३/नवी-२८ नगरविकास विभाग या पत्रान्वये आदेशित करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आयुक्त, कोकण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली शासनाने गठीत केलेल्या समितीचा चौकशी अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय,

(३) असल्यास, सदरहू अहवालातील शिफारशीनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या बांधा, वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावरील प्रकल्पांची सर्वांगीण चौकशी करुन त्याबाबतचा चौकशी अहवाल शासनास सादर करण्याबाबत शासन पत्र, दि. ०८ जुलै, २०१३ अन्वये विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांना सूचित करण्यात आले आहे.

(२) या प्रकरणी विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचा अहवाल अद्याप शासनास प्राप्त झालेला नाही.
(३) व (४) सदर अहवाल प्राप्त करुन घेण्याच्यादृष्टीने विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्याकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

-----------------

**खामगांव (जि.बुलडाणा) येथील पोलीस स्टेशन, पोलीस अधिक्षक, उपविभागीय पोलीस यांच्या करिता नवीन प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करण्याच्या प्रस्तावाबाबत**

**(५३) * १६६०२ श्री.पांडुरंग फुंडकर : तारांकित प्रश्न क्रमांक १२५७६ ला दिनांक ९ डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खामगांव (जि.बुलढाणा) येथील पोलीस स्टेशन, पोलीस अधिक्षक, उपविभागीय पोलीस यांच्या करिता नवीन प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करण्याच्या प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभाग, खामगाव यांचेकडून शासनास प्राप्त झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पोलीस स्टेशनची इमारत फार जुनी झाली असून नवीन पोलीस प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करण्याची आवश्यकता असल्यामुळे सदर प्रस्तावास मंजुरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) बुलढाणा जिल्हा पोलीस दलाअंतर्गत येत असलेल्या उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय आणि पोलीस स्टेशन खामगांव ग्रामीण उपविभाग, खामगांव या प्रशासकीय इमारतींचे बांधकाम करण्यासाठी सन २००९ मध्ये प्रस्ताव प्राप्त झाले होते.

सदरचा प्रस्ताव जुन्या दरसूचीवर आधारीत असल्याने वर नमूद बांधकामांसाठी सुधारीत दरसूचीवर आधारीत बांधकामाचे अंदाजपत्रक प्राप्त करण्यात येत असून, निधीची उपलब्धता विचारात घेवून प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**बीड शहरातील बार्शी नाका परिसरातील इमामपुरा येथील**
**रॉकेलच्या अड्डयावर पोलिसांनी टाकलेल्या छाप्याबाबत**

**(५४) * १६७०० श्री.गुरुमुख जगवानी :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड शहरातील बार्शी नाका परिसरातील इमामपुरा येथील एका रॉकेलच्या अड्डयावर पोलीसांनी टाकलेल्या छाप्यात अवैधरित्या साठवलेल्या ४४०० लिटर रॉकेलसह ९,५०,०००/- रुपयांचा माल हस्तगस्त केल्याचे दिनांक ४ फेब्रुवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणातील आरोपींना पोलिसांनी अटक केली आहे काय,

(३) असल्यास, त्यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करून शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे. परंतु छाप्यामध्ये एकुण ३८४० लीटर रॉकेल सह ६,५८,८००/- रुपये चा माल हस्तगत केला आहे.

(२) होय,

एक आरोपी अटक असून एक फरार आहे.

(३) गुन्हा दाखल करण्यात आला असुन तपास चालु आहे.

(४) विलंब झालेला नाही.

-----------------

**गेवराई (जि.बीड) नगरपरिषदेतील गैरव्यवहाराबाबत**

**(५५) * १७४९७ श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, श्री.धनंजय मुंडे : तारांकित प्रश्न क्रमांक १३७७१ ला दिनांक २३ डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गेवराई (जि.बीड) नगरपरिषदेतील गैरव्यवहाराबाबत मा.विरोधी पक्षनेता यांनी दिनांक १६ सप्टेंबर २०१५ रोजी दिलेल्या तक्रारीनुसार दिनांक १ ऑक्टोबर २०१५ रोजी जिल्हाधिकारी, बीड यांना अहवाल सादर करण्याबाबत शासनाने कळविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तक्रार अर्जातील ३५ मुद्यांच्या अनुषंगाने मुख्याधिकारी, गेवराई यांनी सादर केलेल्या प्राथमिक अहवालाबाबत जिल्हाधिकारी, बीड यांनी दिनांक ८ डिसेंबर २०१५ रोजी उपविभागीय अधिकारी यांना चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपविभागीय अधिकारी, बीड यांनी उक्त प्रकरणी केलेल्या चौकशी मधील निष्कर्ष काय आहेत,

(४) असल्यास, उक्त निष्कर्षाआधारे दोषीविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) आणि (२) हे खरे आहे.

(३), (४) व (५) तक्रारीतील मुद्यांचे स्वरुप व्यापक असल्याने या प्रकरणी चौकशी करुन अहवाल सादर करण्यासाठी उप विभागीय अधिकारी, बीड यांनी मुदतवाढ मागितल्याचे जिल्हाधिकारी, बीड यांनी नमूद केले आहे.

या प्रकरणी आवश्यक तो अहवाल प्राप्त झाल्यावर नियमानुसार यथोचित कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

**कोंढवा (जि.पुणे) येथे कार्यान्वित करण्यात येणाऱ्या कत्तलखान्याच्या व्यवस्थापनाबाबत**

**(५६) * १५१०१ श्री.अनिल भोसले, श्री.किरण पावसकर, श्री.संदिप बाजोरिया :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेने कोंढवा येथील कत्तलखाना कार्यान्वित करण्यासाठी [making the existing machnical slaughter house operational] मशिनरी पुरविण्याकरिता ट्रान्सपोर्टटेशन, इंस्टोलेशन, लेबर चार्ज, सर्व करांसह, सेवा प्रशिक्षण व वार्षिक [comprehensive maintainance] सह काम करून घेण्याकरिता निविदा मागवून रक्कम रुपये ३,३६,८८,१००/- चा करार करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१६ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणेकरांचे कोट्यवधी रुपये खर्च करून कार्यान्वित करण्यात येणाऱ्या कत्तलखान्यांचे दरवर्षीचे देखभाल, व्यवस्थापन शासन कशा प्रकारे करणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

पुणे महानगरपालिकेच्या कोंढवा येथील कत्तलखाना कार्यान्वित करण्यासाठी मे. डॉ. फ्रोयब इंडिया प्रा.लि. यांचे सोबत दिनांक ११.२.२०१६ रोजी रुपये ३,३६,८८,१००/- चा करार करण्यात आला आहे.

(२) पुणे महानगरपालिकेचा कोंढवा येथील कत्तलखान्याची देखभाल मे. डॉ. फ्रोयब इंडिया मार्फत (उपरोक्त करारानुसार) करण्यात येणार आहे.

सदर कत्तलखान्यातील व्यवस्थापन पुणे महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांमार्फत करण्यात येणार आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**अकोला येथील किडनी तस्करी प्रकरणाबाबत**

**(५७) * १५३३९ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्रीमती दिप्ती चवधरी :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला येथे माहे नोव्हेंबर-डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आलेल्या किडनी तस्करी प्रकरणाचे राज्यातील अनेक शहरांमध्ये जाळे असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास त्यात काय निदर्शनास आले आहे,

(३) असल्यास, तद्‌नुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अकोला जिल्ह्यामध्ये किडनी तस्करीचे प्रकार होत असल्याबाबत तक्रारी प्राप्त झाल्या असून त्या अनुषंगाने अकोला शहरात २ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत, सदर प्रकरणी गुन्ह्याची व्याप्ती पाहून दोन तपास पथके तयार करुन गुन्ह्याचा तपास करण्यात आला आहे. गुन्ह्यांचे तपासात आरोपींनी किडनी देणाऱ्या लोकांचा शोध घेऊन त्यांना पैशाचे आमीष दाखवून त्यांची फसवणूक करुन त्यांची मूत्रपिंडरोपण शस्त्रक्रिया ह्या औरंगाबाद येथील कमलनयन बजाज हॉस्पीटल व श्रीलंका देशातील कोलंबो शहरातील नवलोक हॉस्पीटल येथे शस्त्रक्रिया केल्याच्या तपासात निष्पन्न झाले आहे. तसेच आरोपी शिवाजी कोळी, ता.वाळवा इस्लामपूर, जि.सांगली याने काही किडनी देणाऱ्यांच्या मुत्रपिंडरोपण शस्त्रक्रिया ह्या पुणे येथील इनामदार हॉस्पीटल, जहांगीर हॉस्पीटल,

रुबी हॉस्पीटल येथे केल्याचे आढळून आले. तसेच ह्या शस्त्रक्रिया करणारे काही इतर पुणे येथील दलाल सक्रिय असल्याचे तपासात आढळून आले आहे. यावरुन किडनी तस्करी प्रकरणाचे राज्यातील अनेक शहरांमध्ये जाळे असल्याची बाब निदर्शनास आली आहे.

(२) व (३) फिर्यादीचे रिपोर्टवरुन तात्काळ गुन्हे दाखल करुन गुन्ह्यात समावेश असलेल्या आरोपींना अटक करण्यात आली आहे. पोलीस स्टेशन डाबकी रोड, अकोला अप.क्र. १३४/१५, भा.दं.वि. कलम ३७०, ४१७, ४१९, ४२०, ४६८, ४७१, ३४ सह कलम महाराष्ट्र सावकारी अधिनियम २०१४ कलम ३९, ४५, ४६ गुन्ह्यात दोषारोप पत्र विशेष न्यायालयात सादर करण्यात आले आहे.

तसेच पोलीस स्टेशन जुने शहर येथील अप. क्र. १७६/१५, भा.दं.वि. कलम ४१७, ४२०, ४६५, ४६८,४१७, ३७० चा गुन्हा पोलीस अधिक्षक, राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, अमरावती यांचेकडे वर्ग करण्यात आला असून तपासावर आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वाळू तस्करांविरोधात कारवाई करणेबाबत

**(५८) * १५६९७ श्री.संदिप बाजोरिया, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अनिल भोसले, श्री.विक्रम काळे, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.सुनिल तटकरे, श्री.ख्वाजा बेग, श्री.रामराव वडकुते, श्री.रामहरी रुपनवर, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोसरे-घाटणे व लऊळ (जि.पुणे) हद्दीत डंपर (क्र.एमएच ०९ सीए १००४) बायपासवरुन माढा रोडवर तहसिलदार श्री.रमेश शेंडगे हे चालक श्री.अतुल दहिळणकर यांच्यासमवेत शासकीय वाहनातून (क्र.एमएच ४५ डी-३८) जात असताना वाळूचा ट्रक दिसल्याने त्याची तपासणीस जात असताना वाळूमाफियांनी त्यांच्या अंगावर वाहन घालण्याचा प्रयत्न केला असल्याचे दिनांक २० डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बुधवार दिनांक १३ जानेवारी २०१६ रोजी वा त्यासुमारास मु.पो.लऊळ, ता.माढा येथील कुर्डुवाडी-शेटफळ रस्त्यावर वाळू तस्करांविरोधात कारवाई करणाऱ्या जिल्हाधिकारी श्री.तुकाराम मुंढे यांच्या अंगावर ट्रक घालून जिवे मारण्याचा प्रयत्न करण्यात आल्याबाबतची लेखी तक्रार तलाठी मल्लीनाथ बंडया स्वामी यांनी कुर्डुवाडी पोलीस ठाण्यामध्ये दाखल केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एमएच ४५ डी ००३८ या ट्रक मधून बेकायदेशीर होत असलेली वाळूची वाहतूक करणारा ठेकेदार व वाळू तस्करांविरोधात कारवाई करण्यास हेतूत: विलंब करीत असल्याप्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांविरोधात काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) वाहन क्र. एमएच ४५ डी ००३८ हा ट्रक नसून तहसिलदार, माढा यांचे शासकीय वाहन आहे. सदर वाहनातून वाळूची वाहतूक करण्यात आलेली नाही.

दि. १९.१२.२०१५ रोजी डंपर क्र. एमएच ०९ सीए १००४ वाळूची चोरी करुन घेऊन जात असताना आढळून आल्याने गावकामगार तलाठी लऊळ यांनी आरोपींविरुध्द कुर्डुवाडी पोलीस ठाण्यात गु.र.नं.२०८/२०१५, भा.दं.वि. कलम ३५३,३७९,३४ अन्वये गुन्हा दाखल केला असून ३ आरोपींपैकी २ आरोपींना अटक करण्यात आली असून पोलीस कस्टडी रिमांड घेण्यात आली होती. सध्या दोन्ही आरोपी जामीनावर आहेत. तसेच एका आरोपीचा तपास चालू आहे.

दिनांक १३.१.२०१६ रोजी एमएच १२ सी.एच ११६७ वाळू चोरी करुन घेऊन जात असता त्यांना अडविण्याचा प्रयत्न केला असता ट्रक चालकाने ट्रक भरधाव चालवून फिर्यादी व साक्षीदार यांना जीवे मारण्याचा प्रयत्न केला. यासंदर्भात फिर्यादीने कुर्डुवाडी पोलीस ठाणे येथे गु.र. क्र. व १६/२०१६ भा. दं. वि. कलम ३०७, ३५२, ३७९, १८६, अन्वये गुन्हा दाखल केला असून आरोपीस अटक करण्यात आली आहे. सदर दोन्ही गुन्ह्यातील वाहने व वाळू जप्त करण्यात आलेली आहे

सदर दोन्ही गुन्ह्याचा तपास चालू असून गुन्हे पोलीस तपासावर प्रलंबित आहेत. वाळू तस्कर व ठेकेदार विरोधात कारवाई करण्यात कोणत्याही प्रकारचा विलंब झालेला नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**अंबरनाथ- बदलापूर (जि.ठाणे) या नवीन महापालिका निर्मितीच्या निर्णयाबाबत**

**(५९) * १४९८२ ॲड.निरंजन डावखरे, ॲड.अनिल परब :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथसह बदलापूर (जि.ठाणे) ही महानगरपालिका नव्याने स्थापन करण्याचा शासनाने निर्णय घेतला असल्याचे दिनांक ८ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच सदर नवीन महापालिका स्थापन करण्यास मुंबई प्रदेश विकास प्राधिकरणाने देखील अनुकूलता दर्शविली असल्याचे दिनांक १५ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अंबरनाथसह बदलापूर महापालिका नव्याने स्थापन करण्यास काही राजकीय पक्षांनी व मा.नगरसेवक लोकप्रतिनिधींनी जिल्हाधिकारी,ठाणे, प्रधान सचिव, नगरविकास विभाग, मंत्रालय यांचेकडे लेखी निवेदनाद्वारे प्रखर विरोध नोंदविला असल्याचेही माहे जानेवारी, २०१६ च्या पहिल्या आठवड्यात देखील निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) दिनांक ०१.१२.२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये अंबरनाथ बदलापूर महानगरपालिका नव्याने स्थापन करण्याबाबत विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यास समिती गठीत केली आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) होय.

सदर निवेदने विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या अभ्यास समितीच्या निदर्शनास आणून देण्यात आली आहेत.

विभागीय आयुक्तांचा अहवाल तयार करताना सदर निवेदन विचारात घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

-----------------

**मुंबईत म्हाडाच्या शिबिरात अपात्र व्यक्तींनी घुसखोरी केल्याबाबत**

**(६०) * १४८४३ श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.धनंजय मुंडे, श्री.संजय दत्त, श्री.हेमंत टकले, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.ख्वाजा बेग, श्री.आनंद ठाकूर, श्री.अनिल भोसले, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची शहर आणि उपनगरात ५६ संक्रमण शिबिरे असून या शिबिरांमध्ये सुमारे १० हजार अनधिकृत व्यक्तींनी घुसखोरी केल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या शिबिरातील घुसखोरांना पात्र-अपात्र करण्याबाबत धोरण ठरविण्यात येणार असल्याची घोषणा मा.गृहनिर्माण मंत्री यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनधिकृतपणे घुसखोरी केलेल्या व्यक्ती म्हाडाला कोणतेही भाडे न भरता या खोल्यांवर मालकी हक्क सांगत असल्याने म्हाडाने त्यांच्याकडून विशिष्ट रक्कम घेवून खोल्या कायम करण्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रस्तावावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) तसेच, या संक्रमण शिबिरातील घुसखोरांचा प्रश्न मार्गी लावण्याबाबत काय कार्यवाही केली,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) अंशत: खरे आहे.

माहे जुलै, २०१३ मध्ये संक्रमण शिबीरामध्ये ८४४८ अनधिकृत रहिवासी असल्याचे निदर्शनास आले.

(२), (३), (४), (५) व (६) अनधिकृत रहिवाशांच्या प्रश्नाच्या अनुषंगाने संक्रमण शिबिरातील अनधिकृत रहिवाशांबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यास्तव उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी गृहनिर्माण विभागास सादर केलेल्या प्रस्तावाबाबत प्राधिकरण स्तरावर प्रथम यथोचित विचार करण्याच्या सूचना म्हाडास करण्यात आल्या आहेत.

-----------------

## राज्यातील तरुणांना इसिस या दहशतवादी संघटनेत दाखल होण्यासाठी पैशांचे आमिष दाखविण्यात येत असल्याबाबत

**(६१) * १६१५५ श्री.प्रकाश गजभिये, श्री.रामराव वडकुते, श्री.संदिप बाजोरिया, श्री.ख्वाजा बेग, ॲड.अनिल परब, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.आनंद ठाकूर, श्री.माणिकराव ठाकरे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.हरिसिंग राठोड, श्री.जर्नादन चांदूरकर, श्री.जयवंतराव जाधव, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.आनंदराव पाटील, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मुंबई व पुणे येथील दहशतवाद विरोधी पथक हे दहशतवादयांचे पुढील लक्ष्य राहिल अशा आशयाचे इसिस या दहशतवादी संघटनेचे पत्र दिनांक १३ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास पुणे पोलीस विभागास प्राप्त झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जगासमोर मोठे आव्हान असलेल्या इस्लामिक स्टेट ऑफ सीरिया ॲण्ड इराक (इसिस) या दहशतवादी संघटनेत दाखल होणेबाबत राज्यातील तरुणांना लाखो रुपयांचे आमिष दाखविण्यात येत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निदर्शनास आले व तद्नुसार राज्यातील तरुण सदर संघटनेत दाखल होवू नयेत म्हणून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) दहशतवाद विरोधी पथक यांना याबाबतची कोणतीही बाब निदर्शनास आलेली नाही.

(३) इसीस या दहशतवादी संघटनेत राज्यातील तरुण दाखल होऊ नयेत म्हणून खालील उपाययोजना करण्यात येत आहेत,

अ) दहशतवाद विरोधी पथकाच्या विविध पथकांनी शाळा व महाविद्यालयांना भेटी देऊन विद्यार्थ्यांना दहशतवाद या विषयाबाबत जागृत करुन दहशतवादाबाबत पोलीसांना मदत करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

ब) युवकांना दहशतवादी संघटनेमध्ये सामील होण्यापासून परावृत्त करण्यात आले असून त्यांचे समुपदेशन करण्यात आले आहे.

क) राज्यातील अल्पसंख्यांक समाजातील धर्मगुरु, मौलवी व विद्वान लोकांशी बैठक घेऊन इसीस या दहशतवादी संघटनेविरोधी अल्पसंख्यांक समाजामध्ये प्रबोधन करण्याची विनंती करण्यात आली आहे.

ड) धार्मिक अस्थिरता निर्माण करणाऱ्या वेबसाईट, सोशल नेटवर्कींग साईटवर लक्ष ठेवले जात असून, अशा वेबसाईट सर्व्हीस प्रोव्हाडर कंपनीशी संपर्क साधण्यात येत असून धार्मिक असलोखा निर्माण करणाऱ्या इसमांविरुद्ध कायदेशीर कार्यवाही करणे तसेच दहशतवादी संघटनांमध्ये ऑनलाईन भरती करीत असल्याची संशय येत असलेल्या साईटवर लक्ष ठेवण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे येथील मुळा-मुठा नदीचे प्रदुषण रोखण्यासाठी जपानमधील कंपनीशी करारनामा करण्यात आल्याबाबत

**(६२) * १४७५१ आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.हरिसिंग राठोड, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, डॉ.सुधीर तांबे, श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.रामहरी रुपनवर, ॲड.जयदेव गायकवाड : तारांकित प्रश्न क्रमांक ३२०३ ला दिनांक २५ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील मुळा-मुठा नदीचे प्रदुषण रोखण्यासाठी जपानमधील एका कंपनीशी १००० कोटी रुपयांचा करारनामा करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासाठी ११ ठिकाणी मलनिस्सारण केंद्र व ११३.६ किमी लांबीचे मलनिस्सारण पाईपलाईन टाकण्याचे नियोजित करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबतचा प्रस्ताव शासनाने मंजूर केला आहे काय,

(४) असल्यास, किती कालावधीत हा प्रकल्प पुर्ण करण्यात येईल,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय,

पुणे शहरासाठी केंद्र शासन व जायका संस्थेबरोबर करार करण्यात आला आहे.

(२) होय.

(३) होय.

(४) सदर प्रकल्प सहा वर्षात (दिनांक ३१ जानेवारी, २०२२ पर्यंत) पूर्ण करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**शेगांव व खामगाव (जि.बुलढाणा) व मंगरुळपीर (जि.वाशिम) या नगरपरिषदांच्या हद्दीवाढीच्या प्रस्तावाबाबत**

**(६३) * १५१३२ श्री.गोपिकिशन बाजोरीया : तारांकित प्रश्न क्रमांक ७३९२ ला दिनांक १५ जुलै, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हयातील नगरपरिषद शेगांव व खामगावच्या तसेच वाशिम जिल्हयातील मंगरुळपीर हद्दीवाढीचा परिपूर्ण प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आला आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावाचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे,

(३) तसेच या प्रस्तावावर प्रत्यक्षात अंमलबजावणी केव्हापर्यंत होण्याचे अपेक्षित आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव नगर परिषदेच्या प्राप्त परिपूर्ण प्रस्तावानुसार हद्दवाढीबाबत प्राथमिक उदघोषणा दिनांक ०२/०२/२०१६ अन्वये राजपत्रात प्रसिध्द करण्यात आली आहे.

बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव हद्दवाढीचा प्रस्ताव शासनाकडे प्राप्त झालेला नाही.

वाशिम जिल्ह्यातील मंगरुळपीर नगर परषिदेच्या हद्दवाढीची प्राथमिक उदघोषणा दिनांक ३०/०६/२००९ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. तथापि या प्रस्तावास संबंधीत ७ ग्रामपंचायतींचा विरोध असल्याने अंतिम अधिसूचना प्रसिध्द करण्यात आली नाही.

(२) हद्दवाढीनंतर नगरपरिषदेच्या हद्दीलगतच्या क्षेत्रास मूलभूत सोयी सुविधा पुरविण्यासाठी हद्दवाढ करणे असे प्रस्तावाचे स्वरुप आहे.

(३) शेगाव नगरपरिषदेच्या हद्दीवाढीबाबत प्राथमिक उदघोषणेनुसार प्राप्त हरकती व सूचना यांचा विचार करुन निर्णय घेण्यात येईल.

खामगाव व मंगरुळपीर या नगरपरिषदांच्या हद्दवाढीबाबतचे प्रस्ताव जिल्हाधिकारी यांच्याकडून प्राप्त करण्यात येतील.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**नवी मुंबई येथील मरिन सेंटर या अनधिकृत इमारतीबाबत**

**(६४) * १६१८० प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई येथील मरिन सेंटर या खासगी संस्थेने सिडकोच्या जमिनीवर अनधिकृत बांधकाम करुन त्याचा व्यावसायिक कामासाठी वापर केला जात असल्याचे बाब माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, मरिन सेंटर ही इमारत बेकायदेशीर असल्याची तक्रार प्रहार विद्यार्थी संघटनेने माहे जुलै, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान केली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संस्थेने केलेले अनधिकृत बांधकाम निष्काषित करण्यासाठी नवी मुंबई महानगरपालिका व सिडको टाळाटाळ करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याच इमारतीत मरिन सेंटर या संस्थेतर्फे मागील अनेक वर्ष जहाजांवर काम करुन इच्छिणाऱ्या उमेदवारांना ए.के. ४७ आणि एस.एल.आर. सारख्या कायद्याने बंदी असलेल्या शस्त्र अस्त्रांचे प्रशिक्षण व बोगस प्रमाणपत्र दिले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या बेकायदेशीर इमारतीवर महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगर रचना कायदा १९६६ नुसार मरिन सेंटर आणि क्लब मालकावर फौजदारी गुन्हे दाखल करून ही इमारत बंद करण्याबाबत काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय,

(३) हे खरे नाही,

नवी मुंबई महानगरपालिकेने या अनधिकृत बांधकामाविरुद्ध महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ५३(१) अंतर्गत नोटीस बजावली आहे. मात्र अनधिकृत बांधकामधारकाने दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, वाशी येथे दाखल केलेल्या दिवाणी दाव्याच्या अनुषंगाने मा.न्यायालयाने या बांधकामावरील कारवाईस मनाई आदेश पारित केला आहे.

(४) होय, हे खरे आहे,

एके-४७ व एस.एल.आर. यासारख्या कायद्याने बंदी असलेल्या शस्त्रास्त्रांचे प्रशिक्षण घेतल्याचे बोगस प्रमाणपत्र उमेदवारांना देऊन फसवणूक केल्याबाबत कळंबोली पोलीस स्थानकात संबंधितांविरोधात भारतीय दंड विधानाच्या कलम ४२० खाली गुन्हा दाखल केला असून सद्यस्थितीत दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

(५) व (६) या अनधिकृत इमारतीच्या बाबतीत नवी मुंबई महानगरपालिकेने पुढीलप्रमाणे कारवाई केली आहेः-

- महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ५३(१) अंतर्गत दि.१५/०८/२००६ रोजी नोटीस बजावली.
- सदर इमारतीच्या निष्कासनासाठी विभाग अधिकारी, वाशी यांच्याकडून दि.१५/१०/२०१५ रोजी २४ तास मुदतीचे पत्र देण्यात आले.
- मरिन सेंटर आणि क्लबच्या मालकावर महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ५२ व ५३ अन्वये वाशी पोलीस स्थानकात दि.१३/०१/२०१६ रोजी फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तथापि सदर बांधकामावरील कारवाईस सद्यस्थितीत न्यायालयाने मनाई आदेश जारी केला आहे.

-----------------

## नांदेड शहरातील मजुरांच्या मृत्यूबाबत

**(६५) * १८०१० श्री.विक्रम काळे, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड शहरातील हैदरबाग परिसरात ड्रेनेजमध्ये अडकलेला कचरा काढण्यासाठी उतरलेल्या मजुरांचा मृत्यू व अग्निशमन अधिकाऱ्यांसह दोन जण अत्यवस्थ झाल्याची घटना माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटनेची शासनाने चौकशी करून मृत मजुरांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत तसेच अत्यवस्थ असलेल्या अग्निशमन अधिकाऱ्यांना औषधोपचार करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे. सदरहू अपघातामध्ये १ मजुराचा मृत्यू झाला आहे व २ अग्निशमन विभागाचे अधिकारी जखमी झाले आहेत.

(२) नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेत जवाहरलाल नेहरु पुनरोत्थान योजनेअंतर्गत मल:निस्सारण वितरण व्यवस्थेचे काम ठेकेदारामार्फत प्रगतीपथावर असताना अपघात झाला असल्याने या मृत मजुरांच्या कुटूंबियांना ठेकेदाराने रु.१०.०० लाखाची नुकसान भरपाई दिली आहे. तर जखमी झालेल्या अग्निशमन अधिकाऱ्यांचेवर नांदेड-वाघाळा महानगरपालिकेमार्फत उपचार करण्यात आलेले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कोदवली राजापुर (जि.रत्नागिरी) येथील राजापुर शहराला पाणीपुरवठा करणारे सायबाचे धरणाची दुरुस्ती करण्याबाबत**

**(६६) * १५६८३ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोदवली राजापुर (जि.रत्नागिरी) येथील राजापुर शहराला पाणीपुरवठा करणारे सायबाचे धरण सन १८७८ मध्ये ब्रिटिशाकडून बांधण्यात आले असून हे धरण अतिशय जीर्ण होऊन धरणातून पाण्याची मोठया प्रमाणात गळती होऊन धरण केव्हाही फुटण्याचा धोका निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या धरणाची त्वरित दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) धरणातून काही प्रमाणात पाण्याची गळती होत आहे, हि वस्तुस्थिती आहे.

जिल्हाधिकारी यांचेकडून सदर धरणाचे संरचनात्मक परिक्षण (Structural Audit) करून त्यानुसार अहवाल प्राप्त करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**सातारा जिल्हयातील वीज वितरण कंपनीच्या खाजगी सुरक्षा रक्षकांना पूर्ववत सेवेत घेण्याबाबत**

**(६७) * १४७१२ श्री.नरेंद्र पाटील, श्री.सुनिल तटकरे, श्री.धनंजय मुंडे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, श्री.प्रकाश बिनसाळे :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्ह्यातील खाजगी ठेकेदारांकडून पुरविण्यात आलेल्या सुरक्षा रक्षकांना कोणतीही पूर्व कल्पना न देता कामावरुन कमी केल्याबाबत व त्यांना पुन्हा कामावर घेणेबाबत सातारा येथील जिल्हा कार्यालयासमोर माहे जानेवारी २०१५ च्या पहिल्या सप्ताहात बेमुदत उपोषण सुरु केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यांना पुन्हा कामावर रुजु करुन खाजगी सुरक्षा रक्षक अधिनियमानुसार मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) यशवंतराव चव्हाण सुरक्षा रक्षक व जनरल कामगार युनियन, ता.कराड, जि.सातारा या संघटनेने महावितरण, सातारा या कंपनीत ठेकेदारामार्फत कार्यरत सुरक्षा रक्षकांना कामावरुन कमी केले असल्याचे कळवून त्यांना पुन्हा कामावर घेण्यात यावे. याकरीता जिल्हाधिकारी, सातारा यांचे कार्यालयासमोर दिनांक ४/१/२०१६ पासून उपोषण सुरु केले होते, हे खरे आहे.

(२) मा.सर्वोच्च न्यायालयाने सिव्हील अपील क्र. १९२६-५०/१९८६ मध्ये "पुर्वीपासून एखाद्या आस्थापनेत/कंपनीत कार्यरत असलेल्या नोंदित सुरक्षा रक्षकास त्याच आस्थापनेत/कंपनीत वितरीत करण्यात यावे आणि मंडळाने देवू केलेल्या लाभांपेक्षा अधिक चांगले लाभ त्याला पूर्वी काम करीत असलेल्या आस्थापनेत/कंपनीत मिळत असल्यास त्यास पूर्वीच्याच कंपनीत असलेल्या अटी व शर्ती लागू राहतील." असे निर्देश दिले असून सदरहू निर्देश पाहता ते मंडळात पूर्वीच नोंदित झालेल्या सुरक्षा रक्षकांसंदर्भातील असल्याचे स्पष्ट होत आहे. प्रश्नाधीन सुरक्षा रक्षक हे कंत्राटदारामार्फत कार्यरत असलेले व मंडळात नोंदित न झालेले खाजगी सुरक्षा रक्षक आहत. त्यामुळे त्यांचेसंदर्भात सदरहू निर्देश लागू होत नाहीत.

सदरहू सुरक्षा रक्षक महावितरण, सातारा अंतर्गत खाजगी कंत्राटदारांमार्फत कार्यरत असून सदरहू आस्थापना सांगली सुरक्षा रक्षक मंडळात मुख्य मालक म्हणून अद्याप नोंदित झालेली नाही. तथापि, महावितरणच्या वडूज, जि.सातारा येथील विभागीय आस्थापनेस मंडळात नोंदित करण्यात आले असून महावितरण या संपूर्ण आस्थापनेची मंडळात, मुख्य मालक म्हणून नोंदणी करण्याचे व तेथे महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक अधिनियम, १९८१ व त्याखालील योजनेची अंमलबजावणी करण्याचे प्रयत्न मंडळामार्फत सुरु आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मालेगांव (जि.नाशिक) महानगरपालिका हद्दीतील नागरिकांना स्वच्छ पाणी पुरवठा करणेबाबत

**(६८) * १४५९७ डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक १२६८२ ला दिनांक ९ डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगांव (जि.नाशिक) शहरातील नागरिकांना स्वच्छ पाणीपुरवठा होण्याकरिता तसेच विविध मार्गांनी होणारे पाण्याचे प्रदुषण रोखण्याकरीता केंद्र शासन पुरस्कृत अमृत योजनेंतर्गत भुयारी गटार योजना राबविण्याचे प्रस्तावित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहरातील मोठ्या प्रमाणावरील नदी प्रदुषण रोखण्यासाठी नदीकृती आराखडा तयार करण्यात येवून याबाबतचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे सादर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरील कार्यवाही पूर्ण होऊन प्रश्न भाग (१) मधील भुयारी गटार योजना प्रत्यक्ष कार्यान्वित होण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही करण्यात आली आहे व प्रश्न भाग (२) मधील नमुद प्रस्तावास मान्यता प्राप्त झाली आहे काय,
(४) नसल्यास, याप्रकरणी मालेगांव महानगरपालिकेकडून कोणती कार्यवाही व पाठपुरावा करण्यात आला वा येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.
(२) मालेगांव शहरातील नदी प्रदुषण रोखण्यासाठी नदीकृती आराखडा पर्यावरण विभागामार्फत केंद्र शासनाकडे सादर करण्यात आला आहे.
(३) व (४) केंद्र शासन पुरस्कृत अमृत योजनेअंतर्गत मालेगांव शहराच्या मलनिस्सारण विषयक सेवास्तर सुधारणा आराखडा तयार करण्यात आलेला असून, अमृत अभियानांतर्गत राज्य वार्षिक कृति आराखडा तयार करताना सन २०१५-२०१६ या वर्षासाठी पाणीपुरवठा विषयक प्रकल्पांना प्राधान्य दिले असून अभियानाच्या पुढील कालावधीत मलनिस्सारण विषयक प्रकल्पांना प्राधान्य दिले जाणार आहे.

केंद्र शासन पुरस्कृत राष्ट्रीय नदी व सरोवर संवर्धन कार्यक्रमांतर्गत नदी कृति आराखड्यास मंजुरी मिळणेच्या अनुषंगाने केंद्र शासन स्तरावर पाठपुरावा करण्यात येत आहे.

-----------------

## जवाहर नगर (जि.भंडारा) परिसरातील घरात टाकलेला दरोडा

**(६९) * १७६५७ श्रीमती शोभाताई फडणवीस :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जवाहर नगर (जि.भंडारा) परिसरातील श्री.दर्शनलाल मल्होत्रा यांच्या घरात सात दरोडेखोरानी भरदिवसा ३.३० वाजता घूसून बंदुकीचा धाक दाखवून त्यांना मारहाण केल्याची घटना दिनांक ८ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणाबाबत शासनाने चौकशी करून दरोडेखोरांवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

(२) याप्रकरणी पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे अप.क्र.3/16 भा.दं.वि. कलम 395, 397, 450 व भारतीय हत्यार कायदा सहकलम 3, 4/25 अन्वये दिनांक 7.1.2016 रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींचा शोध घेण्यात येत असून गुन्हा पोलीस तपासावर प्रलंबित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये कंत्राटी तत्वावरील निदेशकांना सेवेत सामावून घेणेबाबत**

**(७०) * १६०५७ श्री.रामनाथ मोते, श्री.नागो गाणार, डॉ.अपूर्व हिरे, श्री.अनिल सोले, श्री.मितेश भांगडिया, श्रीमती शोभाताई फडणवीस :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये कंत्राटी पध्दतीने कार्यरत असलेल्या निदेशकांना सेवेत सामावून घेणेबाबत कोकण विभाग मतदार संघाचे लोकप्रतिनिधी व महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे कार्याध्यक्ष यांनी दिनांक ११ डिसेंबर, २०१४ रोजी निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने काय कार्यवाही केली आहे व त्याबाबतची माहिती लोकप्रतिनिधींना केव्हा कळविण्यात आली आहे,

(३) शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये सध्या कंत्राटी पध्दतीने कार्यरत असलेल्या निदेशकांची संख्या किती आहे,

(४) सदर निदेशकांची नियुक्ती आरक्षण, जाहिरात, मुलाखातीच्या आधारे स्पर्धेतून करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(५) दिनांक १३ नोव्हेंबर, २०१४ रोजी सामान्य प्रशासन विभागाने याबाबत घेतलेल्या आढावा बैठकीच्या अनुषंगाने काय कार्यवाही करण्यात आली आहे,

(६) सध्या शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये नियमित निदेशकांची किती पदे रिक्त आहेत व या रिक्त पदांवर कंत्राटी पध्दतीने काम करणाऱ्या निदेशकांना सेवेत सामावून घेण्याबाबत कोणती अडचण आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) सध्या कंत्राटी पद्धतीने कार्यरत असलेल्या निदेशकांची संख्या ३३४ इतकी आहे.

(४) हे खरे आहे.

(५) सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १३.०१.२०१४ च्या पत्रान्वये सर्व मंत्रालयीन विभागांना अर्धवेळ, करार, कंत्राटी, तासिका ई. तत्वावरील कार्यरत कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्यांच्या अनुषंगाने आढावा घेण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. तथापि, दिनांक १३.११.२०१४ रोजी आढावा बैठक घेण्यात आलेली नाही. अनियमित नियुक्तांबाबत दिनांक २७.०२.२०१५ रोजी आढावा बैठक घेण्यात आलेली नाही. अनियमित नियुक्त्यांबाबत दिनांक २७.०२.२०१५ रोजी आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती व बैठकीतील सूचनांनुसार सर्व प्रशासकीय विभागांकडून माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी सामान्य प्रशासन विभागकडून पाठपुरावा करण्यात येत आहे.

(६) सध्या शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये नियमित निदेशकांची ६७२ पदे रिक्त आहेत.

सदर रिक्त पदे ही नियमित पदे असून शासनाचे धोरणानुसार कंत्राटी तत्त्वावरील कर्मचाऱ्यांना नियमित पदावर सामावून घेणे शक्य नाही.

-----------------

## मुंबई पोलिस भरतीतील उमेदवारांवरील अन्याय दूर करण्याबाबत

**(७१) * १५२०८ श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई पोलीस भरती सन २०११ व सन २०१४ मध्ये निवड झालेल्या ज्या उमेदवारांवर गुन्हे दाखल होऊन त्यांची मा.न्यायालयातून मुक्तता दिल्याचे आदेश देऊनही त्यांची निवड साक्षांकन समितीच्या शिफारशीनंतर केली जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निवड होऊनही आणि साक्षांकन समितीसमोर मा.न्यायालयीन आदेश सर्व कागदपत्रे सादर करुनही समितीकडून उमेदवारांवर अन्याय होत असल्याचे माहे, जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, साक्षांकन समितीची ८-८ महिने बैठकच होत नसल्याने निवड होऊनही उमेदवारांना नियुक्ती पासून वंचित रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या संदर्भात लोकप्रतिनिधींनी माहे वा त्या दरम्यान जानेवारी, २०१६ मध्ये मा.मुख्यमंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे तक्रारही केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर तक्रारीनुसार चौकशी करुन उमेदवारांना न्याय देण्यासंदर्भात काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) शासन सेवेत नियुक्ती करताना चारित्र्य पडताळणी संदर्भातील प्रकरणांबाबत निर्णय घेण्याकरिता सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक, दिनांक २६.८.२०१४ अन्वये अपर मुख्य सचिव (गृह) यांच्या अध्यक्षतेखाली समिती-अ गठीत करण्यात आली असून त्या समितीने केलेल्या शिफारशी शासनाच्या मान्यतेनंतर संबंधित नियुक्ती प्राधिकाऱ्यांना त्याबाबत कळविण्यात येते.

(२), (३), (४) व (५) मा.लोकप्रतिनिधी मार्फत निवेदन प्राप्त झालेले आहे. पोलीस भरती २०१३ व २०१४ मध्ये पोलीस दलात निवड झालेल्या ज्या उमेदवारांवर गुन्हे दाखल होते अशा उमेदवारांची संबंधित पोलीस घटक कार्यालयाकडून प्राप्त प्रकरणे निर्णय घेण्याकरिता समितीसमोर दिनांक २९/६/२०१५ रोजी सादर करण्यात आली होती. सदरहु समितीच्या शिफारशी दिनांक ३०/७/२०१५ रोजीच्या पत्रान्वये संबंधित नियुक्ती प्राधिकाऱ्यांना कळविण्यात आल्या आहेत.

तसेच दिनांक ७/१०/२०१५ व दिनांक २२/१/२०१६ रोजी सुद्धा समितीच्या बैठका होऊन दिनांक २६/२/२०१६ रोजी समितीच्या शिफारशी संबंधित नियुक्ती प्राधिकाऱ्यांना कळविण्यात आल्या आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कामठी (जि.नागपूर) येथील सेट केसरीमल पोरवाल महाविद्यालयाच्या प्रवेशद्वारासमोर विद्यार्थ्याची झालेली हत्या

**(७२) * १७९३८ श्री.नागो गाणार, श्री.अनिल सोले, श्री.रामनाथ मोते :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कामठी (जि.नागपूर) येथील सेट केसरीमल पोरवाल महाविद्यालयाच्या प्रवेशद्वारासमोर दिनांक २० जानेवारी, २०१६ रोजी दुपारी १ वाजण्याच्या सुमारास एका विद्यार्थ्याची हत्या करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर जिल्ह्यातील अनेक महाविद्यालयांसमोर खून, मारामाऱ्या, अपहरण अशा घटना यापूर्वी घडल्या असून दिवसेंदिवस यात वाढ होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अशा घटना शिक्षणासारख्या पवित्र कार्य करीत असलेल्या शाळा/ महाविद्यालयात घडू नये व यास आळा घालण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

सदर प्रकरणी पोलीस स्टेशन कामठी येथे अप.क्र. १५/१६, भा.दं.वि. कलम ३०२, १४७, १४८, १४९, ३२६, ३२४ सह कलम १३५ मपोका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हा पोलीस तपासावर प्रलंबित आहे.

(२) नागपूर जिल्ह्यातील महाविद्यालयांसमोर खून, मारामाऱ्या, अपहरण अशा घटना यापूर्वी घडलेल्या नाहीत.

(३) अशा घटना शाळा/महाविद्यालयात घडू नये व यास आळा घालणेसाठी शाळा/महाविद्यालाय परिसरात नियमित पेट्रोलिंग ठेवण्यात येत असून महिला पेट्रोलिंग पथकाद्वारे सुद्धा नियमित देखरेख ठेवण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील अल्पवयीन मुलींचे होत असलेले अपहरणाच्या घटनांना प्रतिबंध घालण्याबाबत

**(७३) * १५७५७ ॲड.जयदेव गायकवाड, श्री.हेमंत टकले, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.रामराव वडकुते, श्री.ख्वाजा बेग, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.प्रकाश गजभिये, ॲड.अनिल परब, श्री.संजय दत्त, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.अमरिशभाई पटेल, श्री.हरिसिंग राठोड, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.आनंद ठाकूर, श्री.सुभाष झांबड, श्री.जर्नादन चांदूरकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषतः मुंबईत अल्पवयीन मुलींचे अपहरण व त्यांच्यावर झालेल्या बलात्काराच्या गुन्ह्यात वाढ झाली असून मुंबईतून ९२२ अल्पवयीन मुलींचे अपहरण करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, दररोज ४ लहान मुले बेपत्ता होत असून, सन २०१५ मध्ये १५४४ मुले बेपत्ता झाल्याची मुंबई पोलीसांकडे नोंद आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अल्पवयीन मुला-मुलींच्या वाढत्या अपहरणाच्या घटनांना प्रतिबंध घालण्याबाबत व अल्पवयीन मुलींवरील अत्याचाराचे प्रमाण कमी करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात अल्पवयीन मुलींवरील बलात्काराचे सन २०१४ मध्ये ३५० व २०१५ मध्ये ४४७ गुन्हे दाखल झाले आहेत. तसेच अल्पवयीन मुलींच्या अपहरणाचे सन २०१४ मध्ये २७९ व सन २०१५ मध्ये ९२२ गुन्हे दाखल झाले आहेत.

(२) बृन्हमुंबई पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात सन २०१५ ची बेपत्ता मुलांबाबतची ६५१ मुले व ९३० मुली अशी आकडेवारी आहे. त्यापैकी ५१४ मुले व ७१९ मुली मिळून आलेले आहेत.

(३) तपासाचा कालावधी चार महिन्यापेक्षा अधिक झाला असेल व शोधण्यास यश मिळत नसेल तर अशा तक्रारी अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाकडे पुढील तपासाकरीता वर्ग करण्यात याव्यात असे आदेशीत केलेले आहे.

- त्याकरीता बृहन्मुंबईतील सर्व परिमंडळात अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष स्थापन करण्यात आले आहेत.
- हरविलेल्या व्यक्तीचा शोध घेण्यासाठी प्रमाणीत कार्यपद्धती (Standard Operating Procedure) तयार करण्यात आली आहे.
- ऑपरेशन मुस्कान मोहिम राबविण्यात आली आहे. ऑपरेशन स्माईल ही शोध मोहिम राबविण्यात आली आहे.
- मुंबई पोलीसांची www.,mumbaipolice.gov.in, मुंबई रेल्वे पोलीसची www.shodh.gov.in ही संकेतस्थळे कार्यान्वीत आहेत.
- हरविलेल्या व्यक्ती संबंधीचे केंद्र माहिती व्यवस्थित भरली आहे किंवा नाही ते तपासणी केला जाते.
- लहान मुले मिळून आले नसल्यास त्याची माहिती पोलीस गॅझेटमध्ये प्रसिद्ध केली जाते.
- मुले हरविलेल्या ठिकाणी शोध पथक ताबडतोब भेट देते व चौकशी करतात.
- गुन्ह्याच्या गांभीर्याप्रमाणे सर्व पोलीस ठाणे गस्तीवरील वाहने, बीट मार्शल, रेल्वे कंट्रोल रुम यांना माहिती दिली जाते.
- सर्व पोलीस ठाण्यांना बीनतारी संदेशाद्वारे माहिती प्रसारित केली जाते.
- रेल्वे स्टेशन, बस स्थानक, वाहतूक जंक्शन येथील CCTV फुटेज प्राप्त करुन चौकशी/तपास केले जाते.
- बृहन्मुंबई पोलीस आयुक्त कार्यालयामार्फत बाल सुरक्षा गस्त पथके, १०२ महिला बीट मार्शल, विशेष हेल्पलाईन १००, १०३ व १०९० सुरू केली आहे.
- महिला अत्याचार प्रतिबंधक शाखेची स्थापना.
- हरविलेल्या अल्पवयीन मुलींच्याबाबत तक्रारदार कोणत्याही पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवू शकतात.
- प्रत्येक पोलीस ठाण्यात मुली व महिलासाठी मदत केंद्रे स्थापन,
- मुंबई शहरातील २७२ निर्मनुष्य जागांचे सुरक्षा ऑडीट करण्यात आले आहे.
- पोलीस पथके नेमण्यात आली आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------------

**परभणी शहरातील अवैध मोबाईल टॉवर बाबत**

**(७४) * १५०४० श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण : तारांकित प्रश्न क्रमांक ११७६९ ला दिनांक ९ डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी महानगरपालिका हददीतील मोबाईल टॉवर कंपन्यांकडून कोटयवधी रूपयांची थकीत वसुली तसेच भोगवटा प्रमाणपत्र नसतांनाही जागा मालकांनी इमारतीवर टॉवर उभारले असून त्यांच्याविरूध्द कारवाई करण्याऐवजी त्यांना पाठीशी घालणाऱ्या दोषी अधिकारी व कर्मचारी यांची चौकशी करण्याची मागणी परभणी येथील पत्रकारांनी मा. प्रधान सचिव, नगरविकास मुंबई यांच्याकडे सन २०१५-१६ मध्ये निवेदनाव्दारे केली आहे काय,

(२) असल्यास, अनाधिकृत टॉवर उभारणी, भोगवटा प्रमाणपत्र नसतांनाही टॉवर उभारणी करणे, तसेच कोटयवधी रूपयांची थकीत वसुली करण्याऐवजी नोटीसा देऊन केवळ वेळ काढू धोरण राबविणाऱ्या महापालिकेतील अधिकारी व कर्मचारी यांची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, त्यात काय निष्पन्न झाले तसेच वरील सर्व प्रकरणी शासन स्तरावरून करण्यात आलेल्या कारवाईची थोडक्यात माहिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**संगमनेर (जि.अहमदनगर) नगरपरिषदेच्या विषय समिती व स्थायी समिती यांच्या खर्च मर्यादेतील बंधनाबाबत**

**(७५) * १५०२१ डॉ.सुधीर तांबे, श्री.संजय दत्त, श्री.हरिसिंग राठोड, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संगमनेर (जि.अहमदनगर) नगरपरिषदेच्या विषय समिती व स्थायी समिती यांच्या खर्च मर्यादेत बंधने असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अधिनियमातील तरतुदीप्रमाणे नगरपरिषद विषय समितीसाठी रुपये १.५ लक्ष व स्थायी समितीसाठी रुपये ५ लक्ष मर्यादेच्या अधिकारात वाढ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.
(२) आणि (३) सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१५ दिनांक ०४.०८.२०१२ अन्वये महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मध्ये सुधारणा करण्यात आली आहे. त्यानुसार विविध समित्यांना वित्तीय मंजुरीची मर्यादा विहीत करणे बाबत नियम तयार करण्यात येत आहेत.

-----------------

**मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या हद्दीत वसई-अहमदाबाद महामार्ग,**
**दहिसर चेकनाका ते वर्सोवा नाक्यापर्यंत एकही**
**सार्वजनिक स्वच्छतागृह नसल्याबाबत**

**(७६) * १५६७१ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.रामराव वडकुते, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले, श्री.किरण पावसकर, श्री.प्रकाश गजभिये, श्री.विक्रम काळे, श्री.सुनिल तटकरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या हद्दीत वसई-अहमदाबाद महामार्ग, दहिसर चेकनाका ते थेट वर्सोवा नाक्यापर्यंत एकही सार्वजनिक स्वच्छतागृह नसल्यामुळे नागरिकांची व प्रवाश्यांची गैरसाय होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, स्वच्छ अभियानासाठी आणि जनतेच्या आरोग्यासाठी सार्वजनिक स्वच्छतागृहांना प्रथम प्राधान्य देण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नाही,
(२) मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ वर मिरा गावठाण येथे सार्वजनिक शौचालय उपलब्ध असून मिरा एम.आय.डी.सी. येथे महानगरपालिकेकडून शौचालय बांधण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

याखेरीज महानगरपालिका क्षेत्रातील राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ वर ज्या ठिकाणी शौचालय बांधण्याचे प्रस्तावित आहे. ती जागा भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या अखत्यारीतील असल्याने त्याकरीता महानगरपालिकेने उक्त प्राधिकरणाकडून परवानगी मागितली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील पुर्वमुक्त मार्गाच्या प्रकल्प बाधितांच्या पुनर्वसनाबाबत

**(७७) * १४६७८ श्री.विजय उर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील पुर्व मुक्त मार्गाचे काम पुर्ण होऊन अडीच वर्षे उलटले तरी मात्र चेंबूरच्या पांजरपोळ येथील प्रकल्पबाधित ७ हजार झोपड्यांपैकी २ हजार कुटुंबियांचे एमएमआरडीएने पुनर्वसन केले नसल्याचे दिनांक ६ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बहुतांश झोपड्या पात्र असतानाही त्यामध्ये काही तरी त्रुटी काढून या रहिवाशांना रुमचा ताबा देण्यामध्ये एमएमआरडीए टाळाटाळ करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे हे रहिवाशी ८ वर्षापासून मिळेल त्या ठिकाणी आसरा घेत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पुर्वमुक्त मार्गावरील उर्वरित प्रकल्पबाधितांचे पुनर्वसन लवकरात लवकर करण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्नाधिन प्रकल्पाच्या अनुषंगाने पुनर्वसनाचा दावा असणा-या झोपडीधारकांबाबत मा. मुख्यमंत्री महोदयांकडे दिनांक २०/०८/२०१५ रोजी संबंधितांची बैठक झाली. बैठकीचे अनुषंगाने दिनांक १८/११/२०१५ रोजी प्राप्त झालेल्या इतिवृत्तात विवादग्रस्त झोपडयांच्या पुनर्वसनासाठी मा.उच्च न्यायालयात दाखल केलेल्या रिट याचिका क्रमांक ९६७/२०१४ मधील मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार कार्यवाही करण्यात यावी असे नमूद केले आहे.

मा. उच्च न्यायालयाने दिनांक ०२/०९/२०१५ रोजी सदर याचिका फेटाळली आहे. सदर झोपडया कोणत्याही सर्वेक्षणात दिसून येत नाहीत. त्यांना ओळख क्रमांक नाहीत. प्रकल्पाच्या आखणी मार्गात बाधित असल्याबाबत कोणतेही ठोस पुरावे नाहीत.

-----------------

**मुंबईतील शासकीय कार्यालयांच्या वेळेत बदल करण्याबाबत**

**(७८) * १६०७८ श्री.रामराव वडकुते, श्री.प्रकाश गजभिये, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, श्री.नरेंद्र पाटील, श्री.विक्रम काळे, श्री.किरण पावसकर, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील शासकीय कार्यालयांच्या वेळेत लोकलवर पडणारा असह्य ताण लक्षात घेता शासकीय कार्यालयांच्या वेळा बदलण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रस्तावावर निर्णय घेण्यात आला आहे काय, असल्यास केव्हा,

(३) शासकीय कार्यालयाच्या वेळेत कोणते बदल करण्यात येणार आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील विविध विभागांमध्ये नोकर भरती घेण्यासाठी प्रभावी योजना सूचविण्याकरिता गठीत करण्यात आलेल्या मंत्रीमंडळ उपसमितीत मराठवाडयाचा प्रतिनिधी घेणेबाबत

**(७९) * १४८८३ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.धनंजय मुंडे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सरकारी कर्मचा-यांबरोबरच जि.प., नगरपालिका, महामंडळे, अनुकंपा धोरणात सुधारणा, प्रकल्पग्रस्तासाठीच्या उपाय योजना, सरळ सेवेने सरकारी नोकर भरती घेण्याबाबत प्रभावी योजना सुचवण्यासाठी शासनाने दिनांक २० जून, २०१५ रोजी वा त्यासुमारास मंत्रीमंडळ उपसमिती नेमली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मंत्रीमंडळ उपसमिती मध्ये मराठवाडा विभाग वगळता सर्व महसुली विभागाला प्रतिनिधित्व दिले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या समितीकडुन पुन्हा मराठवाडा महसुली विभागावर अन्याय होण्याची शक्यता नाकारता येत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, संयुक्त महाराष्ट्राचा विचार करता मराठवाडा विभागातील प्रतिनिधींचा मंत्रीमंडळ उपसमिती मध्ये समावेश करणार आहे काय व कधी,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) राज्यातील राज्य शासकीय/निमशासकीय/महामंडळातील अधिकारी/कर्मचारी यांच्यासाठी अनुकंपा धोरण सुधारणे आणि त्याचबरोबर प्रकल्पग्रस्तांना शासकीय नोकऱ्यांमध्ये भरती करण्यासंबंधी आढावा घेणे व त्यानुषंगाने प्रभावी उपाययोजना सूचविण्यासाठी वित्तमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली तीन इतर सदस्य असलेली मंत्रीमंडळ उपसमिती गठीत केली आहे.

(२), (३), (४) व (५) प्रस्तुत मंत्रीमंडळ उपसमितीची रचना ही महसूल विभाग विचारात घेऊन करण्यात आलेली नाही.

-----------------

**पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या विकास आराखडयाबाबत**

**(८०) * १५५९० श्रीमती दिप्ती चवधरी, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त : तारांकित प्रश्न क्रमांक १२६५१ ला दिनांक २३ डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा (पीएमआरडीए) चा विकास आराखडा तयार करण्याची प्रक्रिया चालू झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, उक्त विकास आराखडा किती कालावधीमध्ये तयार करण्यात येणार आहे,

(३) नसल्यास, विकास आराखडा तयार करण्यासाठी होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत,

(४) तसेच, पीएमआरडीए (पुणे महानगर क्षेत्र विकास प्राधिकरण) कडून भागाचा विकास होईल आणि शासनालाही महसूल मिळेल अशी अपेक्षा असताना सदर प्राधिकरणाकडून काहीच कामे होत नसून त्याच्या कामकाजाबाबत तक्रारींचे प्रमाण वाढलेले असल्याचे मा.मुख्यमंत्री यांनी दिनांक २० जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास संबंधित अधिकाऱ्यांशी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून संपर्क साधला असता यांच्या निदर्शनास आलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, यासंदर्भातील कामकाजाच्या प्रगतीबाबतची वस्तुस्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) पुणे महानगर प्रदेश क्षेत्राकरिता “क्षेत्र विकास प्राधिकरण” दिनांक ३१/०३/२०१५ चे अधिसूचनेद्वारे गठीत करण्यात आलेले आहे. दिनांक ०४/१२/२०१५ चे अधिसूचनेन्वये महानगर क्षेत्राची हद्दवाढ मंजूर करण्यात आली आहे.

पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण क्षेत्रातील विकास योजना तयार करण्याचे काम महानगर नियोजन समितीच्या निर्देशाप्रमाणे महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ मधील कलम ४२E नुसार करावयाचे आहे. विकास योजना तयार करणेसाठी विद्यमान जमीन वापर नकाशा तयार करण्याच्या प्राथमिक पूर्व तयारीकरीता खाजगी संस्थांकडून आंतरराष्ट्रीय स्तरावर ई-निविदा मागविण्यात आलेल्या आहेत.

(२) विकास योजना तयार करण्याचा इरादा जाहीर केलेल्या दिनांकापासून साधारणपणे अडीच वर्षात प्रारुप विकास योजना तयार करण्याचा प्राधिकरणाचा प्रस्ताव आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्राधिकरणाकडून काहीच कामे होत नाहीत व तक्रारी वाढलेल्या आहेत ही बाब खरी नाही.

जानेवारी, २०१६ मध्ये व्हिडीओ कॉन्फरन्सिंग द्‌वारे प्राधिकरणाकडून निर्गत झालेली प्रकरणे व जमा झालेले शुल्क यांचा तपशिल देण्यात आलेला होता. प्राधिकरणाचे प्रत्यक्ष कामकाज जुलै, २०१५ पासून सुरुवात झाली असून प्राधिकरणाने जुलै, २०१५ पासून फेब्रुवारी, २०१६ अखेरीस विविध लेखा शिर्षांतर्गत रु.५६२ कोटी इतका निधी जमा केला आहे.

(५) प्राधिकरणाकडून प्रकरणांचा निपटारा नियमितपणे होत आहे.

-----------------

## अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाची समाजाच्या आर्थिक विकासाकरिता होणाऱ्या कर्ज वाटपाबाबत

**(८१) * १५२२१ श्री.अनिल सोले, श्री.मितेश भांगडिया, श्री.नागो गाणार :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने महाराष्ट्र राज्य अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाची समाजाच्या आर्थिक विकासाकरिता स्थापना केली,हे खरे आहे काय,

(२) सन २०१४-१५ व २०१५-१६ या आर्थिक वर्षात ह्याकरिता किती नागरिकांनी अर्ज केले,

(३) महामंडळ व बँकेमार्फत लाभार्थ्यांना कर्जवाटप केले असल्यास किती लाभार्थीना किती रक्कम कर्ज वाटप झाली आहे,

(४) असल्यास, कर्मचारी वर्गाचे वेतनाची रक्कम किती आहे, गेल्या अनेक महिन्यांपासून कर्ज वाटप न करण्याची कारणे कोणती आहेत,

(५) शासन विविध कार्यात अमाप पैसे खर्च करत असतांना स्वंयरोजगाराकरिता निधी उपलब्ध न करण्याची कारणे काय आहेत,

(६) उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) सन २०१४-२०१५ या आर्थिक वर्षात ४०५ नागरिकांचे व सन २०१५-२०१६ मध्ये २६९ नागरिकांचे अर्ज प्राप्त झालेले आहेत.

(३) सन २०१४-२०१५ या आर्थिक वर्षात एकूण १४ लाभार्थींना एकूण रु. २०,१२,५००/- चे वाटप करण्यात आले आहे. तर सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षात एकूण ४३ लाभार्थींना एकूण रक्कम रु. ६०,२५,२५०/- चे वाटप करण्यात आले आहे.

(४) महामंडळाच्या कर्मचारी वर्गाच्या वेतनाची दर महा रक्कम रु. १,८१,३४५/- एवढी आहे. डिसेंबर, २०१५ पर्यन्त कर्ज वाटप करण्यात आल्यामुळे कर्ज वाटप न करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(५), (६) व (७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ठाणे बी-केबीन परिसरातील "कृष्णा निवास" ही इमारत धोकादायक नसतानाही कोसळून १२ जणांचा मृत्यू झाल्याबाबत

**(८२) * १५५८५ श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर : तारांकित प्रश्न क्रमांक ११७४३ ला दिनांक १६ डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे बी-केबीन परिसरातील कृष्णा निवास ही इमारत धोकादायक नसतानाही दिनांक ३ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास कोसळून ७ जण जखमी होऊन १२ जणांचा मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे,

(२) असल्यास, याअगोदरही कल्याण येथील ठाकुर्ली भागात इमारत कोसळून ९ जणांचा मृत्यू झाल्याची घटना घडलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील इमारत दुर्घटनेस जबाबदार असणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर/कर्मचाऱ्यांवर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच, जखमी झालेल्या व्यक्तींना तसेच मृताच्या कुटूंबियांना शासनाने कोणत्या स्वरुपाची आर्थिक मदत केली आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) सदर इमारत पडण्यामागची तांत्रिक कारणे तपासण्यासाठी VJTI कडून तपासणी करून घेण्यात आली असून सदर तपासणीमध्ये सदरची इमारत ही लोड बेअरिंग असल्याने supr structure (भिंतीचे विट बांधकाम) संपूर्णत: अथवा अंशत: (partial or complete) काढण्यात आले असल्याने हलविण्यात आले असल्याने सदर इमारत कोसळली असे अहवालात नमूद केलेले आहे.

प्रकरणी झालेल्या दुर्घटनेबाबत नौपाडा पोलीस स्टेशन येथे अकस्मित मृत्यू रजि.नं. ४४/१५, सी.आर.पी.सी.१७४ प्रमाणे दिनांक ४/८/२०१५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

(४) सदर दुर्घटनेत जखमी झालेल्या व्यक्तींना तसेच मृताच्या कुटूंबियांना शासनाने आर्थिक मदत केलेली नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील सुरक्षा व्यवस्थेबाबत

**(८३) * १५३६७ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पठाणकोट येथील हवाईतळावर नुकतेच दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्यानंतर मुंबईत सुरक्षा व्यवस्था करण्याच्या सूचना गुप्तचर विभागाने राज्य सरकारला दिल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तद्नुसार मुंबईतील संवेदनशील ठिकाणी पोलिसांनी सुरक्षेततेच्या दृष्टीने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय. हे खरे आहे.

(२) प्राप्त माहितीच्या अनुषंगाने दहशतवाद विरोधी पथकाच्या सर्व युनिटच्या अधिकारी व अंमलदारांना तात्काळ सतर्क करण्यात येते व त्यांची गोपनिय सुत्रे कार्यान्वित करून कोणतीही अनुचित घटना घडू नये याकरिता माहिती प्राप्त करण्याबाबत सूचित करण्यात आले आहे.

मुंबईतील महत्वाच्या संवेदनशील स्थळांना अतिरेकी/दहशतवादी हल्यापासून असलेला धोका विचारात घेता संभाव्य घटनांचा मुकाबला करण्याकामी या

विभागाकडून प्रमाणित कार्यपध्दती (SOP) तयार करण्यात आलेली असून ती आवश्यकतेनुसार कार्यान्वित केली जाते.

संवेदनशील स्थळांच्या सुरक्षिततेच्या अनुषंगाने एखादी संभाव्य घटना समोर ठेवून त्यांचा परिणामकारक मुकाबला कसा करावा याकरिता प्रमाणित कार्यपध्दतीनुसार वेळोवेळी सराव (MOCK DRILL) करण्यात येत असतो.

महत्वाचा व संवेदनशील स्थळांचा सुरक्षा आढावा घेऊन काही त्रुटी आढळून आल्यास त्याबाबत आवश्यक त्या उपाययोजना करण्याविषयी तातडीने सर्व संबंधितांना कळविण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पुसद (जि.यवतमाळ) येथे बोअरवेलचे पाणी बाटलीत भरुन मिनरल वॉटर म्हणून विकत असल्याबाबत**

**(८४) * १५६०९ श्री.ख्वाजा बेग, अॅड.राहुल नार्वेकर, श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.रामराव वडकुते :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुसद (जि.यवतमाळ) येथे बोअरवेलचे पाणी बाटलीत भरुन मिनरल वॉटर म्हणून विकले जात असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार बोअरवेलचे पाणी बाटलीत भरुन मिनरल वॉटर म्हणून विकणाऱ्या व्यावसायिकांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) मुख्याधिकारी, नगपरिषद पुसद तसेच सहाय्यक आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, यवतमाळ यांचेकडील अहवालानुसार बोअरवेलचे पाणी बाटलीत भरून मिनरल वॉटर म्हणून विकले जात असल्याची घटना घडल्याची वा त्याबाबतची तक्रार प्राप्त झालेली नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**उरण (जि.रायगड) येथे वाहतुकीची कोंडी सोडविण्यासाठी कोटनाका येथून बायपास रस्ता करण्याच्या मागणीबाबत**

**(८५) * १५९८५ श्री.सुनिल तटकरे, श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उरण (जि.रायगड) शहरात मोठ्या प्रमाणात वाहतुक कोंडी होत असल्याने उरण कोटनाका येथून बायपास रस्ता करण्याची मागणी शासनाकडे सातत्याने लोकप्रतिनिधी व नागरिक यांचेकडून होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) उरण बायपास रस्त्याचा प्रस्ताव सिडकोने तयार केलेला असून सदर मार्गामध्ये कंदळवने (mangroves) येत असल्याने, सदर प्रस्ताव पर्यावरण मंजूरीसाठी एमसीझेडएमए यांच्याकडे मान्यतेसाठी सादर करण्यात आला होता.
त्यांनी दिलेल्या निदेशानुसार तपशीलवार पर्यावरणात्मक व्यवस्थापन आराखडा आणि सनियंत्रण आराखडा तयार करुन एमसीझेडएमए यांना सादर करण्यात येत आहे. सदर प्रस्तावास मान्यता प्राप्त झाल्यानंतर या मार्गाची कामे हाती घेण्यात येणार आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कोल्हापूर येथील अंबाबाई मंदिरास मुबलक पाणीपुरवठा करावयाच्या अंदाजपत्रकाच्या मान्यतेबाबत**

**(८६) * १४९०१ श्री.जयंत पाटील, डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक ११७१६ ला दिनांक १६ डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर महानगरपालिका पाणी पुरवठा विभागाकडून अंबाबाई मंदिरासाठी रुपये १० लाख २० हजार २०० इतक्या रकमेचा अंदाजपत्रकात दिनांक १७ डिसेंबर २०१५ रोजी वा त्यासुमारास देवस्थान व्यवस्थापक समितीच्या सभेत मान्यता घेण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोल्हापूर महानगरपालिकेकडे रक्कम रुपये १० लाख २० हजार २०० वर्ग करण्यात आली आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

(२) रक्कम अद्‌यापी वर्ग करण्यात आलेली नाही.

(३) महानगरपालिकेच्या प्राप्त अंदाजपत्रकास मंजूरी देणे व निधी उपलब्ध करुन तो कोल्हापूर महानगरपालिकेकडे वर्ग करण्यासाठी मंजूरी घेण्याबाबतचा विषय दिनांक १७ डिसेंबर, २०१५ रोजीच्या समिती सभेमध्ये ठेवण्यात आला होता. परंतु सदर सभा रद्द झाली होती. त्यानंतर समितीची सभा दिनांक ४ फेब्रुवारी, २०१६ रोजी पार पडली असून, सदर सभेमध्ये रु. १०,२०,२००/- च्या अंदाजपत्रकास मंजूरी देण्यात आली असून, निधी कोल्हापूर महानगरपालिकेकडे वर्ग करण्यास समितीची मंजूरी प्राप्त झाली आहे. त्यानुसार सदर निधी कोल्हापूर महानगरपालिकेकडे वर्ग करण्याची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

**मुंबईतील शाळाबाह्य मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी राबविण्यात येणारा समाज विकास प्रकल्प बंद करण्याच्या प्रस्तावाबाबत**

**(८७) * १४६५४ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील शाळाबाह्य मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी सन २००७ पासून चालविण्यात येणारा समाज विकास प्रकल्प बंद करण्याचा प्रस्ताव मुंबई महानगरपालिकेतील अधिका-यांनी कामगार आयुक्तांकडे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान पाठविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विभाग चालू ठेवणे किंवा बंद करणे याचा अधिकार महापालिकेच्या शिक्षण समितीला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू विभाग बंद करण्याची कारणे काय आहेत, या प्रस्तावावर कामगार आयुक्तांनी कोणता निर्णय घेतला आहे,

(४) नसल्यास, याबाबतची सद्‌यःस्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण खात्याच्या आस्थापनेवरील प्रकल्प समन्वयक, मुख्य समाज विकास अधिकारी व समाज विकास अधिकारी तसेच समाज संघटक या संवर्गाची पदे शिक्षण खात्याच्या अनुसूचीवरुन सहाय्यक आयुक्त (नियोजन) यांच्या आस्थापना अनुसूचीवर घेण्याचे अतिरिक्त आयुक्त (शहर) यांनी आदेश दिले होते. त्यानुषंगाने समाज विकास अधिकारी, सहाय्यक आयुक्त (नियोजन) यांच्या आस्थापनेवर सन २०१३ पासून हजर झाले व ९ समाज संघटक हे अद्यापि शिक्षण विभागाच्या आस्थापनेवर कार्यरत आहेत.

सन २०१५ मध्ये म्युनिसिपल युनियन यांनी या विरोधात जाऊन कामगार आयुक्त यांच्याकडे दाद मागितली. त्यावर कामगार आयुक्त यांनी, संघटना आणि महापालिका प्रशासन यांनी सामोपचाराने सदर प्रश्न निकाली काढावा असे आदेश दिले.

-----------------

## परभणी जिल्हयात विविध भागात घडलेल्या गुन्हयांबाबत

**(८८) * १७३६३ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त, श्री.हरिसिंग राठोड, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्हयातील पाथरी-सेलू रस्त्यावरील बांदरवाडा शिवारात तीन दरोडोखारांनी धुमाकूळ घालत तिघांवर शस्त्राने वार करुन एका गर्भवती महिलेवर बलात्कार केल्याची घटना माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, मानवत तालुक्यातील ताडबोरगाव येथे झालेल्या खुनांच्या घटना तसेच सोनपेठ येथील मुर्ती विटंबना यासह जिल्हयातील घडलेल्या विविध घटनास कारणीभूत असणाऱ्या अकार्यक्षम पोलीस अधीक्षक व इतर पोलीस यंत्रणांच्या निष्क्रीय कारभाराची चौकशी करून त्यांच्याविरूध्द कारवाई करावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी अप्पर मुख्य सचिव, गृह यांच्याकडे सन २०१६ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय. प्राप्त फिर्यादीवरुन पोलीस स्टेशन पाथरी येथे गुरनं २०४/१५ भादंवि कलम ३७६(ड), ३(ह), ३९४, ३९७, ३२३, ३२४, ३२५, ३४ प्रमाणे दिनांक २९/१२/२०१५ रोजी ४ अनोळखी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल आहे.

(२) व (३) होय, प्रकरणी मा.विधानपरिषद सदस्य यांचे दिनांक०२/०३/२०१६ चे पत्र नुकतचे प्राप्त झाले आहे.

पोलीस स्टेशन पाथरी येथील गुरनं. २०४/२०१५ च्या तपासामध्ये आरोपींना अटक करण्यात आली असून ते सद्य:स्थितीत न्यायलयीन कोठडीत आहेत.

ताडबोरगांव शिवारात अनोळखी आरोपींनी चोरीच्या उद्देशाने दिनांक ०३/०२/२०१६ च्या रात्री घातक शस्त्राने गंभीर दुखापत करुन २ व्यक्तिंना जिवे ठार मारले बाबत पोलीस ठाणे मानवत येथे गुरनं २६/१६ भादंवि कलम ३९७, ३०२ प्रमाणे गुन्हा दाखल असून गुन्ह्याचा तपास सुरू आहे.

सोनखेड येथील मारोती मंदीरातील मुर्तीची तोडफोड करुन धार्मिक भावना दुखावल्या प्रकरणी सानपेठ पोलीस ठाणे येथे गुरनं २७/१६ भादंवि कलम २९५ प्रमाणे गुन्हा दाखल करुन गुन्ह्यातील आरोपींना अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सुरु आहे.

(४) विलंब झालेला नाही.

-----------------

## परभणी येथील गोंधळी या भटक्या विमुक्त जातीच्या ३० कुटुंबाना जात पंचायतीने वाळीत टाकल्याबाबत

**(८९) * १६५७८ श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणीतील गोंधळी या भटक्या विमुक्त जातीच्या जात पंचायतीने तेथील मोरे, उगले व इतर ३० कुटुंबाना गेल्या काही महिन्यापासून वाळीत टाकले आहे त्यामुळे या कुटुंबांनी घाबरून नाशिक येथे पळ काढला आहे, अशी तक्रार अंनिस या संस्थेने शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबतीत शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) याबाबत अंनीस संस्थेने केलेली तक्रार प्राप्त झालेली नाही. परंतु सदर प्रकरणी नाशिक जिल्हा गोंधळी समाज बहुउद्देशीय विकास संस्था नाशिक यांचा दिनांक २१/०१/२०१६ चा पोलीस अधिक्षक, परभणी कार्यालयास प्राप्त झाला.

सदर अर्जात त्यांनी 'हॅलो नाशिक' या वर्तमानपत्रात प्रकाशीत झालेल्या बातमीच्या अनुषंगाने जातपंचायतीच्या जाचामुळे परभणीतील दाम्पत्याला स्वत:चे गाव सोडून नाशिकमध्ये आसरा घेण्याची वेळ आली असून परभणीतील गोंधळी समाजाच्या जात पंचायतीने त्यांना वाळीत टाकले आहे. वगैरे मजकुराचा अर्ज प्राप्त झाला.

सदर अर्जाच्या चौकशीत भोर हे गोंधळी समाजाचे नसून जोशी समाजाचे आहेत. ते सेलु येथे राहत असताना त्यांनी बऱ्याच लोकांकडून उसने पैसे घेतले होते ते परत न करता नाशिक येथून निघुन गेले. त्यामुळे पैशाच्या देवाणघेवाणीवरुन त्यांना गोंधळी समाजाच्या लोकांनी जातीच्या बाहेर काढले नाही किंवा त्रास दिला नाही.

(२) एकंदरीत यातील भोरे हा जोशी समाजाचा असल्याने त्यांचा गोंधळी समाजाच्या जात पंचायतीशी संबंध येत नाही असे चौकशीत निष्पन्न झाले आहे. परभणी जिल्ह्यात गोंधळी समाजाच्या ३० कुटुंबांना वाळीत टाकल्याबाबत कोणतही तक्रार प्राप्त झालेली नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

### औरंगाबाद शहराचा सुधारित विकास आराखडा सादर होताच शहरातील काही वसाहतीवर वेगवेगळी आरक्षणे पडल्याने दलाल नागरिकांकडून पैसे वसूल करीत असल्याबाबत

**(९०) * १५६०२ श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शहराचा सुधारित विकास आराखडा सादर होताच शहरातील काही वसाहतीवर वेगवेगळी आरक्षणे पडली होती ही आरक्षणे उठवून देण्याच्या नावाखाली स्थानिक नागरिकांकडून हजारो रुपये काही जण घेत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनेक दलाल राजनगर, मुकुंदवाडी, जाधववाडी, हर्सूल, बंबाट नगर, भारतनगर, गारखेडा, अंबिकानगर इत्यादी भागात फिरुन आरक्षण उठवून देण्याच्या नावाखाली नागरिकांकडून पैसे वसूल करीत आहेत हे लक्षात घेता शासन त्वरीत आवश्यक कार्यवाही करणार वा करीत आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) औरंगाबाद शहराचा सुधारीत विकास आराखडा हा नगर रचना अधिकाऱ्यांनी दि. ३१.१०.२०१५ रोजीच्या पत्रान्वये आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांना पाठविला होता. त्यावर महानगरपालिकेने ठराव क्र. २६९/२०१६, दि. २८.०१.२०१६ अन्वये प्रारुप विकास योजना आराखड्यास काही दुरुस्तीसह मान्यता देऊन महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम २६ (१) अन्वये दि. ३.०२.२०१६ रोजी नागरीकांच्या हरकती व सूचना नोंदविण्यासाठी शासन राजपत्रात प्रसिध्द केलेला आहे.

आरक्षण उठवून देण्याच्या नावाखाली स्थानिक नागरिकांकडून हजारो रुपये काही जण घेत असल्याबाबत लेखी निवेदन / तक्रार शासनास प्राप्त नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील एस.व्ही.रोडची दुरवस्था झाल्याबाबत

**(९१) * १५४५८ श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील एक प्रमुख रस्ता असलेल्या एस.व्ही.रोडची गोरेगांव व अन्य आजुबाजुच्या परिसरातही दुरवस्था झाली असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, सदर रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

(२) सदर एस.व्ही.रोड हा वांद्रे (पश्चिम) ते दहिसर (पूर्व) पर्यंत असून, पहिल्या टप्प्यात वांद्रे ते जोगेश्वरी या भागातील सदर रस्त्याच्या सुधारणेचे काम सन २०१७-२०१८ मध्ये प्रस्तावित करण्याचे योजिले आहे.

तसेच, जोगेश्वरी ते दहिसर भागातील सदर रस्त्याच्या सुधारणेचे काम बृहन्मुंबई महानगरपालिकामार्फत हाती घेण्यात आलेले आहे.

दरम्यान आवश्यक असलेली दुरूस्तीची कामे महापालिकेमार्फत विभाग पातळीवर करण्यात येत आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबईतील मनिष मार्केटची इमारत धोकादायक झाल्याबाबत**

**(९२) * १५८२५ श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.विक्रम काळे, श्री.अनिल भोसले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंद ठाकूर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.रामराव वडकुते, श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मनिष मार्केटची इमारत धोकादायक झाल्याचे माहे जानेवारी, २०१६ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व तदनुसार सदर इमारतीची दुरुस्ती करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अशा प्रकारची बातमी दैनिक वर्तमानपत्रात प्रसिध्द झाली होती.

(२) व (३) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत दिनांक १५ जानेवारी, २०१६ मनिष मार्केटची इमारतीची पाहणी केली असता, इमारत धोकादायक स्थितीत असल्याचे आढळून आले नाही.

तसेच, मनिष मार्केट इमारतीने महापालिकेकडे सादर केलेल्या, महापालिकेच्या नोंदणीकृत मेसर्स कॉन आर्च इंडिया यांनी दिलेल्या अहवालानुसार सदर इमारत धोकादायक स्थितीत नाही.

मनिष मार्केट इमारत ही खाजगी इमारत असल्यामुळे सदर इमारतीची दुरुस्ती करण्याची व देखभाल / परिरक्षण करण्याची संपूर्ण जबाबदारी ही त्या सोसायटीची आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अक्कलकोट शहरातील पाणीटंचाईबाबत

**(९३) * १५४४६ श्री.रामहरी रुपनवर, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अक्कलकोट (जि.सोलापूर) येथील स्वामी समर्थनगरी व शहरास पाणीटंचाईची समस्या भेडसावत असून शहरवासियांना ३० दिवसाआड पाणीपुरवठा होत असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, शहरातील स्वामी समर्थ मंदिर, स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या गळोरग्गी येथील विहिरींसह इतर ६ विहिरींचे अधिग्रहण प्रशासनाने केले असून या सगळ्या विहिरींतील पाणी स्वामी समर्थ मंदिराची विहिर व अन्नछत्र मंडळाच्या विहिरीत साठवून पुरवठा करण्याचे नियोजन आजही अपूर्णावस्थेतच असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पाणीपुरवठ्याचे नियोजन पूर्ण करण्याबाबत तसेच शहरवासियांना नियमित एक तास तरी पाणीपुरवठा करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

(२) अक्कलकोट शहराला पाणीपुरवठा करणारे प्रमुख जलस्त्रोत कोरडे पडल्याने कुरनुर धरणपात्रातील विहिरी, स्वामी समर्थ मंदिराची विहिर व अन्यत्र असलेल्या विहिरी अधिग्रहित करुन त्यातील पाणी एकत्रितरित्या जलशुध्दीकरण केंद्रात पाठवून पाणीपुरवठा वितरण नलिकेद्वारे शहरात पाणीपुरवठा करण्यात येत आहे.

(३) जलशुध्दीकरण केंद्र शहराच्या एका बाजूला असल्याने शहरात मध्यवर्ती तसेच विविध ठिकाणी एकूण ८ पाण्याच्या टाक्या उभारण्यात येत असून त्यापैकी २ टाक्यांमधून पाणीपुरवठा कार्यान्वित करण्यात येत आहेत. तसेच वितरण व्यवस्थेतील दोष कमी करण्यासाठी उपाययोजना करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर शहरात डे स्ट्रेस स्पा च्या नावाखाली सामान्य नागरिकांची आर्थिक लूट होत असल्याबाबत

**(९४) * १५२१५ श्री.मितेश भांगडिया, श्री.अनिल सोले, श्री.नागो गाणार :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरात डे स्ट्रेस स्पा च्या नावाने सामान्य नागरिकांना खुले आम लुटण्याची बाब दिनांक ०५ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर दुकानांद्वारे सामान्य नागरिकांना आकर्षित करण्याकरिता वेगवेगळ्या आर्थिक योजना कोणत्याही प्रशासकीय परवानगी शिवाय सुरु आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोणतीही प्रशासकिय परवानगी न घेता सामान्य नागरिकांना आर्थिक नुकसान पोचविल्यासंदर्भात सदर दुकानांवर कार्यवाही करण्यात आली आहे काय, त्याचे स्वरुप काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नागपूर शहर पोलीस आयुक्तालयातील विविध पोलीस स्टेशन अंतर्गत यासंदर्भात कोणत्याही प्रकारचा तक्रार अर्ज किंवा गुन्हा दाखल झालेला नाही.

(२) हे खरे नाही.

(३) नागपूर शहर पोलीस आयुक्तालयातील विविध पोलीस स्टेशन अंतर्गत यासंदर्भात कोणत्याही प्रकारचा तक्रार अर्ज प्राप्त न झाल्याने कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**भिवंडी (जि.ठाणे) शहर महानगरपालिकेच्या शिक्षण मंडळांतर्गत असलेल्या उर्दू माध्यमाच्या शिक्षकांवर प्रशासन अधिकारी अन्याय करीत असल्याबाबत**

**(९५) * १५३६३ श्री.अमरिशभाई पटेल, श्री.संजय दत्त, श्री.हरिसिंग राठोड, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) महानगरपालिकेच्या शिक्षण मंडळांतर्गत असलेल्या उर्दू माध्यमाच्या शिक्षकांवर प्रशासन अधिकारी अन्याय करीत असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती सदरहू प्रशासन अधिकारी यांनी पदाचा दुरुपयोग करुन केलेल्या गैरव्यवहारासंबंधी त्यांचेवर कोणत्या स्वरुपाची कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) माहे, डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान अशी कोणतीही लेखी तक्रार प्राप्त झाली नाही.

तथापि, दिनांक ११/८/२०१५ रोजी महाराष्ट्र राज्य ऊर्दू शिक्षक संघटनेच्या समस्येबाबत बैठक घेतली असूता शोएब खान (गुड्डू), सल्लागार, महाराष्ट्र राज्य उर्दू शिक्षक संघटना तथा अध्यक्ष भिवंडी शहर जिल्हा काँग्रेस समिती यांनी बैठकीत मुख्याध्यापक मोमीन अनिस व इतर दोन शिक्षिका बाबत प्रशासन अधिकारी यांनी अन्याय केल्याबाबत मुद्दा मांडला होता.

(२) भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेने याबाबत संबंधितांची प्राथमिक चौकशी केली असून उक्त तक्रारीत तथ्य आढळून आले नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पुसद (जि.यवतमाळ) येथील पोलीस ठाण्यात कर्मचा-यांची वाढ करणेबाबत**

**(९६) * १४६३९ श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुसद (जि.यवतमाळ) या संवेदनशील शहरातील गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवण्याकरिता वसंतनगर पोलीस ठाण्याची निर्मिती करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ठाण्याचे शहरासोबत ग्रामीण भागातही कार्यक्षेत्र असताना ८५ हजार लोकसंख्या नियंत्रण ठेवण्यास फक्त २० पोलीस कर्मचारी असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) या संदर्भात पूर्ण कर्मचारी देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) पुसद शहर पोलीस ठाण्याचे विभाजन करुन नवीन वसंतनगर पोलीस ठाणे निर्माण केले आहे. वसंतनगर पोलीस ठाण्याचे कामकाज दिनांक २ ऑक्टोबर, २०१५ सुरु झालेले आहे. सदर पोलीस ठाण्यासाठी पदनिर्मितीच्या पहिल्या टप्प्यात गृह विभाग शासन निर्णय दिनांक ४ मार्च, २०१४ अन्वये पोलीस निरीक्षक-१, सहाय्यक पोलीस निरीक्षक-३, पोलीस उपनिरीक्षक-४, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षीक-१५, पोलीस हवालदार-२५, पोलीस नाईक-२५, पोलीस शिपाई-३४ अशी एकूण १०७ पदे निर्माण केली असून ती भरण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर येथील महाविद्यालयीन तरुणीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याबाबत

**(९७) * १५४१२ श्री.आनंदराव पाटील, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर येथील नागाळा पार्क परिसरातील वारणा कॉलनी हळदणकर यांच्या बंगल्यातील लेडीज होस्टेल मधील स्मिता खांडेकर या महाविद्यालयीन तरुणीने मैत्रीणीच्या त्रासाला कंटाळून गळफास करुन आत्महत्या केली असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त विद्यार्थीनीला आत्महत्येस प्रवृत्त करणाऱ्यांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी ९ आरोपींविरुद्ध शाहूपुरी पोलीस ठाणे येथे दिनांक ७.०१.२०१६ रोजी भाग ५, गु.र.क्र.०८/२०१६ भा.दं.वि.सं. ३०६, ३४ प्रमाणे गुन्हा नोंद केला आहे. यातील ४ आरोपी हे विधी संघर्ष बालक असल्याने त्यांना मा.बाल न्यायालय, कोल्हापूर यांनी जामीन मंजुर केल्याने विधीसंघर्ष बालकांना त्यांच्या आईच्या ताब्यात दिले आहे. तसेच, उर्वरीत ५ आरोपीपैकी ४ आरोपींना मा.जिल्हा व सत्र न्यायालय, कोल्हापूर यांना अटकपुर्व जामीन मंजुर केला असून एका आरोपीस मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी अटकपुर्व जामीन मंजुर केला आहे. सद्य:स्थितीत तपास सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**महानगरपालिकांना अडीच एफएसआय देण्याबाबत**

**(९८) * १७९४२ श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई, ठाणे, उल्हासनगर, भिवंडी-निजामपूर, मिरा-भाईंदर, वसई-विरार व कल्याण-डोंबिवली महानगरपालिकांना अडीच एफएसआय (चटईक्षेत्र) देण्याचा निर्णय शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यावर शासनाने निर्णय घेतला आहे काय, निर्णयाचे स्वरुप काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व यावर केव्हा निर्णय घेण्यात येईल ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) मुंबई महानगर प्रदेश क्षेत्रातील महानगरपालिकांसाठी (बृहन्मुंबई वगळून) सामाईक विकास नियंत्रण नियमावली तयार करण्यात येत असून, त्यामध्ये मोडकळीस आलेल्या इमारतींच्या संदर्भात चटईक्षेत्र निर्देशांकाबाबत उचित तरतूद करण्याचे प्रस्तावित आहे.

(२) सदर विकास नियंत्रण नियमावलीचे प्रारुप शासनाच्या मंजूरीस सादर करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे जिल्ह्यातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील अपुऱ्या मुलभूत सुविधांबाबत

**(९९) * १६५०३ श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील सात ते आठ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये (आयटीआय) शिकणा-या सुमारे सहा हजार विद्यार्थ्यांना मुलभूत व शैक्षणिक सुविधा अभावी अनेक गंभीर समस्या सोसाव्या लागत असल्याबाबत मागील ३ वर्षापासून या विद्यार्थ्यांनी मा. उच्च व तंत्र शिक्षण मंत्री, संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण आदींकडे लेखी निवेदनाद्वारे तक्रारी करूनही त्याकडे शासनाचे दुर्लक्ष झालेले असल्याने सदरहू आयटीआयच्या विद्यार्थ्यांनी बंद करण्याचा इशारा माहे डिसेंबर २०१५ मध्ये वा त्यादरम्यान दिलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील ३ वर्षांपासून ठाण्यातील सदरहू आयटीआय मधील पायाभूत व शैक्षणिक सुविधांबाबत तक्रारी करूनही त्याची आजमितीस पूर्तता न होण्याची कारणे काय आहेत,

(३) सदरहू संस्थातील विद्यार्थ्यांना सोसाव्या लागणा-या गंभीर समस्या विनाविलंब दूर करण्याच्या दृष्टीने तसेच पायाभूत व शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, अंशत: खरे आहे.

(२) व (३) ठाणे जिल्ह्यातील सर्व औद्योगिक संस्थेतील अपुऱ्या सुविधांची त्रुटी आता दूर करण्यात आल्या असून, सदरहू संस्थांमध्ये स्थानिक मुलभूत-पायाभूत सुविधा आता पुरविण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**खामगांव (जि.बुलढाणा) येथील नवीन सत्र न्यायालयाच्या इमारत बांधकामास प्रशासकीय मान्यता देणेबाबत**

**(१००) * १६६०६ श्री.पांडुरंग फुंडकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खामगाव (जि.बुलढाणा) येथील नवीन सत्र न्यायालयाच्या इमारत बांधकामास मंजुरीकरिता प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाकडून शासनास प्राप्त झाला आहे , हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर न्यायालयाच्या इमारत बांधकामास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नाही. प्रस्ताव शासनाकडे प्राप्त झालेला नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पुणे महानगरपालिकेत कचरा उचलण्याकरिता घंटागाडीची निविदा चुकीच्या पध्दतीने ठेकेदारांना दिल्याबाबत**

**(१०१) * १५०८८ श्री.अनिल भोसले, श्री.किरण पावसकर, श्री.संदिप बाजोरिया :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे महानगरपालिकेकडून महानगरपालिकेच्या हद्दीतील कचरा दररोज उचलण्याकरिता घंटागाडीची १५ कोटी रुपयांची निविदा क्रमांक २०९ मागविण्यात आली असून सदर निविदा ४ ठेकेदारांना प्राप्त झाली असून विशिष्ट प्रवृत्तीने ठेकेदारांच्या फायद्यासाठी सदर निविदा महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांकडून लावण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१६ च्या दुसऱ्या आठवडयात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली वा करण्यात येत आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

पुणे महानगरपालिकेच्या मोटार वाहन विभागाकडे कचरा उचलण्याकरीता अनुभवी व सक्षम ठेकेदाराकडून ऑनलाईन पध्दतीने निविदा मागविण्यात आल्या होत्या.

निविदेमधील अटींशर्ती व निकषानुसार मे. स्वयंभू ट्रान्सपोर्ट यांची सर्वात कमी दराची निविदा असल्याने, स्थायी समितीस त्यांच्या नावाची शिफारस करण्यात आली आहे.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**स्वच्छ महाराष्ट्र अभियानासाठी स्वच्छ महाराष्ट्र कोष स्थापन करण्याबाबत**

**(१०२) * १५३२८ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्रीमती दिप्ती चवधरी :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात राबविण्यात येत असलेल्या स्वच्छ महाराष्ट्र अभियानासाठी स्वच्छ महाराष्ट्र कोष स्थापन करण्याचा निर्णय दिनांक २४ नोव्हेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कोषाची रचना कशी निश्चित करण्यात आली आहे व त्यामार्फत कोण-कोणती कामे करण्यात येणार आहेत,

(३) यासाठी किती निधीची आवश्यकता आहे, हा निधी कशाप्रकारे उपलब्ध करण्यात येणार आहे, सध्या प्रत्यक्षात किती निधी उपलब्ध करण्यात आलेला आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय हे खरे आहे,

(२) स्वच्छ महाराष्ट्र अभियानांतर्गत नागरी व ग्रामीण भागात अनुज्ञेय असलेल्या कामांसाठी केंद्र व राज्य शासनाकडील निधी व्यतीरिक्त इतर स्त्रोतामधून निधी उपलब्ध करून देण्याकरिता स्वच्छ महाराष्ट्र कोषची स्थापना करण्यात आली असून, कोषची रचना पुढील प्रमाणे आहे:

| | | | |
|---|---|---|---|
| (१) | मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य | : | अध्यक्ष |
| (२) | मा.मंत्री, पाणीपुरवठा व स्वच्छता | : | उपाध्यक्ष |
| (३) | मा.राज्यमंत्री, नगर विकास | : | सदस्य |
| (४) | मा.मुख्यसचिव, | : | सदस्य |
| (५) | अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग | : | सदस्य |
| (६) | प्रधान सचिव (नवि) १, नगर विकास विभाग | : | सदस्य |
| (७) | प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता | : | सदस्य |
| (८) | सचिव, (नवि-१) नगर विकास विभाग | : | सदस्य |
| (९) | राज्य अभियान संचालक | : | कोषाध्यक्ष |
| | स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) | : | |

(३) कंपनी अधिनियम, २०१३ नुसार कंपन्यांना होणाऱ्या नफ्या पैकी किमान २ टक्के निधी कार्पोरेट सोशल रिसपॉन्सीब्लीटी (CSR) अंतर्गत खर्च करावयाचा आहे. त्यानुसार, स्वच्छ महाराष्ट्र अभियानांतर्गत अनुज्ञेय कामांसाठी कंपन्यांना शहरे/गावे दत्तक घेता येतील किंवा त्या कामांसाठी निधी उपलब्ध करून देता यावा याकरिता "स्वच्छ महाराष्ट्र कोष" निर्माण करण्यात आला आहे. स्वच्छ महाराष्ट्र कोषसाठी आता पर्यंत निधी उपलब्ध करून देण्यात आला नाही.

-----------------

**समृध्द जीवन कंपनीचे प्रमुख व संचालकांविरुद्ध कारवाई करणेबाबत**

**(१०३) * १५७५८ श्री.संदिप बाजोरिया, श्री.अनिल भोसले, श्री.विक्रम काळे, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.ख्वाजा बेग, श्री.रामराव वडकुते, ॲड.अनिल परब, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सेबीचे सहायक महाव्यवस्थापक यांनी पुण्याच्या डेक्कन जिमखाना पोलीस स्टेशनमध्ये समृध्द जीवन या कंपनीसह या कंपनीचे प्रमुख श्री.महेश मोतेवार यांच्याविरुध्द सेबीची परवानगी न घेता लोकांकडून बेकायदेशीर आर्थिक गुंतवणुक करुन घेत असल्याबाबत फिर्याद देऊन वैशाली मोतेवार, घनध्याम पटेल, राजेंद्र भंडारे यांच्याविरोधात भा.द.वि कलम ४२०, १८८, १२० (ब) नुसार नोव्हेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान गुन्हा नोंदविला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१३ रोजी सेबीने नोटीस काढून समृध्द जीवन या कंपनीला कलेक्टिव्ह इव्हस्टमेंट स्कीम अंतर्गत नागरिकांकडून गुंतवणुक व ठेवी घेण्यास बंदी घालूनही महेश मोतेवार यांच्या समृध्द जीवन कंपनीने ठेवी व गुंतवणुक स्विकारण्याचे काम सुरु ठेवल्याने सेबीने सदर तक्रार केल्यानंतरही डेक्कन जिमखाना पोलीस स्टेशनच्या अधिका-यांनी मोतेवार यांच्याविरोधात कोणतीही कारवाई न करण्याची कारणे काय आहेत,

(३) अन्य जिल्हयातील पोलीसांनी येऊन तसेच सीबीआयने महेश मोतेवार यांना केलेली अटक व त्यांच्या कंपन्यांवर धाडी घातल्या परंतु, डेक्कन जिमखाना पोलीस स्टेशनमध्ये सेबीच्या सहायक महाव्यवस्थापकांनी लेखी तक्रार करुनही त्या तक्रारकडे हेतूतः दुर्लक्ष करणा'या व कर्तव्यात अक्षम्य दिरंगाई करणाऱ्या डेक्कन जिमखाना पोलीस स्टेशनच्या संबंधित अधिकारी व कर्मचारी यांचेविरोधात कर्तव्यात कसूर केल्याबाबत काय कारवाई करण्यात आली वा येत आहे, नसल्यास, का नाही,

(४) महेश मोतेवार यास उस्मानाबाद पोलिसांनी माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान अटक केली असता त्याच्या खाजगी सुरक्षा रक्षकांनी पत्रकारांना धक्काबुक्की केल्याची तक्रार उस्मानाबाद पोलीस स्थानकात करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) मोतेवार यांच्याविरुध्द गुन्हा दाखल केल्यानंतर डेक्कन पोलीस स्टेशनकडून तपास सुरु करण्यात आला. तद्नंतर सदर गुन्हा आर्थिक गुन्हे शाखा यांचेकडे देण्यात आला.

सदर प्रकरणी तपास चालू असताना गुन्ह्यातील आरोपींना मा.सत्र न्यायालयाने अटकपूर्व जामीन मंजूर केला आहे.

सदर गुन्ह्याची व्याप्ती मोठी असल्याने सदर गुन्ह्याचा तपास राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे यांच्याकडे देण्यात आला आहे.

(३) व (४) हे खरे नाही.

गुन्हा दाखल केल्यानंतर तपास सुरु करण्यात आला होता. आर्थिक गुन्हे शाखेने पत्रव्यवहार करुन तर माहिती प्राप्त करुन घेतली. तथापि, गुन्हा सी.आय.डी. कडे देण्यात आल्यामुळे तक्रारीकडे दुर्लक्ष झालेले नाही. सदर गुन्ह्याचा तपास डेक्कन पोलीस स्टेशन फक्त ९ दिवस करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील अशासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आय.टी.आय) व एमसीव्हीसी कनिष्ठ विद्यालयांना अनुदान देण्याच्या मागणीबाबत

**(१०४) * १४९७७ ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नेरूळ (नवी मुंबई) येथील तेरणा अशासकीय तंत्र विद्यालयातील १२ वर्षे सेवा पुर्ण झालेल्या निदेशक श्री.एस.राऊत यांचेसह राज्यातील अन्य निदेशकांनी विरिष्ठ वेतनश्रेणी लागु करावी अशी मागणी सन २०१३ पासून आजतागयत शासनाकडे वेळीवेळी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निदेशकांना वरिष्ठ वेतनश्रेणीसाठी त्यांच्या नियुक्ती दिनांक हा कालावधी ग्राह्य धरण्याच्या अटीवर संबंधित निदेशकांचे त्यांचे मागणी प्रस्ताव शासनाकडून अमान्य करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) शासनाच्या शालेय शिक्षण विभागाने सलग १२ वर्षे सेवा ग्राह्य झालेल्या कर्मचाऱ्यांना वरिष्ठ वेतन श्रेणी लागु करण्याचा धोरणात्मक निर्णय घेतलेला असताना तंत्रशिक्षण विभागाने त्याच प्रकरणी नमारात्मक निर्णय घेण्याची कारणे काय आहेत,

(४) शालेय शिक्षण विभागाच्या धर्तीवर याप्रकरणी तंत्रशिक्षण विभागाने फेर निर्णय घ्यावा अशा आशयाचे निवेदन पत्र मा.विधानमंडळ सदस्यांनी तत्कालीन मा.उच्च व तंत्रशिक्षण मंत्री व विद्यमान मा.उच्च व तंत्रशिक्षण मंत्री यांना दिनांक १२ मे व २६ नोव्हेंबर, २०१४, दिनांक २३ मार्च, २०१५ रोजी दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर निवेदन पत्राचे अनुषंगाने सकारात्मक निर्णय घेण्यात आला आहे काय, असल्यास, केव्हा,

(६) नसल्यास, त्याची कारणे काय व त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) ते (६) सदर प्रकरणी लोकप्रतिनिधी व विविध संघटना यांची निवेदने शासनास प्राप्त झालेली आहेत. त्यानुषंगाने व्यवसाय शिक्षण संचालनालया अंतर्गत असणाऱ्या अशासकीय अनुदानीत संस्थांतील निदेशक, सहा. अधिव्याख्याता, शिक्षक/शिक्षकेत्र कर्मचाऱ्यांनी खाजगी विनाअनुदानीत काळात केलेली सेवा वरिष्ठ/निवडश्रेणी तसेच कालबद्ध पदोन्नतीसाठी ग्राह्य धरण्याबाबतचा प्रस्ताव मा.मंत्री मंडळासमोर सादर करण्यात येत आहे.

-----------------

### मुंबईतील झोपडपट्टीवासीयांना १३५ लिटर्स पाणीपुरवठा करण्याबाबत

**(१०५) * १६१६६ श्री.प्रकाश गजभिये, श्री.रामराव वडकुते, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.संदिप बाजोरिया, श्री.ख्वाजा बेग, श्री.राजेंद्र जैन :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने प्रत्येक व्यक्तीस १३५ लीटर पाणी पुरवठा करण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई येथील झोपडपट्टीवासींयाना फक्त ४५ लीटर्स पाणी देण्याचा निर्णय मुंबई महानगरपालिकेने घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निर्णयाने झोपडपट्टीधारक पाणी संकटात सापडला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने १४५ लीटर्स पाणी पुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत राष्ट्रीय मानांकनाप्रमाणे निवासी इमारतींमधील रहिवाशांना प्रतिदिन १३५ लिटर प्रमाणे पाणी पुरवठा करण्यात येतो.

(२) राष्ट्रीय मानकानुसार, शहरी भागात सामायिक नळखांबाद्वारे पाणी पुरवठा करण्यात येणाऱ्या ठिकाणी दरडोई ४० लीटर प्रतिदिन या प्रमाणात पाणी पुरवठा करण्याचे निर्देशित केले आहे.

तथापि, मुंबईतील झोपडपट्टीवासियांना महानगरपालिकेमार्फत सामायिक नळखांबाद्वारे प्रतिदिन प्रतिमाणसी ४५ लीटर पाणी पुरवठा करण्यात येतो.

(३) मुंबईतील झोपडीधारकांना महापालिकेमार्फत राष्ट्रीय मानांकनाप्रमाणे पाणी पुरवठा केला जात असल्याने, मुंबईतील झोपडपट्टीधारक पाणी संकटात सापडला आहे असे म्हणणे संयुक्तिक होणार नाही.

झोपडपट्टी पुनर्वसन योजने अंतर्गत हे झोपडपट्टीधारक इमारतींमध्ये रहावयास गेल्यावर त्यांना महानगरपालिकेमार्फत प्रतिदिन प्रतिमाणसी १३५ लीटर पाणी पुरवठा करण्यात येतो.

(४) सध्या शोषण टाकी असलेल्या इमारतींना महापालिकेमार्फत दरडोई १३५ लीटर प्रतिदिन प्रमाणे पाणी पुरवठा केला जात आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे महापालिकेला कचरा डेपो सुरु करण्याकरिता पर्यायी जागा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१०६) * १४७५३ आर्कि.अनंत गाडगीळ, श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अनिल भोसले, श्री.संदिप बाजोरिया, श्री.किरण पावसकर : तारांकित प्रश्न क्रमांक १२३७७ ला दिनांक २३ डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथे प्रस्तावित असलेला पिंपरी-सांडस येथील कचरा डेपो सुरु करण्याचा निर्णय शासनाने अखेर रद्द केला असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, पुण्यात निर्माण होत असलेल्या सुक्या कचऱ्याची विल्हेवाट लावण्यात महापालिका प्रशासनाला अपयश आले असल्याचे तसेच हा सुका कचरा गावकऱ्यांकडून जाळला जात असल्याने पर्यावरणाचीही हानी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने पाहणी केली आहे काय तदनुसार कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी पर्यायी जागा महापालिकेला उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) पुणे येथे प्रस्तावित असलेला पिंपरी-सांडस येथील कचरा डेपो सुरु करण्याचा निर्णय शासनाने रद्द केला, ही बाब खरी नाही.

कचरा डेपोसाठी आवश्यक असलेली मौजे पिंपरी-सांडस येथील वन विभागाच्या मालकीच्या जागेच्या मोबदल्यापोटी आवश्यक ती रक्कम वन विभागाकडे भरण्यात आली असून, सदर जागा पुणे महानगरपालिकेच्या नावे करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.
(२) नाही.

सुक्या कच-याची विल्हेवाट लावण्याबाबत पुणे महानगरपालिकेमार्फत उपायोजना करण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील नगरपरिषदांच्या उत्पन्नाच्या स्त्रोताबाबत**

**(१०७) * १५१३९ श्री.गोपिकिशन बाजोरीया : तारांकित प्रश्न क्रमांक २९२० ला दिनांक ११ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील नगरपरिषदांमधील उत्पन्नांचे स्त्रोत व करवसुलीचे प्रमाण अत्यंत कमी असल्यामुळे नगरपरिषदांचा खर्च, मुख्याधिकारी व कर्मचा-यांचे वेतन वेळेवर देण्यात येत नसल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) त्याचप्रमाणे नगरपरिषदांमधील रिक्त पदांची संख्या लक्षात घेऊन केवळ २३ परिविक्षाधीन मुख्याधिका-यांना नियमित मुख्याधिकारी पदावर नियुक्ती देण्याचा निर्णय घेण्यात आला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नगरपरिषदांच्या आर्थिक स्थितीबाबत शासन स्तरावर प्रस्ताव विचाराधीन आहे काय,

(४) असल्यास, नगरपरिषदांच्या मुख्याधिका-यांची रिक्त पदे व त्यांचे वेतनासंदर्भात शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.
(२) होय.
(३) शासन निर्णय, नगर विकास विभाग क्र. एमसीओ-२०१४/प्र.क्र. १५५/नवि-१४, दिनांक २५.०८.२०१४ अन्वये नगरपरिषद / नगर पंचायत आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांचे वेतन व नियमित निवृत्ती वेतनासाठी १०० टक्के नगरपालिका सहायक अनुदानाची रक्कम काही अटींवर उपलब्ध करुन देण्याचा निर्णय यापूर्वीच घेण्यात आला आहे.
(४) नगर परिषदांच्या मुख्याधिकाऱ्यांची रिक्त पदे विचारात घेऊन सन २०१५ साठी मुख्याधिकारी गट-ब संवर्गातील १८५ इतक्या उमेदवारांचे मागणीपत्र लोकसेवा आयोगास सादर केले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई महापालिकेला शहरातील कच-याची विल्हेवाट लावण्यासाठी जागा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१०८) * १६२०० प्रा.जोगेन्द्र कवाडे, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, श्री.आनंद ठाकूर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.रामनाथ मोते, श्री.नागो गाणार, डॉ.अपूर्व हिरे, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महानगरपालिकेने इमारत बांधकाम विषयक मंजुरीची प्रक्रिया अत्यंत सुलभ केल्याने मुंबईतील इमारतींच्या टॉवर्समध्ये मोठी भर पडणार असून त्यामुळे पायाभुत सुविधांचा मोठा भार पडणार आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २००० च्या घन कचरा व्यवस्थापन नियमावलीप्रमाणे कचऱ्याची विल्हेवाट शास्त्रोक्त पध्दतीने करण्याचा प्रकल्पही अजून पूर्णपणे सुरु झालेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच कांजुरमार्ग येथील डंम्पींग ग्राऊंडला देखील तेथील स्थानिक नागरिकांनी विरोध केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मुलुंड व देवनार येथेही नियमावलीचे पालन होत नसून ही डंम्पींग ग्राऊंड बंद करण्याचा निर्देश मा.उच्च न्यायालयाने माहे एप्रिल, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान दिले होते, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, शासनाने माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान मा.न्यायालयात प्रतिज्ञापत्र सादर करुन तळोजा येथे ५२ हेक्टर जमीन डंम्पिंग ग्राऊंडसाठी देण्याचे तत्त्वत: मान्य केले होते, हे ही खरे आहे काय,
(६) तसेच, मुंबईतील देवनार येथील डंपिंग ग्राउंडवर रोज आगी लागत असून या आगीच्या कारणांचा विचार करून त्यावर उपाय करण्यासाठीचा ॲक्शन प्लॅन फायर ब्रिगेडने अनेकदा महापालिकेकडे सादर केला आहे, परंतु त्याकडे वारंवार दुर्लक्ष करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(७) असल्यास, सदर ॲक्शन प्लॅनवर निर्णय घेऊन शासनाने येथे लागणाऱ्या आगींवर नियंत्रण आणण्याबाबत काय कार्यवाही केली आहे,
(८) तसेच उक्त प्रकरणी चौकशी करुन कचऱ्याची समस्या सोडविण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.
(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कांजूर येथे मार्च, २०१५ पासून दररोज कचरा स्विकारण्यास सुरूवात झाली असून सध्या तेथे दररोज ३००० मे.टन कचरा स्विकारुन त्यावर शास्त्रोक्त पद्धतीने बायोरिॲक्टर तंत्रज्ञानाद्वारे प्रक्रिया करण्यात येत आहे.

तथापि, मुलुंड व देवनार येथील कचऱ्याची विल्हेवाट शास्त्रोक्त पद्धतीने करण्याचे प्रकल्प अद्यापि सुरु झालेले नाहीत.
(३) हे खरे आहे.
(४) सदर प्रकरणी मा.उच्च न्यायालयाने दिनांक २४.११.२०१४ च्या आदेशान्वये, बृहन्मुंबई महानगरपालिकेस देवनार व मुलुंड क्षेपणभूमीवर कचरा टाकण्यास आदेशाच्या दिनांकापासून एका वर्षाकरिता परवानगी दिली होती. तसेच, बृहन्मुंबई महानगरपालिकेस क्षेपणभूमीसाठी जमीन उपलब्ध करुन देण्याबाबतचे आदेश दिलेले होते.
(५) हे खरे आहे.
(६) व (७) हे अंशत: खरे आहे.

क्षेपणभूमीवर मिथन वायुच्या निर्मितीमुळे वारंवार आग लागल्याच्या घटना घडत असतात. त्यावेळेस अग्निशमन दलाची वाहने तेथे पाठवून त्वरीत आग विझविण्यात येते.

दिनांक ११.०८.२००३ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिकेत, प्रत्येक क्षेपणभूमीवर स्वतंत्र अग्निशमन दलाची यंत्रणा स्थापन करण्यात यावी असा ठराव करण्यात आला होता.

मुंबई अग्निशमन दलातर्फे घन कचरा व्यवस्थापन विभागाला देण्यात आलेले एक अग्निशमन वाहन क्षेपणभूमीवर ठेवण्यात आले होते. तसेच क्षेपणभूमीवर अरुंद/कच्च्या रस्त्यावर त्वरीत पोहोचता यावे याकरिता मुंबई अग्निशमन दलाने वॉटर मिस्ट प्रणाली असलेले मिनी अग्निशमन वाहन खरेदी केलेले आहे.

(८) कचऱ्याची समस्या सोडविण्यासाठी शासनाने महापालिकेस मौजे करवले, ता.अंबरनाथ, जि.ठाणे येथील ३८.८७ हेक्टर व ऐरोली ब्रीज, मुलुंड (पूर्व) येथे ३२.७७ हेक्टर जागा उपलब्ध करुन दिली आहे. तसेच, मौजे करवले, ता.अंबरनाथ, जि.ठाणे येथील खाजगी १२.२० हेक्टर जमीन उपलब्ध करुन देण्यास मान्यता दिलेली असून सदर जमिनीच्या अधिग्रहणाची कार्यवाही सुरू आहे.

-----------------

**नाचणे (जि.रत्नागिरी) येथे कोकण गृहनिर्माण प्रकल्पासाठी संपादित करण्यात आलेल्या जमिनीबाबत**

**(१०९) * १५५४२ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाचणे (जि.रत्नागिरी) येथे कोकण गृहनिर्माण प्रकल्पासाठी संपादित करण्यात आलेली जमीन शासनाचा कोणताही निर्णय नसताना शेतकऱ्यांना परत करण्यात आल्याचे दिनांक १४ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय निदर्शनास आले व त्यानुसार दोषी आढळून येणाऱ्या संबंधित दोषी अधिकारी/कर्मचारी यांचेवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मालेगांव (जि.नाशिक) महानगरपालिकेची कामे अंदाजपत्रकाप्रमाणे होत नसल्याबाबत

**(११०) * १४५९६ डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक १२६७९ ला दिनांक ९ डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगांव (जि.नाशिक) येथे महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियानातंर्गत उड्डाण पुल उभारण्याबाबतचा प्रस्ताव तांत्रिक मान्यतेसाठी सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक यांच्याकडे सादर करण्यात आला आहे, त्यास मान्यता प्राप्त झाली आहे काय,

(२) असल्यास, प्रश्नोक्त उड्डाणपूलाचे कामाबरोबरच महानगरपालिकेने प्रस्तावित केलेल्या अन्य मुलभूत सोयी सुविधांसाठी उपलब्ध होणाऱ्या अनुदानातून गिरणा नदी किनारी हरित पट्टा निर्माण करणे या कामांतर्गत उद्यान, भू भराव करणे, उद्यान व खुले नाट्यगृह उभारणे इ. विकास कामांबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, सदरहु उड्डाणपुल आणि अन्य कामांचे प्रस्तावास अद्याप मान्यता न मिळण्याची कारणे काय आहेत व ही मान्यता केव्हापर्यंत मिळणे अपेक्षित आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियाना अंतर्गत मालेगांव महानगरपालिकेचा उड्डाणपूल उभारण्याचा प्रस्ताव तांत्रिक मान्यतेसाठी सार्वजनिक बांधकाम विभाग, मालेगांव यांचेकडे सादर करणेत आलेला असून तांत्रिक मंजुरी अद्याप प्राप्त झालेली नाही.

(२) या प्रयोजनासाठी राज्यशासनाने महानगरपालिकेस रुपये ५ कोटी इतका निधी वितरीत केला आहे.

या उपलब्ध अनुदानातून करावयाच्या कामांचा प्रस्ताव महानगरपालिकेने प्रशासकीय मान्यतेसाठी विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखालील समितीसमोर सादर केला होता.

मात्र, या निधीतून करावयाच्या कामांबाबत महानगरपालिकेने दोन वेगवेगळे ठराव केलेले असल्यामुळे नेमक्या कोणत्या ठरावाची अंमलबजावणी करावी याबाबत महानगरपालिकेने निर्णय घ्यावा, असे विभागीय आयुक्त यांनी सुचविले आहे.

त्यानुसार महानगरपालिकेने याबाबत पुढील निर्णयासाठी महासभेकडे प्रस्ताव सादर केला आहे.

(३) मालेगांव महानगरपालिकेमार्फत महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत प्रस्तावित उड्डाणपूल उभारण्याबाबतच्या प्रस्तावास तांत्रिक मान्यता घेऊन हा प्रस्ताव नगरपरिषद संचालनालयामार्फत शासनाकडे सादर करण्याच्या सूचना महानगरपालिकेस देण्यात आल्या आहेत.

महानगरपालिका मुलभुत सोयी-सुविधा अनुदान या योजने अंतर्गत सादर प्रस्तावाच्या अनुषंगाने महानगरपालिकने दोन ठराव केलेले असल्यामुळे नेमक्या कोणत्या ठरावानुसार प्रशासकीय मान्यता द्यावी. याबाबतच्या प्रस्तावास महासभेची लवकरात लवकर मंजुरी मिळवून हा प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेसाठी विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखालील समितीकडे सादर करावा, याबाबत महानगरपालिका आयुक्त यांना सूचना देण्यात आल्या आहेत.

-----------------

## नवी मुंबई महानगरपालिकेच्या प्राथमिक, उच्च प्राथमिक शाळा व बालवाडीतील विद्यार्थ्यांना पोषण आहारापासून वंचित ठेवल्याबाबत

**(१११) * १५८७७ श्री.रामनाथ मोते, श्री.नागो गाणार, डॉ.अपूर्व हिरे, श्री.जर्नादन चांदूरकर, श्री.हरिसिंग राठोड, डॉ.सुधीर तांबे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई महानगरपालिकेच्या प्राथमिक, उच्च प्राथमिक व बालवाड्यांची संख्या किती आहे,

(२) तसेच, या शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या किती आहे,

(३) मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानुसार व शासनाच्या निर्देशानुसार इयत्ता ८ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना पोषण आहार देणे बंधनकारक असतांनाही दिनांक १५ डिसेंबर, २०१५ पासून विद्यार्थ्यांना पोषण आहार देण्यात आला नाही, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, विद्यार्थ्यांना पोषण आहार न देणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द काय कारवाई करण्यात आली आहे,

(५) शालेय पोषण आहार बंद करण्याची कारणे काय आहेत,

(६) पोषण आहार बंद करणाऱ्या व जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द फौजदारी स्वरुपाचा गुन्हा का दाखल करण्यात आला नाही ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नवी मुंबई महानगरपालिकेच्या अधिपत्याखाली असलेल्या शाळा/बालवाड्यांचा तपशील पुढीलप्रमाणे आहेः-

- इयत्ता १ ली ते ५ वी पर्यंत :- ६ प्राथमिक शाळा,
- इयत्ता १ ली ते ८ वी पर्यंत:- ६२ प्राथमिक-उच्च प्राथमिक शाळा,
- बालवाड्या :- ६८.

(२) नवी मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारीतील शाळा/बालवाड्यांमध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांची संख्या पुढीलप्रमाणे आहेः-

- इयत्ता १ ली ते ५ वी पर्यंतच्या प्राथमिक शाळा :- ९८७ विद्यार्थी,
- इयत्ता १ ली ते ८ वी पर्यंतच्या प्राथमिक-उच्च प्राथमिक शाळा :- २१९१८ विद्यार्थी,
- बालवाडी :- ७३१० विद्यार्थी.

(३) हे खरे नाही,

मा.सर्वोच्च न्यायालयाने शालेय विद्यार्थ्यांना पुरक आहार देण्यासंदर्भात दिलेल्या निर्देशानुसार, तसेच नागरी भागातील शाळांमध्ये पोषण आहार पुरवठा करण्यासंदर्भात शालेय शिक्षण विभाग, शासन निर्णय दि. १८/०६/२००९ अन्वये विहित करण्यात आलेल्या कार्यपद्धती व मानकांनुसार नवी मुंबई महानगरपालिकेच्या नियंत्रणाखालील शाळांमधील विद्यार्थ्यांना पोषक आहार देण्यात येतो, असे आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांनी कळविले आहे.

(४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कॉ.गोविंदराव पानसरे हत्या प्रकरणातील प्रत्यक्षदर्शी साक्षीदार असलेल्या शालेय विद्यार्थ्यास खुनाची धमकी दिल्याबाबत**

**(११२) * १५२७९ श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कॉ.गोविंदराव पानसरे हत्या प्रकरणातील प्रत्यक्षदर्शी साक्षीदार असलेल्या शालेय विद्यार्थ्याची काळजी घेण्याचे पत्र पोलीसांना पाठवून हिंदू विविज्ञ परिषदेचे श्री.संजीव पुनोळकर यांनी अप्रत्यक्षरित्या मुलास खुनाची धमकी दिल्याची तक्रार कॉ.पानसरे कुटूंबियांनी कोल्हापूर पोलीसांकडे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तक्रारी वरुन मुलास धमकी देणाऱ्याविरुध्द काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी शाहूपुरी पोलीस ठाणे येथे अदखलपात्र गुन्हा नोंद क्र.१९/२०१६, भा.दं.वि.सं. कलम ५०६ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हा अदखलपात्र असल्या कारणाने फिर्यादी यांना सी.आर.पी.सी. कलम १५५ नुसार संबंधित न्यायालयात दाद मागण्याची समज देण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पुणे शहरातील पोलिसांकरिता पुरेशी निवासस्थाने बांधणेबाबत**

**(११३) * १५८२४ ॲड.जयदेव गायकवाड, श्री.आनंद ठाकूर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.रामराव वडकुते, श्री.ख्वाजा बेग, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.प्रकाश गजभिये, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील पोलीसांची संख्या सुमारे सात हजारांहून अधिक आहे मात्र घरांची संख्या केवळ दोन हजार असून त्याची दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे शहरातील सर्व पोलीसांकरिता पुरेशी घरे बांधणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) पोलीस आयुक्त, पुणे शहर येथे पोलीस अधिकारी ९८५ व कर्मचारी १०००८ असे एकूण १०९९३ मंजूर संख्याबळ असून पोलीस अधिकाऱ्यांसाठी ३११ व कर्मचाऱ्यांसाठी ३८०५ निवासस्थाने उपलब्ध आहेत. काही निवासस्थानांची दुरुस्ती करण्याची आवश्यकता आहे.

(२) पोलीस आयुक्त पुणे शहर आस्थापनावरील पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांकरिता महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ यांच्याकडून सन २०१६-१७ करिता एकूण ७२८ निवासस्थाने बांधण्याचे प्रस्तावित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**परभणी जिल्हयातील महा-ई सेवां केंद्राबाबत**

**(११४) * १५०५३ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्हयातील महा-ई सेवाकेंद्र जिल्हा समन्वयक व वरिष्ठ स्तरावरील अधिकारी व यंत्रणेकडून होत असलेल्या अडवणुकीची तसेच नियमबाहय मंजूऱ्यांची चौकशी करण्याबाबतची मागणी परभणी-हिंगोली जिल्हा स्थानिक स्वराज्य संस्थेचे लोकप्रतिनिधी यांनी प्रधान सचिव, माहिती व तंत्रज्ञान, मुंबई यांच्याकडे लेखी निवेदनाव्दारे सन २०१५-१६ दरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सीएमएस कंपनीचे जिल्हा समन्वयक वरिष्ठ अधिकारी व यंत्रणा यांची उच्च स्तरावरून चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले,

(४) तसेच संबंधित कंपनीचे जिल्हा समन्वयक, वरिष्ठ अधिकारी यांना बदलून जिल्हयातील महा-ई सेवाकेंद्र सुरळीत करण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात येणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) दिनांक १०/२/१६ रोजीचे लोकप्रतिनिधींचे निवेदन दिनांक १/३/२०१६ रोजी प्राप्त झाले आहे.

(२), (३), (४) सदर निवेदनासंदर्भात जिल्हाधिकारी, परभणी यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार संबंधित जिल्हा प्रतिनिधी, सी.एम.एस. कंपनी यांना जिल्हाधिकारी, परभणी यांनी कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. तसेच जिल्हाधिकारी, परभणी यांनी सदर प्रकरणाची चौकशी करण्याकरिता उपजिल्हाधिकारी स्तरावरील चौकशी अधिकारी नेमला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील नगरपरिषदांच्या विविध समित्यांच्या वित्तीय मंजुरीच्या अधिकाराबाबत

**(११५) * १५०१६ डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील नगरपरिषदांच्या विविध समित्यांना वित्तीय मंजुरीच्या अधिकाराची मर्यादा अनेक वर्षांपासून न बदलल्यामुळे समित्यांना काम करणे अवघड झाले आहे, त्यामुळे मोठा प्रतिकूल परिणाम नगरपरिषदेच्या कामकाजावर होत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वित्तीय मंजूरीचे अधिकाराची मर्यादा वाढवून देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) होय, सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक-१५ दिनांक ४ ऑगस्ट, २०१२ अन्वये महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मध्ये सुधारणा करण्यात आली आहे. त्यानुसार विविध समित्यांना वित्तीय मंजूरीचे सुधारित अधिकार विहित करण्याबाबतचे नियम तयार करण्यात येत आहेत.

-----------------

## राज्यातील आय.टी.आय. चे शिक्षण शुल्क कमी करणेबाबत

**(११६) * १८१८० श्री.अनिल सोले, श्री.मितेश भांगडिया, श्री.नागो गाणार, श्रीमती शोभाताई फडणवीस : तारांकित प्रश्न क्रमांक ११३९४ ला दिनांक २३ डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील उच्च व तंत्रशिक्षण विभाग व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय अंतर्गत ८७१ शासकिय व खाजगी आय.टी.आय. चे शिक्षण शुल्क रु. १८० वरुन रु. ५ हजार करण्यात आल्याचे दिनांक २८ जुलै, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शिक्षण शुल्क गरीब विद्यार्थ्यांना परवडण्यासारखे नसल्यामुळे शिक्षण शुल्क कमी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

(२) शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत प्रशिक्षण शुल्क दिनांक १४.०५.२०१५ च्या शासन निर्णयान्वये रुपये १८०/- वरुन रुपये २०५०/- ते २४५०/- प्रति प्रशिक्षणार्थी प्रतिवर्षी लागू करण्यात आले. तथापि, संस्था विकास शुल्कासाठी आकारण्यात आलेले रु. १०००/- संस्था विकास शुल्क दिनांक ०५.११.२०१५ च्या शासन निर्णयान्वये शासनाने रद्द केले असून सदर शुल्क प्रशिक्षणार्थ्यांना परत करावयाची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बेतावडे या गावात सुरुंगाचा स्फोट होऊन कामगार जखमी झाल्याबाबत

**(११७) * १५५९१ श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील दिवा येथील बेतावडे या गावात इमारत बांधकामाच्या ठिकाणी खडक फोडण्याचे काम सुरु असतांना सुरुंगाचा स्फोट होऊन दहा कामगार जखमी झाले असून दोघाची प्रकृती गंभीर असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन संबंधित विकासकावर गुन्हे दाखल करण्यासोबतच जखमी कामगारांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर स्फोट करणाऱ्या कंत्राटदाराविरुध्द पोलिस विभागामार्फत मुंब्रा पोलीस ठाणे, मुंब्रा येथे एफआयआर क्र. ०६/१६, दिनांक १७.१.२०१६ रोजी दाखल करण्यात आला आहे. तसेच इमारत व इतर बांधकाम कामगार (नियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ अंतर्गत निरीक्षण शेरे पारित केले असून संबंधित विकासकाविरुध्द खटले दाखल करण्यात येत आहेत.

किरकोळ जखमी झालेल्या ८ कामगारांचा तसेच गंभीर जखमी झालेल्या २ कामगारांचा उपचाराचा खर्च विकासकाने नियुक्ती केलेल्या कंत्राटदाराने केला आहे. त्याचप्रमाणे गंभीर जखमी झालेल्या २ कामगारांना वैद्यकीय उपचारानंतर विश्रांतीचा सल्ला देण्यात आला असून त्यांना व्यवस्थापनाने ३ महिन्यांचे आगाऊ वेतन दिलेले आहे. सर्व जखमी कामगारांना कायदेशीर नुकसान भरपाई देण्याबाबत ठाणे कामगार उपायुक्त कार्यालयाने व्यवस्थापनास सूचना दिलेल्या असून नुकसान भरपाईची रक्कम नुकसान भरपाई आयुक्त यांच्याकडे तात्काळ जमा करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद शहरातील रेन वॉटर हार्वेस्टींग प्रकल्पाबाबत

**(११८) * १५६०७ श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद शहरातील विविध परिसरातील भूजल पातळीत वाढ व्हावी यासाठी महानगरपालिकेने हुडको परिसरातील बी सेक्टरमध्ये असलेल्या सुभाषचंद्र बोस नगरातील दत्त आणि सी सेक्टरमधील दीपनगरातील साई मैदान या दोन ठिकाणी रेन वॉटर हार्वेस्टींग प्रकल्प राबविण्यात आला या करिता सन २०१३-१४ मध्ये महानगरपालिका निधीतून अडीच लाख रुपयांच्या अंदाजपत्रकाला मंजुरी मिळाली त्यानंतर मोहिते कन्स्ट्रक्शनची निविदा सन २०१४ मध्ये मंजूर झाली

मात्र तद्नंतर संबंधितांनी वर्षभर या प्रकल्पांच्या कामाकडे लक्ष दिले नसल्याचे व तद्नंतर थातुरमातुर काम करुन त्यामध्ये पैशाचा अपव्यय केला गेला असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, संबंधित परिसरातील नागरिकांनी या प्रकरणी आयुक्त यांनीच चौकशी करावी अशी मागणी केली आहे तरी याबाबत शासन त्वरीत आवश्यक कार्यवाही करणार वा करीत आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

सदरहु कामे हे सन २०१३ -१४ हया आर्थिक वर्षात हाती घेण्यात आली असून कामाची अंदाज पत्रकीय किंमत रु. २,९४,७७०/- एवढी होती. सदर कामे विहीत मुदतीत पुर्ण झाली आहेत.

(२) व (३) सदरहु काम हे विहीत कालावधीत पूर्ण झाले असल्यामुळे चौकशीचा प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कुर्डुवाडी (जि.सोलापूर) शहराला अशुध्द पाणीपुरवठा होत असल्याबाबत**

**(११९) * १५४५१ श्री.रामहरी रुपनवर, श्री.शरद रणपिसे, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्रीमती दिप्ती चवधरी :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुर्डुवाडी (जि.सोलापूर) शहराला पाणी पुरवठा करणा-या जलशुध्दीकरण केंद्रातून होणारा पाणीपुरवठा अशुध्द असून त्याचा तेथील नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठिकाणाच्या नागरिकांना स्वच्छ व पुरेसे पाणी पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

सदर कालावधीत कुर्डुवाडी नगरपरिषदेने पाण्याचे नमुने जिल्हा सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळा सोलापूर यांच्याकडून तपासून घेतले असून पाण्याचे नमुने पिण्यास योग्य असल्याचे प्रयोगशाळेने कळविले आहे.

(२) उजनी धरणातून बंद पाईपद्वारे पाणी उचलून ते जलशुध्दीकरण करुन पुरविले जाते.

(३) लागू नाही.

-----------------

**चंद्रपूर जिल्ह्यातील घोडाझरी तलाव जल पर्यटन केंद्र म्हणून विकसित करण्याबाबत**

**(१२०) * १५२५३ श्री.मितेश भांगडिया, श्री.अनिल सोले, श्री.नागो गाणार :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील घोडाझरी तलावाजवळील भागाला जल पर्यटन केंद्र म्हणून विकसित करण्याचा शासनाचा विचार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, घोडाझरी हे गाव नागपूर, चंद्रपूर व गडचिरोली या तिन्ही जिल्ह्यांच्या मध्यवर्ती स्थानी वसलेले आहे त्यामुळे या तलावाजवळील परिसरात रोजगार निर्मितीच्यादृष्टीने पर्यटन केंद्र विकसित करण्याची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, घोडाझरी या निसर्गरम्य परिसरात जल पर्यटन केंद्रासह पर्यटन केंद्र म्हणून विकसित करण्यात येणार आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२), (३) व (४) घोडाझरी पर्यटन केंद्र येथे लहान मुलांची खेळणी, नौकाविहार तथा पर्यटकांच्या सोयीसाठी उपहारगृह या सुविधा उपलब्ध आहेत. तसेच चंद्रपूर जिल्ह्यामध्ये रिसोर्स बेस्ड डेव्हलपमेंटच्या दृष्टीने चांदा ते बांदा योजनेअंतर्गत हे जल पर्यटन केंद्र विकसित करण्याच्या दृष्टीने घोडाझरी प्रकल्पाच्या पर्यटन केंद्राचा प्रारुप आराखडा जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्यामार्फत कार्यकारी अधिकारी, राष्ट्रीय ग्रामीण जिवनोन्नती अभियान तथा सदस्य सचिव, सिंधुदूर्ग व चंद्रपूर रिसोर्स बेस्ड डेव्हलपमेंट समिती यांना मंजूरी व निधी उपलब्ध करुन देण्याकरिता सादर करण्यात आला आहे. याशिवाय चंद्रपूर जिल्ह्याच्या बृहत आराखड्यातही या स्थळाचा समावेश आहे.

----------------

## ठाणे व कल्याण-डोंबिवली महानगरपालिकांच्या हद्दीतील विस्थापितांसाठी संक्रमण शिबिरांची व्यवस्था करण्याच्या मागणीबाबत

**(१२१) * १५३६९ श्री.अमरिशभाई पटेल, श्री.संजय दत्त, श्री.हरिसिंग राठोड, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे व कल्याण-डोंबिवली महानगरपालिकांच्या हद्दीतील धोकादायक इमारतीमधील सुमारे दीड लाख विस्थापितांसाठी संक्रमण शिबिरांची व्यवस्था करण्याची मागणी स्थानिकांकडून होत असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

ठाणे महानगरपालिकेकडे रेन्टल स्किम अंतर्गत बेघरांसाठी घरे आणि "संक्रमण शिबिर" या आरक्षांतर्गत इमारती प्राप्त झाल्या आहेत. सदर इमारतीमध्ये ठाणे महानगरपालिका हद्दीतील एकूण ११९ धोकादायक इमारतीमधील १३८३ कुटूंबियांचे तात्पुरते पुर्नवसन करण्यात आले आहे.

तथापि, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेकडे संक्रमण शिबिर व्यवस्थेबाबत मागणी करण्यात आली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पांढरकवडा (जि.यवतमाळ) येथील समाजकंटकांनी स्व.वसंतराव नाईक यांच्या संदर्भात फेसबुक वर टाकलेल्या आक्षेपार्ह मजकुराबाबत

**(१२२) * १४६४२ श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पांढरकवडा (जि.यवतमाळ) येथील समाजकंटकांनी हरित क्रांतीचे प्रणेते स्व.वसंतरावजी नाईक यांच्या संदर्भात फेसबुकवर आक्षेपार्ह मजकूर टाकल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास आक्षेपार्ह मजकूर टाकणाऱ्या संबधित समाजकंटकांविरुद्ध शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) सदर प्रकरणी आरोपींविरुद्ध कलम २९४, ४९९, ५०० भादंवि सह माहिती तंत्रज्ञान कायद्यान्वये पोलीस स्टेशन पांढरकवडा येथे गुन्हा दाखल करुन आरोपीस दिनांक २६.१२.२०१५ रोजी अटक करण्यात आलेली असून पुढील तपास सुरू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बनेवाडी (ता.वाळवा, जि.सांगली) येथील दांम्पत्याने सावकारांच्या त्रासाला कंटाळून आत्महत्या केल्याबाबत

**(१२३) * १५४१८ श्री.आनंदराव पाटील, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बनेवाडी (ता.वाळवा, जि.सांगली) येथील दांम्पत्याने सावकारांच्या त्रासाला कंटाळून आपल्या दोन चिमुकल्यांची गळा दाबून हत्या केली व स्वतःही आत्महत्या केली असल्याचे दिनांक २९ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आत्महत्येपूर्वी संजय राजवर्धन यांचे पाटीवर पेन्सिलने पाटणकर अप्पा खूप त्रास देतोय त्याची चौकशी व्हावी असा मजकुर लिहिला असल्याचा पुरावा पोलिसांना सापडला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने सावकारावर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) सदर प्रकरणी इस्लामपूर पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. २७३/२०१५ भा.दं.वि.सं. कलम ३०६, ३४ तसेच, मुंबई सावकारी अधिनियम क्र.३२, ३३ प्रमाणे गुन्हा नोंद केला आहे. यातील ४ आरोपींपैकी ३ आरोपींना अटक केली असून ते न्यायालयीन कोठडीत आहेत व १ आरोपी फरार आहे. सद्य:स्थितीत तपास सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबईतील मिठी नदी व कल्याणच्या वालधुनी नदी विकास प्राधिकरणांबाबत**

**(१२४) * १६४७७ श्री.जगन्नाथ शिंदे : तारांकित प्रश्न क्रमांक १२४९८ ला दिनांक २३ डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत दिनांक २६ जुलै, २००५ रोजी झालेल्या अतिवृष्टीत महापुरामुळे झालेले अतोनात नुकसान लक्षात घेऊन शासनाने मिठी नदी व कल्याणच्या वालधुनी नदीच्या विकासासाठी स्वतंत्र प्राधिकरणांची स्थापना केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या नद्यांच्या विकासासाठी सदरहू प्राधिकरणास शासनाने प्रत्येकी स्वतंत्रपणे निधीची उपलब्धता करून देण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, त्याबाबतचा सविस्तर तपशील देण्यात यावा,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२), (३) व (४) दिनांक १९/०८/२००५ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे शासनाने मिठी नदीच्या विकास व संरक्षणासाठी मिठी नदी विकास व संरक्षण प्राधिकरणाची स्थापना केली आहे.

तसेच दिनांक २४/०६/२००८ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे वालधुनी नदीचा जलद विकास करण्याकरीता जिल्हाधिकारी, ठाणे यांच्या अध्यक्षतेखाली एक समन्वय समितीची स्थापना करण्यात आली आहे. वालधुनी नदीसाठी प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली नाही.

तथापि, नागरी क्षेत्रातील नद्यांची सुधारणा करण्याची जबाबदारी त्या क्षेत्राच्या नियोजन प्राधिकरणाची/स्थानिक स्वराज्य संस्थांची असते. याप्रमाणे मिठी नदीबाबत विकास कामे ही बृहन्मुंबई महानगरपालिका, मुं.म.प्र.वि.प्रा.

आणि एअरपोर्ट प्राधिकरण यांनी आपापल्या नियोजन कार्यक्षेत्रात केलेले आहे. त्याच धर्तीवर वालधुनी नदीचा विकास देखील त्या क्षेत्रातील स्थानिक स्वराज्य संस्थेमार्फत होणे अपेक्षित आहे.

-------------------

**खामगाव (जि.बुलडाणा) येथील पाणीपुरवठा योजनेबाबत**

**(१२५) * १६६१४ श्री.पांडुरंग फुंडकर : तारांकित प्रश्न क्रमांक ८१४३ ला दिनांक १५ जुलै, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगाव (जि. बुलडाणा) शहरातील कायमस्वरूपी पाणी पुरवठा योजना सन २००८-०९ मध्ये मंजूर झाली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पाणीपुरवठा योजना आतापर्यंत कार्यान्वित न झाल्यामुळे नागरिकांचे पाण्यासाठी हाल होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या पाणीपुरवठा योजनेचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाले असून मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाला आहे, हे खरे आहे काय,.

(४) असल्यास, याबाबत संपूर्ण योजनेची उच्च स्तरीय चौकशी करणेबाबत मा. नगर विकास राज्यमंत्री यांच्या दालनात बैठक घेऊन कारवाईचे आदेश दिले होते, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, नगर परिषदे अंतर्गत (UIDSSMT) पाणी पुरवठा योजनेचे काम प्रलंबित असल्यामुळे ते महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे हस्तांतरीत करून सदर योजनेचे काम सुरु करण्यात येणार आहे काय,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सद्य:स्थितीत ज्ञानगंगा धरणावरुन ७० लिटर प्रतिमानसी प्रतिदिवशी यानुसार ५ ते ६ दिवसआड पाणीपुरवठा करण्यात येत आहे.

(३) योजनेचे काम निकृष्ट दर्जाचे झालेबाबत लोकप्रतिनिधीमार्फत तक्रार प्राप्त झाली होती.

(४) सदर योजनेच्या अनुषंगाने प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने सदर योजनेची संचालक, नगरपरिषद प्रशासन यांचेमार्फत चौकशी करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार चौकशीचा अहवाल शासनास सादर झालेला असून चौकशी अहवालाच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) केंद्र शासन पुरस्कृत युआयडीएसएसएमटी उपभियानांतर्गत मंजूर खामगांव नगरपरिषदेच्या पाणीपुरवठा प्रकल्पाचे कार्यान्वयन खामगांव नगरपरिषदेमार्फत सुरु असून सदर योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे हस्तांतरण करणेचे कोणतेही नियोजन नसल्याचे खामगांव नगरपरिषदेने कळविले आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**उत्तमसिंग चव्हाण**
**सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रकिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.